सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १५७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## 1 ऑक्टोबरपासून LPG सिलिंडर बुकिंगचे नियम बदलणार; बायोमेट्रिक आधार ऑथेंटिकेशन अनिवार्य

**मुंबई :** घरगुती LPG सिलिंडर वापरणाऱ्या ग्राहकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. १ ऑक्टोबर २०२६पासून अनुदानित दरात घरगुती LPG सिलिंडर बुक करण्यासाठी बायोमेट्रिक आधार ऑथेंटिकेशन (BAA) पूर्ण करणे आवश्यक असणार आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने यासंदर्भात नवा नियम जाहीर केला आहे.

मंत्रालयाच्या माहितीनुसार, सबसिडीसह नियंत्रित किरकोळ विक्री किमतीत (RSP) LPG सिलिंडर बुक करण्यासाठी ग्राहकाचे बायोमेट्रिक आधार ऑथेंटिकेशन पूर्ण असणे गरजेचे असेल. या प्रक्रियेचा उद्देश अनुदानाचा लाभ पात्र आणि वास्तविक घरगुती ग्राहकांपर्यंत पोहोचवणे हा असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

बायोमेट्रिक ऑथेंटिकेशन का आवश्यक?

सरकारच्या म्हणण्यानुसार, प्रत्येक LPG कनेक्शन आधार-प्रमाणित ग्राहकासोबत जोडल्यामुळे अनुदानित घरगुती सिलिंडरचा व्यावसायिक किंवा औद्योगिक वापरासाठी होणारा गैरवापर रोखण्यास मदत होईल. तसेच दुबार किंवा अपात्र LPG कनेक्शन ओळखून ते बंद करण्याची प्रक्रिया अधिक प्रभावी होऊ शकते.

अनुदानाचा लाभ योग्य ग्राहकांनाच मिळावा आणि त्याचे वितरण अधिक पारदर्शक पद्धतीने व्हावे, हा या निर्णयामागचा उद्देश असल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे.

१ ऑक्टोबरपासून नेमका काय बदलणार?

ज्या ग्राहकांनी BAA आधीच पूर्ण केले आहे, त्यांना पुन्हा ऑथेंटिकेशन करण्याची गरज नाही. त्यांचे LPG बुकिंग नेहमीप्रमाणे सुरू राहील.

## भारत-जपान हवाई दलांचा 'वीर गार्डियन-2026' सराव; दोन्ही हवाई दल प्रमुख एकत्र उडणार तेजस

**जोधपूर :** राजस्थानमधील जोधपूर हवाई तळावर भारत आणि जपानच्या हवाई दलांमध्ये 'वीर गार्डियन-2026' हा संयुक्त सराव सुरू आहे. रविवारी या सरावाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. भारतीय हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग आणि जपानच्या हवाई दलाचे प्रमुख जनरल ताकेहिरो मोरिता यांनी जोधपूर हवाई तळाला भेट दिली.

दोन्ही अधिकाऱ्यांनी सरावात सहभागी झालेल्या भारतीय आणि जपानी हवाई दलाच्या जवानांची भेट घेतली. यावेळी दोन्ही देशांच्या पथकांसोबत त्यांनी समूह छायाचित्रही काढले. त्यानंतर दोन्ही हवाई दल प्रमुख संयुक्तपणे उड्डाण करणार आहेत. या उड्डाणाकडे भारत



आणि जपानमधील संरक्षण सहकार्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण घडामोडी म्हणून पाहिले जात आहे.

या संयुक्त उड्डाणात भारतीय हवाई दल प्रमुख अमरप्रीत सिंग हे स्वदेशी तेजस लढाऊ विमानाचे नेतृत्व करणार आहेत. तर जपानचे हवाई दल प्रमुख जनरल ताकेहिरो मोरिता हे तेजसच्या प्रशिक्षक विमानातून उड्डाण करतील. त्यांच्या विमानाचे नियंत्रण भारतीय वैमानिकाकडे असेल.

'वीर गार्डियन-2026' हा 14 दिवसांचा सराव असून तो 22 सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. या सरावात भारताकडून तेजस, राफेल आणि सुखोई-30MKI या लढाऊ विमानांचा सहभाग आहे. तर जपानकडून F-2A विमानांचा सहभाग आहे. दोन्ही देशांचे हवाई दल विविध हवाई मोहिमांचा सराव करत आहेत. या सरावाचा उद्देश केवळ हवाई कसरती करणे एवढाच नाही. मोहिमांचे नियोजन, त्यांची अंमलबजावणी आणि हवाई डावपेच याबाबत दोन्ही देशांचे वैमानिक आणि तज्ज्ञ एकमेकांसोबत अनुभवांची देवाणघेवाण करत आहेत. विमान अभियांत्रिकी आणि हवाई सुरक्षेसारख्या विषयांवरही चर्चा होत आहे.

या संयुक्त सरावामुळे भारत आणि जपानच्या हवाई दलांमध्ये समन्वय वाढण्यास तसेच एकत्रितपणे काम करण्याची क्षमता मजबूत होण्यास मदत होणार आहे.

## पुणे-सोलापूर महामार्गावर काळाचा घाला; अज्ञात वाहनाच्या धडकेत पोलिसाचा जागीच मृत्यू

**पुणे :** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघातात पोलीस कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. उरुळी कांचन पोलीस ठाण्यात सहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत असलेले गणेश रतन दाभाडे (वय 49) यांचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला. शुक्रवारी (18 सप्टेंबर) मध्यरात्री सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास श्रीकृष्ण मंगल कार्यालयासमोर, ग्रीन पार्क हॉटेलजवळ ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, गणेश दाभाडे हे पोलीस ठाण्यातील काम आटोपून बाहेर पडले होते. त्यानंतर ते पुणे-सोलापूर महामार्ग ओलांडत असताना भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की दाभाडे गंभीर जखमी झाले आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावर न थांबता वाहनासह पसार झाला. त्यामुळे अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनाचा आणि चालकाचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. याप्रकरणी पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे.

गणेश दाभाडे हे मूळचे धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा येथील रहिवासी होते. 2001 मध्ये त्यांनी पोलीस दलात प्रवेश केला होता. पुणे ग्रामीण पोलीस दलात विविध ठिकाणी सेवा बजावल्यानंतर ते उरुळी कांचन पोलीस ठाण्यात सहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत होते. कर्तव्य बजावल्यानंतर घरी जात असताना झालेल्या या अपघातामुळे पोलीस दलात हळहळ व्यक्त होत आहे.

दाभाडे यांच्या निधनाची माहिती मिळताच उरुळी कांचन पोलीस ठाण्यात आणि परिसरात शोककळा पसरली.

## ग्रामसेवकाचा विधवेवर बलात्कार, गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

हिंगोली, २० सप्टेंबर

विधवा महिलेला तिच्या पतीचे कारचे कर्ज न्यायालयातून सेटलमेंट करून कार परत मिळवून देतो असे म्हणून विश्वासात घेत विधवा महिलेला हिंगोली येथील ग्रामसेवकाने त्याच्या राहत्या घरी गुंगीचे औषध देऊन बलात्कार केल्याप्रकरणी जालना जिल्ह्यातील करमाड पोलिस ठाण्यात महिलेने ऑनलाईन सीसीटीएनएस प्रणालीअंतर्गत हिंगोली ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. ग्रामीण पोलिसांचे पथक ग्रामसेवकाला ताब्यात घेण्यासाठी रवाना झाले आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, ग्रामसेवक गणेश पंजाबराव माने रा. अकोला बायपास, बळसोंड रोड, हिंगोली याने विधवा महिलेला तिचे मयत पतीचे कार लोन न्यायालयातून सेटलमेंट करून देऊन कार परत मिळवून देतो असे म्हणून विश्वासात घेवून तिला दि ६ ऑगस्ट २०२६ ते १४ सप्टेंबर २०२६ ग्रामसेवक माने याने त्याच्या राहत्या घरी कशाचे तरी गुंगीचे औषध देऊन बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले. कोणाला सांगितले तर जीवे मारून टाकीन अशी धमकी दिली. भितीच्या पोटी विधवा महिलेने ग्रामसेवक माने याच्या तावडीतून सुटून जालना जिल्ह्यात करमाड येथील पोलिस ठाण्यात ग्रामसेवक गणेश माने याच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून झिरो अंतर्गत सदरील गुन्हा हिंगोली ग्रामीण पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिसांनी तत्काळ ग्रामसेवक माने याच्या मुसक्या आवळण्यासाठी पथक रवाना केले आहे. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली असून ग्रामसेवकाची एवढी दहशत कशी निर्माण होते, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

## ज्येष्ठ पत्रकार पायल मेहता यांचे वयाच्या 46 व्या वर्षी निधन; पंतप्रधान मोदींसह अनेक नेत्यांनी व्यक्त केला शोक

**नवी दिल्ली :** ज्येष्ठ पत्रकार पायल मेहता यांचे वयाच्या 46 व्या वर्षी अचानक निधन झाले. प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर पत्रकारिता क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. पायल मेहता यांनी राजकीय आणि राष्ट्रीय विषयांवर दीर्घकाळ पत्रकार म्हणून काम केले होते.

पायल मेहता यांच्या निधनानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान



आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी शोक व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत पायल मेहता यांच्या पत्रकारितेतील कामाची आठवण काढली. मोदी यांनी पायल मेहता या मेहनती आणि जमिनीशी जोडलेल्या पत्रकार असल्याचे म्हटले. राष्ट्रीय विषयांची त्यांना चांगली जाण होती आणि त्याचा प्रभाव त्यांच्या वार्तांकनातून दिसून येत होता, असेही त्यांनी नमूद केले. त्यांच्या कामासोबतच इतरांशी आपुलकीने वागण्याच्या स्वभावाचीही मोदी यांनी आठवण केली.

राजनाथ सिंह यांनीही पायल मेहता यांच्या निधनावर दुःख व्यक्त केले. संसद अधिवेशनाच्या काळात त्या पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत संसदेत उपस्थित राहून कामकाजाचे वार्तांकन करत असत. पत्रकारितेप्रती त्यांची असलेली निष्ठा आणि कामातील सातत्य याचा उल्लेख राजनाथ सिंह यांनी केला. केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी पायल मेहता यांना संवेदनशील आणि मेहनती पत्रकार म्हणून आठवले. त्यांच्या निधनामुळे पत्रकारिता क्षेत्राचे मोठे नुकसान झाल्याचे त्यांनी म्हटले. जे. पी. नड्डा यांनीही त्यांच्या निधनावर शोक व्यक्त करत पत्रकारितेप्रती असलेल्या त्यांच्या समर्पणाचे स्मरण केले.




# शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी – कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

## वसमत, हिंगोली तालुक्यातील पिकांची बांधावर जाऊन केली पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० सप्टेंबर**

वसमत तालुक्यात पावसाचा खंड पडल्यामुळे अनेक भागात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. आज वसमत तालुक्यातील आसेगाव, टाकळगाव आणि बोराळा येथील नुकसानग्रस्त शेतीची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. या गंभीर परिस्थितीत शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

यावेळी खासदार रामराव वडकुते, आमदार राजू नवघरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषी संचालक विनय आवटे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, उपविभागीय अधिकारी विकास माने, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, तालुका कृषी अधिकारी सुनील भिसे उपनगराध्यक्ष राजकुमार एगडे, पदाधिकारी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या विविध समस्या कृषिमंत्र्यांसमोर मांडल्या.

टाकळगाव, आसेगाव, बोराळा परिसरातील शेती पिकांची पाहणी करताना कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. शेतकऱ्यांनी पिकांचे झालेले नुकसान, पावसाची परिस्थिती तसेच विविध अडचणी कृषिमंत्र्यांसमोर मांडल्या. पावसाअभावी निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती, सुकलेली पिके, पिकांची सद्यस्थिती आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींची प्रत्यक्ष माहिती घेतली. या गंभीर परिस्थितीत शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे असल्याचा विश्वास शेतकरी बांधवांना दिला.

शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत जाहीर करण्यात येईल, असे आश्वासन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी यावेळी दिले.

अफवांवर विश्वास ठेवू नये, अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा– कृषीमंत्री भरणे

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दुष्काळ जाहीर करण्यासाठी ट्रिगर लागू झालेले आहे. त्यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील चार तालुक्यांचा दुष्काळ यादीमध्ये समावेश आहे. वसमत तालुक्याचा या दुष्काळी यादीमध्ये समावेश करण्यात आलेला नाही, अशा माध्यमाची पोस्ट विविध समाज माध्यमांमध्ये सध्या व्हायरल होत आहे. याबाबत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना शेतकऱ्यांनी विचारणा केली असता त्यांनी सदर पोस्ट ही बनावट असून यामध्ये कोणतीही सत्यता नाही. शासनामार्फत अशा प्रकारची कोणतीही यादी अद्याप प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी अशा प्रकारच्या कोणत्याही पोस्टवर विश्वास ठेवू नये, केवळ शासनामार्फत अधिकृतरित्या जाहीर करण्यात आलेल्या माहितीवरच विश्वास ठेवावा असे आवाहन यावेळी केले.

# वसमतमधील अभिजीत शहाणे खून प्रकरणी दोघांना अटक

## तिसऱ्या आरोपीच्या शोधात पथक तेलंगणात

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २० सप्टेंबर**

वसमत शहरातील पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृहाच्या पाठीमागे असलेल्या जागेत अभिजीत शहराणे खून करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास पोलिसांनी ६० तासांत लावीत याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून तिसऱ्या आरोपीच्या शोधात पोलिसांचे पथक तेलंगणात रवाना झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत शहरातील पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृहाच्या पाठीमागे एक मृतदेह असल्याची माहीती पोलिसांना दि १८ सप्टेंबर रोजी मिळाली. त्यावरून वसमत शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुधीर वाघ, सहाय्यक पोलिस निरीक्षक शंकर डेडवाल, उपनिरीक्षक शिवाजी बोंडले, जमादार गजानन भोपे, सय्यद इमरान यांच्यासह पोलिसांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता त्याठिकाणी ३० वर्षीय तरूणाचा मृतदेह आढळून आला होता. पोलिसांनी मृतदेहाची पाहणी केली असता मृतदेहाच्या चेहऱ्यावर तसेच शरीरावर दगडाने मारल्याच्या जखमा होत्या. पोलिसांनी मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी परिसरात माहीती घेतली असता सदरील मृतदेह अभिजीत शहाणे वय ३० याचा असल्याचे स्पष्ट झाले.

मयत अभिजीत हा एका दुकानावर कामगार म्हणून काम करीत होता. गुरूवारी दि १७ सप्टेंबर रोजी दुपारी एक वाजता तो कामावरून घरी निघाला. मात्र तो घरी पोहोचलाच नाही. त्यानंतर शुक्रवारी दि १८ सप्टेबर रोजी त्याचा मृतदेह आढळून आला. या प्रकरणी वसमत शहर पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन तपास पथकाला आवश्यक त्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलिस निरीक्षक सुधीर वाघ, सपोनि शंकर डेडवाल, जमादार बी जी म्हात्रे, संदीप सुरोशे, नागरोव बाभळे, नितीन रामदिनवार, अशपाक शेख, गजानन भोपे यांचे पथक स्थापन करण्यात आले.

या पथकाने वसमत शहरात तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातून आरोपींची माहीती घेण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी सुरूवातीला पश्चिम महाराष्ट्रातील एकाची माहीती घेतली. मात्र त्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे पुन्हा एकदा वसमत शहरात हलवली. यामध्ये आवश्यक माहीती मिळाल्यानंतर पोलिसांनी वसमत शहरातून जय थोरात, गुलफार पठाण या दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणात अन्य एकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथक तेलंगणात रवाना झाले असून शोध मोहीम सुरू केली आहे. पोलिसांनी आतापर्यंत तीन ते चार ठिकाणी छापे मारून पाहणी केली आहे.

# नागनाथ अर्बन को.ऑप.च्या संचालकपदी दिलीप चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० सप्टेंबर**



मराठवाडा अर्बन बँक्स को-ऑपरेटिव्ह असोसिएशन लि., छत्रपती संभाजीनगरच्या संचालकपदी नागनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., हिंगोलीचे संचालक दिलीप चव्हाण यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल नागनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या या निवडीमुळे हिंगोली जिल्ह्याच्या सहकार व नागरी बँकिंग क्षेत्राला प्रतिनिधित्व मिळाले आहे. या निवडीबद्दल सहकार क्षेत्रातूनही त्यांचे अभिनंदन होत आहे.

यावेळी नागनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष ॲड. सतीश देशमुख, उपाध्यक्ष खंडेराव सरनाईक, संचालक मनोज आखरे, बाळाप्रसाद जोशी, बँकेचे कायदेशीर सल्लागार ॲड. अभिजय चव्हाण, प्रतिष्ठित व्यापारी डॉ. विजय निलावार, बँकेचे सरव्यवस्थापक घुगे तसेच कर्मचारी राके, आघाव, लोहगावकर व कर्मचारीवृंद उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी दिलीप चव्हाण यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मराठवाड्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राच्या विकासासाठी तसेच सहकार क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा निश्चितच उपयोग होईल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



**हिंगोली– नवसाला पावणारा गणपती विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह राज्यभरातून भाविक मोदक घेवून नवस फेडण्यासाठी तसेच दर्शनासाठी येत आहेत. अनंत चर्तुदशीला लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. संस्थानच्यावतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### हिवरा जाटू येथे पीक परिस्थितीची पाहणी

हिंगोली– राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शनिवारी आज औंढा नागनाथ तालुक्यातील हिवरा जाटू शेतशिवारात सोयाबीन पिकांची पाहणी केली. पाहणीनंतर शेतकरी शंकर दत्तराव कऱ्हाळे यांच्या शेताच्या बांधावर त्यांनी शेतकऱ्यांसोबत बेसन-भाकरी आणि हिरव्या मिरचीचा ठेचा या साध्या जेवणाचा आस्वाद घेतला. हिंगोली जिल्ह्यासह औंढा नागनाथ तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती झाली आहे. या पार्श्वभूमीवर कृषिमंत्री भरणे यांनी हिवरा जाटू येथे शेतातील पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांनी कृषी मंत्र्यांसमोर व्यथा मांडल्या. यावर विविध योजनांच्या माध्यमातून तसेच शासनाकडून लवकरच शेतकऱ्यांना मदत दिली जाईल, अशी ग्वाही कृषिमंत्री भरणे यांनी दिली. यावेळी राज्यसभा सदस्य रामराव वडकुते, आमदार चंद्रकांत ऊर्फ राजू नवघरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, तहसीलदार हरीश गाडे, नायब तहसीलदार प्रवीण ऋषी, गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे, तालुका कृषी अधिकारी शिवप्रसाद संघेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी आणि शेतकरी उपस्थित होते.

### कोनाथा येथे श्रीमद भागवत कथेला प्रारंभ



कोनाथा– तालुक्यातील कोनाथा येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी दि २० सप्टेंबर ते २६ सप्टेंबरपर्यंत श्रीमद भागवत कथा आयोजित करण्यात आली आहे. या कथेला आजपासून सुरूवात झाली आहे. कथावाचक सोपान महाराज मोरे आहेरवाडी यांच्या रसाळ वाणीतून दररोज सात दिवस कथा ऐकावयास मिळणार आहे. या कथेचा लाभ पंचक्रोशीतील भाविकांनी घ्यावा असे आवाहन ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे. कथेसाठी ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

### अष्टविनायक गणेश मंडळातर्फे रक्तदान शिबीर



हिंगोली– शहरातील अष्टविनायक गणेशमंडळाच्यावतीने रविवारी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी रक्तदान केले

# हिंगोलीत पोलिसांकडून दोन ठिकाणी प्रतिबंधीत गुटखा जप्त, तीन वाहनांवर कारवाई, दोघांविरूध्द गुन्हा दाखल, स्थागुशाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० सप्टेंबर**





शहरालगत खटकाळी बायपास येथे स्थानिक गुन्हे शाखा व हिंगोली ग्रामीण पोलिस यांच्या पथकाने शनिवारी नाकाबंदीनंतर एक स्कार्पीओ वाहन पकडले. वाहनातील गुटखा व वाहन असा एकूण १७ लाख ९० हजार रूपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर शहरातील तोफखाना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा मारून दोन कारसह प्रतिबंधीत गुटखा असा एकूण १६ लाख ७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार नांदेडकडून एका स्कार्पीओ वाहनांमधून मोठ्या प्रमाणावर गुटखा विदर्भाकडे नेला जात असल्याची माहीती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांनी तातडीने पोलिस पथक स्थापन केली.

हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे, उपनिरीक्षक राहुल घुले, श्रीदेवी वग्गे, जमादार बाळासाहेब खोडवे, आकाश पंडीतकर, बापूराव चव्हाण, सुधीर ढेंबरे, नंदू जाधव, विष्णू चव्हाण, राजु गुठ्ठे, शंकर गायकवाड, इडोळे तसेच गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक दिलीप मोरे, जमादार संदीप जाधव, धनंजय क्षीरसागर यांचे पथक खटकाळी बायपास येथे तैनात केले. यामध्ये काही कर्मचारी गणवेशात तर काही कर्मचारी साध्या वेशात तैनात होते.

खटकाळी बायपास चौकात तब्बल तीन तास या पथकांनी नाकाबंदी करीत नांदेडकडून येणाऱ्या वाहनांची तपासणी सुरू केली. यावेळी चालक पळून जाऊ नये यासाठी पोलिसांनी पूरेपूर काळजी घेतली. पथकाने एक संशयीत स्कार्पीओ थांबवली. पोलिसांनी वाहन चालकाकडे चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये गुटख्याची पोती आढळून आली. यामध्ये सुगंधीत पान मसाला तसेच गुटखा असल्याचे स्पष्ट झाले.

पोलिसांनी स्कार्पीओ वाहन व गुटखा असा एकूण १७ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी वाहन चालकांची प्राथमिक चौकशी केली असता त्याने सदरील माल नांदेड येथून आणल्याचे सांगितले.

शहरातील तोफखाना भागात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने प्रतिबंधीत गुटखा व दोन कार जप्त केल्या आहेत. तोफखाना भागातील शकुर कच्छी यांच्या घराजवळ छापा मारला. यावेळी इनोव्हा कार क्रमांक एमएच ०४ एफएफ २२७४ व हुंदई कार क्रमांक एमएच ०३ एआर ९७३५ या दोन वाहनांमध्ये पोत्यात सुगंधीत मसाला व प्रतिबंधीत गुटखा अंदाजे किंमत ४ लाख ७ हजार ३०७ आढळून आला. दोन वाहनांसह पोलिसांनी १६ लाख ७ हजार ३०७ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी गुन्हे शाखेचे नरेंद्र साळवे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अकरम बेग इस्लाम बेग आणि अनवर उर्फ हाजी हुसैन सय्यद रा हिंगोली यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कारवाई गुन्हे शाखचे सपोनि वसंत आरसेवार, अंमलदार गजानन पोकळे, पांडुरंग राठोड, लिंबाजी वाव्हुळे, निरंजन नलवार, सतीश जाधव, नरेंद्र साळवे यांच्या पथकाने केली.

# एबीएमच्या विद्यार्थीनींची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० सप्टेंबर**





एबीएम इंग्लीश हायस्कूलमधील अर्ना सचिन काबरा आणि स्वरा बळीराम भुसारे या दोन गुणवंत विद्यार्थिनींची 'भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या' विशेष अभ्यासदौऱ्यासाठी निवड झाली आहे.

विज्ञान हे केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, नवनवीन गोष्टी जाणून घेण्याची आणि संशोधनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी एबीएम हायस्कूलकडून सातत्याने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात. याच उपक्रमांचा भाग म्हणून या विद्यार्थिनींना इस्रोला भेट देण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे. या अभ्यासदौऱ्यादरम्यान विद्यार्थिनींना इस्रोचे प्रत्यक्ष कामकाज, अंतराळ संशोधनाची प्रक्रिया, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि भारताची अंतराळ क्षेत्रातील प्रगती जवळून पाहता येणार आहे. तसेच थेट इस्रोच्या वैज्ञानिकांशी संवाद साधून आपल्या शंकांचे निरसन करण्याची संधीही त्यांना मिळणार आहे.

सध्याचे युग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेतील गुणांपर्यंत मर्यादित न राहता चौकस बुद्धीने विचार करावा, यावर शाळेचा मुख्य भर असतो. विद्यार्थिनींच्या या विशेष निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर व मुख्याध्यापक जोसेफ के. जे. यांच्यासह सर्व शिक्षकवृंदांनी त्यांचे स्वागत केले.

# आयुष्मान भारत योजनेची लोकसंवाद मधून जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० सप्टेंबर**

आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना पाच लाख रुपयांपर्यंतच्या उपचाराचा लाभ मिळतो. त्यामुळे पात्र नागरिकांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन गुंडा उपकेंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन गरुड यांनी केले.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालयातर्फे 'लोकसंवाद-२०२६' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत वसमत तालुक्यातील आडगाव रंजेबुवा येथील शिवतांडव मित्र मंडळाच्या गणेशोत्सव कार्यक्रमात आज जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी डॉ. गरुड यांनी आयुष्मान भारत योजनेची सविस्तर माहिती दिली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू नागरिकांना गंभीर आजारांवरील उपचारासाठी या योजनेचा लाभ मिळू शकतो. पात्र लाभार्थ्यांना योजनेअंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंतचे उपचार मिळतात, आदी सविस्तर माहिती त्यांनी दिली.

योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, लाभार्थी पात्रता, अर्ज प्रक्रिया आणि योजनेचा लाभ घेण्यासाठी संपर्काची ठिकाणे याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. पात्र नागरिकांनी आयुष्मान भारत योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'लोकसंवाद-२०२६' उपक्रम उपयुक्त ठरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शिवतांडव मित्र मंडळाचे अभिमन्यू चव्हाण, आदिनाथ चव्हाण, कृष्णा चव्हाण, सतीश चव्हाण, ज्ञानेश्वर चव्हाण आणि तुकाराम चव्हाण यांनी सहकार्य केले.

सोलापूर
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# परिपत्रकाचा वाढदिवस साजरा करत शासनाचे लक्ष वेधले; हक्काच्या पाण्यासाठी संघर्ष तीव्र



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :**दि.२० सप्टेंबर - मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी मराठवाडा समन्यायी पाणी वाटप संघर्ष समितीच्या वतीने दि.२० रोजी सिंचन भवनासमोर परिपत्रकाचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळावे, नदीजोड प्रकल्पांना गती मिळावी आणि शासनाने ठोस कार्यवाही करावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

या वेळी डॉ. अण्णासाहेब शिंदे, दत्तात्रय पाटील, डॉ. सदाशिव पाटील, अशोक दाबके, माजी आमदार ॲड. विजयराव गव्हाणे, सुशीला मोराळे, पंडितराव शिंदे, प्रकाश आहेर आणि कडूबा कुमावत यांच्यासह संघर्ष समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मराठवाड्याच्या पाणीप्रश्नावर शासनाने यापूर्वी घेतलेल्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच नार-पार, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी यांसारख्या नदीजोड प्रकल्पांच्या माध्यमातून मराठवाड्याला पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शासन निर्णय होऊनही प्रत्यक्षात अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा मुद्दा उपस्थित करत, परिपत्रकाचा वाढदिवस साजरा करून शासनाचे लक्ष वेधण्यात आले. मराठवाड्याच्या पाणीप्रश्नावर केवळ आश्वासने न देता ठोस निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करावी, अशी भूमिका संघर्ष समितीच्या वतीने मांडण्यात आली.

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतीसाठी पाण्याची गरज आणि पाणीटंचाईचा प्रश्न लक्षात घेता नदीजोड प्रकल्पांना गती देणे आवश्यक असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. शासन या मागण्यांवर कोणती भूमिका घेते आणि पुढील काळात काय कार्यवाही करते, याकडे मराठवाड्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# OSD राजेंद्र साबळे यांच्या हस्ते 'खंडोबा-बानू विवाह सोहळ्या'च्या सजीव देखाव्याचे उद्घाटन

## सभापती अनिल मकरिये यांच्या मार्गदर्शनाखाली श्री ओम गणेश मंडळाचा आकर्षक उपक्रम

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** संभाजीपेठ येथील श्री ओम गणेश मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त साकारण्यात आलेल्या 'खंडोबा-बानू विवाह सोहळ्या'च्या सजीव देखाव्याचे उद्घाटन मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी (OSD) राजेंद्र साबळे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती तथा मंडळाचे मार्गदर्शक अनिल मकरिये यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटनानंतर मान्यवरांच्या हस्ते गणरायाची विधिवत आरती करण्यात आली. यावेळी मंडळाचे पदाधिकारी, सदस्य आणि परिसरातील गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्तिमय वातावरणात गणेशोत्सवाचा उत्साह अनुभवायला मिळाला.




मंडळाने यंदा 'खंडोबा-बानू विवाह सोहळा' या पौराणिक प्रसंगावर आधारित सजीव देखावा उभारला आहे. पौराणिक कथानकातील विविध प्रसंग, पात्रे आणि आकर्षक सजावटीच्या माध्यमातून हा विवाह सोहळा साकारण्यात आला आहे. त्यामुळे गणेशभक्तांसह नागरिकांचेही या देखाव्याकडे लक्ष वेधले जात आहे.

सभापती अनिल मकरिये यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी देखाव्यासाठी विशेष परिश्रम घेतले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरेसोबतच महाराष्ट्राच्या पौराणिक व सांस्कृतिक वारशाची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न मंडळाने केला आहे.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष श्रीधर बक्षी, उपाध्यक्ष प्रकाश कंठे, सचिव अजय परदेशी, कोषाध्यक्ष राजेश भोमा यांच्यासह समर्थ परदेशी, पवन मिठ्ठे, रोहित खडके, रक्षित सिद्धिवाल, संदीप मिठ्ठे, दीपक झुंझारकर, शंकर सुरसे, संतोष श्रावगे, अमित भोमा, सागर सुरळे, स्वप्नील उपाध्ये, राजेंद्र सुपेकर, प्रणव गादे, आयुष गादे, यश सरदे आणि प्रकाश तांबोळी उपस्थित होते. 'खंडोबा-बानू विवाह सोहळ्या'चा हा सजीव देखावा पाहण्यासाठी गणेशभक्त व नागरिकांनी आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन श्री ओम गणेश मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# विराज आय अँड डेंटल हॉस्पिटलमध्ये माजी केंद्रीय डॉ भागवत कराड यांच्या हस्ते गणेश आरती संपन्न



**बिडकीन दि २१ सप्टेंबर :** भारत सरकारचे माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवतजी कराड यांच्या हस्ते विराज आय अँड डेंटल हॉस्पिटल येथे श्री गणेश आरती करण्यात आली.यावेळी मुकुंदवाडी पोलीस ठाण्याचे *पोलीस निरीक्षक विवेकजी सोनवणे यांची हि उपस्थिती होती*. तसेच परिसरातील काही वंचित व गरजू मुलांनी गणेश आरतीमध्ये सहभाग घेऊन बाप्पांचे दर्शन घेतले. त्यानंतर . सुदर्शन कपाटे महाराज यांनी हॉस्पिटलला भेट देऊन या मुलांशी संवाद साधला आणि त्यांच्या सोबत काही वेळ प्रेमळ संवाद साधला. त्यांच्या या भेटीमुळे मुलांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले. डॉ विक्रांत जयसवाल आणि डॉ. राजेश्वरी परदेशी जयसवाल यांची उपस्थित होते.या प्रसंगी गणेशोत्सवाच्या माध्यमातून सेवा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संदेश देण्यात आला.आरती वेळी हॉस्पिटल मधील सर्व कर्मचारी उपस्थिती होती.

# दोन लाख घेऊन बँकेबाहेर पडताच चोरट्यांनी पळविली हातातील पैशांची बॅग

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.२० :** सोने तारण ठेवून मिळालेले दोन लाख रुपये घेऊन बँकेबाहेर पडलेल्या ६० वर्षीय शेतकऱ्याच्या हातातील पैशांची बॅग दोन अनोळखी दुचाकीस्वारांनी हिसकावून नेल्याची घटना शनिवारी (दि. १९) दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास लासूरनाका चौकातील बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीसमोर घडली. या घटनेत १ लाख ५० हजार रुपयांची रोकड लंपास झाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनायक पुंजाराम गोरे (वय ६०, रा. सोलेगाव, ता. गंगापूर) हे शनिवारी सकाळी १०.४५ वाजता बुलढाणा अर्बन पतसंस्थेत सोने गहाण ठेवून दोन लाख रुपये घेऊन बाहेर आले. त्यांच्याकडून भाचे प्रमोद पवार यांना ५० हजार रुपये देणे असल्याने त्यांनी दुपारी १२.२२ वाजता फोन करून बँकेसमोर बोलावून घेतले. गोरे यांनी पिशवीतील ५० हजार रुपये भाच्याला दिले.

त्यानंतर उर्वरित दीड लाख रुपये असलेली बॅग हातात घेऊन गोरे मोटारसायकलकडे जात असताना दुपारी १२.२५ ते १२.३० वाजेच्या दरम्यान दोन अनोळखी व्यक्ती दुचाकीवरून त्यांच्या जवळ आले. त्यांनी गोरे यांच्या हातातील पैशांची बॅग जोराचा हिसका देऊन हिसकावून घेतली आणि भेंडाळा फाट्याच्या दिशेने दुचाकीवरून पसार झाले.

गोरे यांनी दिलेल्या वर्णनानुसार दुचाकी चालकाचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे असून तो सडपातळ बांध्याचा, काळा शर्ट, फुल पॅन्ट व हेल्मेट परिधान केलेला होता. मागे बसलेल्या व्यक्तीचेही वय अंदाजे २५ ते ३० वर्षे असून त्याने काळा शर्ट, फुल पॅन्ट व लाल टोपी घातली होती.

चोरीस गेलेल्या रकमेत ५०० रुपयांच्या २०० नोटा आणि १०० रुपयांच्या ५०० नोटांचा समावेश असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. याप्रकरणी विनायक गोरे यांनी गंगापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मधुकर मोरे करीत आहेत.

# सितानाईक तांड्यात महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**कन्नड :**दि.२० सप्टेंबर - तालुक्यातील सितानाईक तांडा येथे एका महिलेचा विनयभंग केल्याची घटना १९ सप्टेंबर रोजी सकाळी घडली. याप्रकरणी कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १९ सप्टेंबर रोजी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास संबंधित महिला आपल्या घरी असताना आरोपीने तिला शिवीगाळ केली. याबाबत तिने आरोपीला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, यावेळी आरोपीने तिच्याशी धक्काबुक्की करीत तिचा विनयभंग केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.या घटनेनंतर महिलेने कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी संबंधित व्यक्तीविरुद्ध विनयभंगासह अन्य कलमांन्वये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कन्नड ग्रामीण पोलिस करीत आहेत.

# एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेसच्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

## डॉ.अभिजात शेठ यांची मुख्य अतिथी म्हणून उपस्थिती




**छत्रपती संभाजीनगर, दि.२० :** एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेसचा २४ व्या दीक्षांत समारंभात पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या ६९९ विद्यार्थ्यांना आज एमजीएम स्पोर्ट्स स्टेडियम येथे झालेल्या समारंभात पदवी प्रदान करण्यात आली.

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अध्यक्ष डॉ.अभिजात शेठ या पदवी प्रदान सोहळ्याचे प्रमुख अतिथी होते तर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकचे कुलगुरू प्रो.डॉ.व्यंकट शाहूबाई अर्जुनराव गिते हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. महात्मा गांधी मिशन ट्रस्टचे अध्यक्ष तथा कुलपती कमलकिशोर कदम, उपाध्यक्ष डॉ.पी. एम.जाधव, सचिव अंकुशराव कदम, एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेसचे कुलगुरू डॉ. शशांक दळवी, प्र-कुलगुरू डॉ.नितीन कदम, वैद्यकीय संचालक डॉ.सुधीर कदम, विश्वस्त डॉ.अमरदीप कदम, प्रा. ममिल्ला रवी शंकर, डॉ.प्रवीण शिनगारे, डॉ. विजय कदम, अशोक पाटील, डॉ. राहुल कदम, डॉ.मधुरा श्री, अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा, अधिष्ठाता डॉ. जी. एस. नारशेट्टी, अधिष्ठाता डॉ. प्रभा दसिला, अधिष्ठाता डॉ.मानसी ठाकूर, अधिष्ठाता डॉ.निर्मल कासेकर, उपअधिष्ठाता डॉ.प्रविण सूर्यवंशी, कुलसचिव डॉ.राजेश गोयल, परीक्षा नियंत्रक डॉ.परिणीता सामंत, उपकुलसचिव डॉ.राजेश कदम आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी, बोलताना राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांनी पदवी प्राप्त करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत हा दिवस त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण आणि निर्णायक क्षण असल्याचे सांगितले. वैद्यकीय क्षेत्रात ज्ञानासोबतच सामाजिक जबाबदारी आणि उत्तरदायित्वाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

# बॅग-कंपास वाटपासह शिष्यवृत्ती गुणवंतांचा गौरव; समर्पण फाउंडेशनच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२० सप्टेंबर

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ देण्यासाठी आणि त्यांच्या गरजा ओळखून त्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने समर्पण फाउंडेशनतर्फे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव तसेच जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,सोयगाव उर्दू येथे विद्यार्थ्यांना बॅग व कंपासचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारा आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला आधार देणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

समर्पण फाउंडेशनने केवळ साहित्याचे वाटप न करता विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याची सकारात्मक भूमिका या उपक्रमातून अधोरेखित केली.आर्थिक किंवा शैक्षणिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने समर्पण फाउंडेशनचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी असून, सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या भवितव्याला हातभार लावल्याबद्दल फाउंडेशनचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले.

कार्यक्रमासाठी केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने मार्गदर्शन करणाऱ्या केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. तसेच केंद्रीय मुख्याध्यापक हरिदास काटोले यांच्या शैक्षणिक कार्याचे आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचेही उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यक्रमास दोन्ही शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भगवान सोनवणे व जुबेर शाहा सह शालेय समिती सदस्य यांच्यासह अनेक पालक उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना बॅग व कंपासचे वाटप करण्यात आले.

शिष्यवृत्ती गुणवंतांचा गौरव

यावेळी शाळेतील शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही समर्पण फाउंडेशनतर्फे विशेष गौरव व कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाची दखल घेऊन त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या मेहनतीला प्रोत्साहन देण्याची फाउंडेशनची भूमिका विशेष उल्लेखनीय ठरली.

शाळेचे मुख्याध्यापक हरीदास काटोले व शेख विकार व बिलाल बागवान यांनी समर्पण फाउंडेशनच्या या स्तुत्य उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देतानाच गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव केल्याबद्दल त्यांनी समर्पण फाउंडेशनचे विशेष आभार मानले.

विद्यार्थ्यांच्या हातात शिक्षणाचे साहित्य आणि त्यांच्या मनात यशाचे स्वप्न निर्माण करण्यासाठी पुढाकार घेणारे समर्पण फाउंडेशनचे हे कार्य निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी फाउंडेशनने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असून, अशा उपक्रमांची समाजाला आज नितांत गरज आहे. यावेळी उपस्थित केंद्रप्रमुख फिरोज तडवी, मुख्याध्यापक हरिदास काटोले, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष भगवान सोनवणे,किरण पाटील, मंगला बोरसे,सविता पाटील, रामचंद्र महाकाळ,गणेश बाविस्कर अंकुश काळे,प्रतिभा कोळी,सुरेखा चौधरी,कला शिक्षक विवेक महाजन,अनिल देसाई,कार्यानुभव शिक्षक तानाजी चव्हाण व पालक वर्ग उपस्थित होता

# हँडबॉलमध्ये छत्रपती संभाजीनगरच्या दोन खेळाडूंची क्रीडा प्रबोधिनीत निवड

तभा वृत्तसेवा




**छत्रपती संभाजीनगर :** हँडबॉलमधील कौशल्य चाचणीत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल छत्रपती संभाजीनगरचा सविधान निकाळजे आणि वैजापूरचा वेदांत घुले या दोन युवा खेळाडूंची नागपूर येथील क्रीडा प्रबोधिनीत निवड झाली आहे. कौशल्य चाचणीतील कामगिरीच्या आधारे ही निवड करण्यात आली.

सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि उत्कृष्ट क्रीडा कौशल्याच्या जोरावर दोन्ही खेळाडूंनी ही कामगिरी केली. सविधान निकाळजे याला सुयश साळवे, तर वेदांत घुले याला अक्षय नवले यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही खेळाडूंनी नियमित सराव करून आपल्या खेळात प्रगती साधली.

या निवडीबद्दल महाराष्ट्र हँडबॉल असोसिएशनचे अध्यक्ष तथा कॅबिनेट मंत्री अतुल सावे, जिल्हा हँडबॉल असोसिएशनचे अध्यक्ष माजी आमदार श्रीकांत जोशी आणि सचिव सत्यजित पगारे यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले.

नागपूर येथील क्रीडा प्रबोधिनीत झालेली निवड ही दोन्ही खेळाडूंच्या क्रीडा कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. आगामी काळात उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा क्रीडा क्षेत्रातून व्यक्त करण्यात आल्या.

# महिंद्रातर्फे एक्सयूवी 3एक्सओ रेवएक्स श्रेणीचा विस्तार

**मुंबई:** महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडने आज एक्सयूवी 3एक्सओ रेवएक्स एज सादर करण्याची घोषणा केली. त्याची सुरुवातीची किंमत 9.39 लाख रु. आहे. यामुळे प्रीमियम वैशिष्ट्ये ग्राहकांसाठी अधिक सुलभ झाली असून ग्राहकांना मिळणाऱ्या मूल्याची नवी उंची निश्चित झाली आहे. जोडीला कंपनीने पेट्रोल ऑटोमॅटिक ट्रान्समिशनसह एक्सयूवी 3एक्सओ रेवएक्स एम(ओ) देखील सादर केली आहे.2024 मध्ये सादर झाल्यापासून एक्सयूवी 3एक्सओ ने अत्याधुनिक एसयूव्ही ग्राहकांच्या अपेक्षांपलीकडे कामगिरी केली आहे. आपल्या वेगळ्या आणि उठावदार डिझाइनसह, प्रीमियम इंटीरियर, आरामदायी राइड, अत्याधुनिक तंत्रज्ञान, रोमांचक कामगिरी आणि अतुलनीय सुरक्षेमुळे ती खऱ्या अर्थाने या श्रेणीतील बदल घडवून आणणारी एसयूव्ही ठरली आहे.

# 'नथिंग स्मॉल अबाऊट अस' जाहिरात मोहीम सुरु

**मुंबई:** : उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड या 26 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील 800 हून अधिक शाखांच्या माध्यमातून 1 कोटीहून अधिक ग्राहकांना सेवा देणाऱ्या बँकेने 'नथिंग स्मॉल अबाऊट अस' ही आपली नवीन ब्रँड मोहिम सुरु करत असल्याचे जाहीर केले आहे. या मोहिमेत प्रसिद्ध अभिनेते आणि पद्मश्री पुरस्कारप्राप्त आर. माधवन यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात आली आहे.

# प्लास्टिकला फाटा; नैसर्गिक फुलांनी सजल्या ज्येष्ठा-गौरी



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** इंदिरानगर, न्यू बाजीपुरा येथील कु. ईशानी वनिता गणेश पुजारी यांच्या घरी ज्येष्ठा-गौरीचे भक्तिमय वातावरणात आगमन झाले. यंदाच्या सजावटीचे वैशिष्ट्य म्हणजे प्लास्टिकला पूर्णपणे फाटा देत नैसर्गिक फुले, आंब्याची पाने आणि पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

गौरीच्या सजावटीसाठी विविध रंगांची नैसर्गिक फुले आणि फुलांचे हार वापरण्यात आले आहेत. आंब्याच्या पानांची केलेली सुबक मांडणी आणि फुलांची आकर्षक आरास यामुळे गौरीचे रूप अधिकच प्रसन्न दिसत आहे. पारंपरिक पद्धतीने केलेल्या या सजावटीत साधेपणा आणि सौंदर्य यांचा सुरेख मिलाफ पाहायला मिळतो.

विशेष म्हणजे, उत्सवाच्या सजावटीत प्लास्टिकचा वापर टाळून नैसर्गिक साहित्याला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे भक्ती, परंपरा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी ही ज्येष्ठा-गौरीची आरास परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.

# जनाबाई मरकड यांचे निधन



सिल्लोड प्रतिनिधी

सिल्लोड तालुक्यातील मंगरूळ येथील रहिवासी जनाबाई नामदेव मरकड यांचे वृद्ध काळाने निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय 90 वर्षाचे होते त्यांच्या पाश्चात्य चार मुले दोन मुली जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे.


## जाहिर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी क्र. अर्ज क्र.१२८/२०२६

अर्जदार -१) चंद्रकला भगवान निकम, वय-७०वर्ष धंदा-घरकाम २) गणेश भगवान निकम वय-४२वर्ष धंदा-शेती वरील दोन्ही रा. निंभोरा. ता. सोयगाव, जि.छ. संभाजीनगर ३) सुषमा कैलास पाटील, वय-४६ वर्ष धंदा-घरकाम रा. गांधी चौक, गिरड ता. भडगाव जि. जळगाव ४) वर्षा भारत पाटील, वय-४४वर्ष धंदा-घरकाम रा-हिंगोणे खु:, ता.चाळीसगाव जि. जळगाव.

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरण:- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील कै. भगवान रामभाऊ पाटील यांचा दिनांक-२४/०४/२०२६ रोजी वृद्धपकाळाणे मौजे निंभोरा ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. भगवान रामभाऊ पाटील यांचे एकमेव वारस असून

त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०१ /१०/२०२६. आज दि.१५/०९ /२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशानुसार

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क- स्तर सोयगाव

## जाहिर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र.१७७/२०२६

अर्जदारः-१) सुमित्राबाई शिवाजी साकळे वय-४२ वर्ष धंदा-घरकाम २) दीपक शिवाजी साकळे वय-२३ वर्ष धंदा-शिक्षण ३) मनोज शिवाजी साकळे, वय २० वर्ष धंदा-शिक्षण ४) सुमनबाई नामदेव साकळे, वय-७० वर्ष धंदा-घरकाम रा. पळसखेडा ता. सोयगाव, जि.छ. संभाजीनगर

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरण:- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील व अर्जदार क्र.४ यांचा मुलगा कै. शिवाजी नामदेव साकळे यांचा दिनांक-०१/०१/२०२६ रोजी हृदय विकाराने शासकीय महाविद्यालय व रुग्णालय छ. संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. शिवाजी नामदेव साकळे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १२/१०/२०२६. आज दि.१५/०९/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशानुसार

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क- स्तर सोयगाव

## //जाहिर प्रगटन//

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. १४६ /२०२६

अर्जदारः-१) इसा गुलाब तांबोळी वय-६५ वर्ष धंदा-शेती २) शकील इसा तांबोळी वय-३१ वर्ष धंदा-शेती ३) सिमरन इसा तांबोळी वय-२४ वर्ष धंदा-घरकाम वरील १ ते ३ रा. तिडका, ता. सोयगाव जि. छ. संभाजीनगर

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरण:- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे अर्जदार क्र. १ यांचा मुलगा व अर्जदार क्र. २ व ३ यांचे भाऊ मयत समीर इसा तांबोळी यांचा दिनांक ०१/०९/२०२५ रोजी मौजे तिडका, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत समीर इसा तांबोळी यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ३ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २१/०९/२०२६. आज दि.१५/०९/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशानुसार

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क- स्तर सोयगाव

## // जाहिर प्रगटन//

**मा.दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र.१५७/२०२६

अर्जदारः- १) नकुबाई कैलास सपकाळे, वय-४६वर्ष धंदा-घरकाम २) कै. ईश्वर त्र्यंबक ब्राम्हणे, (मयत तर्फे वारस) २.१) सरलाबाई ईश्वर ब्राम्हणे वय ६० वर्ष धंदा-घरकाम २.२) विलास ईश्वर ब्राम्हणे वय-३० वर्ष धंदा-मजुरी २.३) सोनिराम ईश्वर ब्राम्हणे वय-२६ वर्ष धंदा-मजुरी २.४) वैशाली वाल्मिक अहिरे वय-२८वर्ष धंदा-घरकाम सर्व रा. वरठाण ता.सोयगाव जि. छ. संभाजीनगर -

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरण:- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अँड. एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ व २ यांची आई व अर्जदार क्र. २.१ यांची सासू व अर्जदार क्र. २.२ व २.३ यांची आजी कै. सुबाबाई त्र्यंबक ब्राम्हणे यांचा दिनांक-१०/०४/२०१७ रोजी मौजे वरठाण ता. सोयगाव, जि.छ. संभाजीनगर येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते २.४ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते २.४ हे कै. सुबाबाई त्र्यंबक ब्राम्हणे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते २.४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते २.४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०१ /१०/२०२६. आज दि.१५/०९/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशानुसार

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क- स्तर सोयगाव

## //जाहिर प्रगटन//

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र.१६४/२०२६

अर्जदारः-१) रंजना कडूबा मोरे, वय-६३वर्ष धंदा-घरकाम रा. पोहरी बु!. ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर २) विनोद कडूबा मोरे वय-४५वर्ष धंदा-खाजगी नोकरी रा.एच. नं.५/८/१५७६ गल्ली नं.३, दुर्गा माता मंदिराजवळ, चौधरी कॉलनी, चिकलठाणा, छ. संभाजीनगर. ३) दिपक कडूबा मोरे, वय- ४० वर्ष धंदा-खाजगी नोकरी रा.-प्लॉट नं.१३अ, राज नगर, मुकुंदवाडी, छ. संभाजीनगर ४) जयाबाई विनोद सोनवणे, वय-४३वर्ष धंदा-घरकाम रा-ओझर, ता.पाचोरा जि. जळगाव

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरण:-वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील कै. कडूबा अहिलाजी मोरे यांचा दिनांक-२४/०८/२०२५ रोजी वृद्धपकाळाणे मौजे पोहरी बु. ता.सोयगाव, जि.छ. संभाजीनगर येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. कडूबा अहिलाजी मोरे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख २८/०९/२०२६. आज दि१५/०९/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशानुसार

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क- स्तर सोयगाव

## जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र.१५१/२०२६

अर्जदारः-१) अमिनाबी वलीमोहम्मद तडवी वय-७० वर्ष धंदा-घरकाम २) रमजान वलीमोहम्मद तडवी वय-५०वर्ष धंदा-शेती ३) सलीम वलीमोहम्मद तडवी, वय ४८ वर्ष धंदा-शेती ४) भुरा वलीमोहम्मद तडवी, वय-४६ वर्ष धंदा-शेती ५) जुम्मा वलीमोहम्मद तडवी, वय-४४ वर्ष धंदा-शेती रा. पळसखेडा ता. सोयगाव, जि.छ.संभाजीनगर -

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरणः- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील मयत वलीमोहम्मद बाबू तडवी यांचा दिनांक ०८/०८/२०२४ रोजी मौजे पळसखेडा, ता. सोयगाव, जि.छ. संभाजीनगर येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत वलीमोहम्मद बाबू तडवी यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ५ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ५ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख २८/०९/२०२६. आज दि१५/०९/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशानुसार

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क- स्तर सोयगाव

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

विश्लेषण

# समान नागरी कायदा आणि अमित शाह

श्यामकांत जहागीरदार


२०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधी देशातील रालोआशासित २१ राज्यांत समान नागरी कायदा लागू झालेला असेल, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नुकतीच मुंबईत केली आहे. विशेष म्हणजे समान नागरी कायद्याची सुरुवात सर्वप्रथम भाजपाशासित उत्तराखंडने केली आहे. भाजपाशासित महाराष्ट्रासह अन्य राज्यानींही या दिशेने पावले उचलली आहेत.

समान नागरी कायदा म्हणजे देशातील सर्व धर्मांच्या नागरिकांसाठी एकच कायदा लागू असणे. अशी मागणी करण्याची वेळ आली, याचाच अर्थ देशात सध्या सर्व धर्मांना लागू होईल, असा एक कायदा नाही. समान नागरी कायदा देशात लागू झाल्यानंतर सर्व जाती-धर्माच्या लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची आणि भारतीयत्वाची भावना निर्माण होणार आहे.

देशात कायद्याचे सध्या दोन गटांत वर्गीकरण केले जाते, पहिला नागरी म्हणजे दिवाणी कायदे, यात लग्न, घटस्फोट, संपत्ती आणि वारसाहक्क यांचा समावेश होतो. फौजदारी कायदा मात्र देशातील सर्व जाती-धर्माच्या लोकांना सारखा लागू होतो. भारतात मुस्लिम, ख्रिश्चन आणि पारशी समुदायासाठी त्यांचे व्यक्तिगत कायदे (पर्सनल लॉ) आहेत. हिंदू सिव्हिल लॉ अंतर्गत हिंदू, शीख, जैन आणि बौद्ध हे समुदाय येतात. मुस्लिम पर्सनल लॉ शरियतचा कायदा म्हणून ओळखला जातो. मुस्लिम पर्सनल लॉमध्ये वडिलांच्या आणि पतीच्या संपत्तीत महिलांना अधिकार नाही, याउलट हिंदू सिव्हिल लॉमध्ये वडिलांच्या आणि पतीच्या संपत्तीत महिलांना समान अधिकार आहे. देशात समान नागरी कायदा लागू झाल्यावर विवाह, घटस्फोट, वारसाहक्क आणि संपत्तीचा अधिकार यात सर्व धर्माच्या महिलांना समान अधिकार मिळणार आहे. त्यामुळे देशात समान नागरी कायदा लागू होणे हा मुस्लिम महिलांच्या फायद्याच्या दृष्टीने अतिशय आवश्यक आहे. मात्र मुस्लिम महिलांना त्यांच्या घटनादत्त अधिकारापासून वंचित ठेवण्यासाठी सर्व मुस्लिम संघटनांनी आणि नेत्यांनी या कायद्याला विरोध करण्याची भूमिका घेतली आहे.

देशात समान नागरी कायदा लागू करण्याची जबाबदारी घटनेने राज्यांवर सोपवली आहे. त्यामुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधी रालोआशासित राज्यात हा कायदा लागू झालेला असेल, असे गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले आहे. मुस्लिम आणि ख्रिश्चन समुदाय भारतात अल्पसंख्यक असले तरी आंतरराष्ट्रीय पातळीचा विचार केला तर हे समुदाय मोठ्या प्रमाणात आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या काही प्रथा आणि परंपरा आहेत. समान नागरी कायद्यामुळे त्याला छेद जाईल, अशी भीती या दोन्ही समुदायांना भेडसावते आहे. त्यामुळे या मुद्यावर हे समुदाय आक्रमक आहेत. मुस्लिम समाजाने तर रस्त्यावर उतरून समान नागरी कायद्याला विरोध करण्याची भूमिका घेतली आहे.

समान नागरी कायदा हा भाजपाच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळ्याचा विषय आहे. भाजपाच्या स्थापनेपासून ज्या तीन मुद्यांसाठी भाजपाने सातत्याने संघर्ष केला, ते म्हणजे जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द करणे, अयोध्येतील रामजन्मभूमीवर राम मंदिराची उभारणी करणे तसेच देशात समान नागरी कायदा लागू करणे. यातील पहिल्या दोन मुद्यांसाठी भाजपाने दीर्घकाळ संघर्षही केला. २०१४ मध्ये केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यानंतर ३७० कलम रद्द झाले आणि अयोध्येत राममंदिराची उभारणीही झाली. भाजपाचे तीनपैकी दोन प्रमुख मुद्दे प्रत्यक्षात आले आहेत. भाजपाचा तिसरा म्हणजे समान नागरी कायद्याचा मुद्दा अद्याप प्रलंबित आहे.




२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या निवडणूक जाहीरनाम्यात समान नागरी कायदा हा मुद्दा होता. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ४४ मध्ये राज्याच्या धोरणाचे मार्गदर्शक तत्त्व म्हणून समान नागरी कायद्याचा समावेश करण्यात आला आहे. समान नागरी कायदा देशात लागू होणार नाही, तोपर्यंत देशातील महिलांना समान अधिकार मिळणार नाही, अशी भाजपाची भूमिका आहे.

समान नागरी कायदा देशात लागू व्हावा, ही सर्वसामान्य नागरिकाची भावना आहे. मात्र यात काही आव्हानेही आहेत. समान नागरी कायदा लागू व्हायला हिंदूंचा विरोध नाही, उलट असा कायदा लागू होणे ही काळाची गरज आहे. मात्र अल्पसंख्यक असलेल्या मुस्लिम आणि ख्रिश्चन समुदायाकडून याला विरोध होऊ शकतो. त्यामुळे समान नागरी कायद्याचा मुद्दा भाजपाला वाटतो तितका सोपा नाही.

विशेष म्हणजे या मुद्यावरून रालोआतही मतभेद असल्याचे दिसून येत आहे. तेलगू देसम हा रालोआतील सध्याचा सर्वांत मोठा पक्ष आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर तेलगू देसम रालोआत सहभागी झाला. पण रालोआत सहभागी होताना तेलगू देसमने समान नागरी कायद्याच्या मुद्यावर आपली भूमिका भाजपा नेतृत्वाकडे स्पष्ट केली होती. समान नागरी कायद्याचा मुद्दा उपस्थित झाला तर तेलगू देसम देशातील मुस्लिम समाजासोबत उभा राहील, असे तेलगू देसमचे सर्वेसर्वा आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी स्पष्ट केले होते.

समान नागरी कायद्याच्या मुद्यावर रालोआतील दुसरा मोठा पक्ष असलेल्या जदयुनेही वेगळी भूमिका घेतली आहे. या मुद्यावर आम्ही अमित शाह यांच्याशी चर्चा करू, असे जदयुचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष संजय झा यांनी म्हटले आहे. केंद्रीय मंत्री असलेले लोजपाचे चिराग पासवान यांची भूमिकाही या मुद्यावर फारशी अनुकूल नाही. समान नागरी कायद्याचा मसुदा आधी सरकारने जाहीर करावा, त्यानंतर आम्ही आमची भूमिका ठरवू, असे चिराग पासवान यांनी म्हटले आहे.

समान नागरी कायदा लागू करण्याची मागणी भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी लोकसभेत केली होती. हा कायदा लागू झाला तर देशात कोणी हिंदू, मुस्लिम वा ख्रिश्चन असणार नाही तर सर्व भारतीय असतील, असे दुबे यांनी म्हटले होते.

देशाच्या वेगवेगळ्या भागात विवाह, घटस्फोट आणि वारसाहक्काबाबत वेगवेगळ्या प्रथा-परंपरा आहेत. मुस्लिम समाजात तीन तलाकसारखी अनिष्ट आणि महिलांवर अन्याय करणारी प्रथा आहे. तीन तलाकविरुद्धचा कायदा संसदेने पारित केला असला तरी मुस्लिम समाजातून तीन तलाकची प्रथा अद्याप संपली नाही. यासाठी देशात समान नागरी कायदा लागू होण्याची आवश्यकता आहे.

विशेष म्हणजे समान नागरी कायद्यामुळे आदिवासी समुदायावर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे आदिवासी समुदायातूनही या कायद्याला विरोध सुरू झाला. त्यामुळे आदिवासींना यातून वगळण्याचे आश्वासन गृहमंत्री अमित शाह यांना द्यावे लागले. शरियत कायदा ही अल्लाहची देणगी आहे. त्यामुळे आम्ही हा सोडून दुसरा कोणताच कायदा मानणार नाही, अशा इशारा मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड देत आहे. शरियत कायदा हा कुराण आणि हदीसवर आधारित आहे. त्यामुळे यात दुरुस्ती करण्याचा अधिकार जगातील कोणत्याच संसदेला नाही आणि एखाद्या संसदेने अशी दुरुस्ती केली तरी आम्ही ती मानणार नाही, असा इशारा मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड देत आहे. हा एकप्रकारे सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

गृहमंत्री अमित शाह यांची घोषणा हा दबाव झुगारून देण्याचा प्रयत्न आहे, यात शंका नाही. त्यामुळे सरकारने कोणत्याही जाती-धर्माच्या लोकांच्या दबावाला बळी न पडता समान नागरी कायदा देशात लागू केला पाहिजे, ती काळाची तर गरज आहेच, पण देशातील महिलांच्या दृष्टीने, मग त्या कोणत्याही धर्माच्या असो, अतिशय आवश्यक आहे. महिला आरक्षणानंतर देशातील महिलांसाठी ठरणारी ही दुसरी मोठी भेट म्हटली पाहिजे. ■

९८८१७१७८१७

---

तंत्रवेध

# एआयचा फुगा की नव्या संधींचे दालन?

डॉ. दीपक शिकारपूर

काही वर्षांपूर्वी माहिती तंत्रज्ञान क्षेत्राकडे पाहताना ‘कोडिंग शिका म्हणजे नोकरी पक्की’ असा एक सोपा आणि एकसुरी मंत्र दिला जात होता. आज त्याची जागा एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) शिका म्हणजे भविष्य ‘सुरक्षित’ या नवीन घोषणेने घेतली आहे. अनेक विद्यार्थी, पालक, शिक्षणतज्ज्ञ आणि व्यावसायिक प्रशिक्षण संस्था कृत्रिम बुद्धिमत्तेलाच यशाची अंतिम आणि जादूची किल्ली समजू लागल्या आहेत. पण तंत्रज्ञानाचा आणि मानवी इतिहासाचा अभ्यास केला तर एक गोष्ट स्पष्ट दिसते. कोणत्याही नव्या आणि क्रांतिकारक तंत्रज्ञानाच्या सुरुवातीला अपेक्षांचा एक प्रचंड फुगा तयार होतो. काही काळानंतर तो फुटतो आणि वास्तवाची खरी परीक्षा सुरू होते. भूतकाळात इंटरनेटचे आगमन, डॉटकॉम क्रांती, ब्लॉकचेन आणि अलिकडील मेटाव्हर्सबाबत नेमकी हीच प्रक्रिया घडली होती. सुरुवातीला या तंत्रज्ञानाबद्दल अफाट उत्सुकता आणि अवास्तव दावे केले गेले, नंतर बाजारपेठ स्थिर झाली आणि केवळ खरी मूल्ये निर्माण करणारी तंत्रज्ञानेच टिकून राहिली. कृत्रिम बुद्धिमत्तेबाबतही आज नेमकी अशीच प्रक्रिया सुरू आहे. परंतु, याचा अर्थ असा मुळीच नाही की कृत्रिम बुद्धिमत्ता संपणार आहे किंवा तिचे अस्तित्व मिटणार आहे. उलट, एआय ही काळाची गरज बनून प्रत्येक उद्योगाचा, दैनंदिन कामकाजाचा आणि मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग होणार आहे. मात्र, बदलणार आहे ती नोकरी मिळवण्याची आणि टिकवण्याची धडपड. ‘मला एआय वापरता येते’ किंवा ‘मी एआयचे टूल वापरू शकतो’ एवढ्या प्राथमिक कौशल्यावर नोकरी मिळण्याचे दिवस लवकरच संपतील.

भविष्यकालीन उद्योगांना अशा व्यक्ती हव्या असतील ज्या क्लिष्ट समस्यांचे अचूक विश्लेषण करू शकतील, संकटसमयी योग्य आणि नैतिक निर्णय घेऊ शकतील, विविध क्षेत्रांमधील लोकांसोबत संघात काम करू शकतील आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ग्राहकांच्या व्यवसायाची खरी तांत्रिक आणि व्यावहारिक गरज समजू शकतील. एआय हा तंत्रज्ञानाच्या प्रवासात केवळ एक सक्षम सहायक असेल; पण माणूसच अंतिम निर्णय घेणारा, निकालांची जबाबदारी स्वीकारणारा आणि व्यवसायात प्रत्यक्ष मूल्य निर्माण करणारा अधिकारी असणार आहे. आज आयटी आणि इतर उद्योगांमधील अनेक आघाडीच्या कंपन्या स्पष्टपणे सांगत आहेत की, त्यांना केवळ कागदी पदव्या, उच्च गुण किंवा महागडी प्रमाणपत्रे नकोत तर कामाच्या ठिकाणी येणाऱ्या प्रत्यक्ष समस्या सोडवण्याची क्षमता हवी आहे. एखाद्या ग्राहकाच्या व्यवसायातील नेमकी अडचण काय आहे हे समजून घेणे, त्यावर व्यावहारिक आणि तांत्रिक उपाय शोधणे, उत्पादनाचा खर्च कमी करणे, कामाची उत्पादकता वाढवणे आणि ग्राहकाला पूर्ण समाधान देणे हीच खरी आणि शाश्वत कौशल्ये आहेत. उद्योगात दीर्घकालीन यश मिळवण्यासाठी केवळ तांत्रिक कौशल्ये पुरेशी नसतात, तर योग्य दृष्टिकोन, त्यागाची वृत्ती आणि मदतीची भावना हे गुण अत्यंत निर्णायक ठरतात. आज उद्योगांना ‘मी सर्व जाणतो’ या अहंकारी वृत्तीपेक्षा शिकण्याची तयारी असणारी, चुका मान्य करणारी आणि सकारात्मक विचार करणारी माणसे हवी आहेत. अडचणीच्या वेळी तक्रार करण्याऐवजी उपायांवर लक्ष केंद्रित करणारा दृष्टिकोनच कर्मचाऱ्याला उंचावर नेतो.

यशाचा कोणताही सोपा मार्ग नसतो. करीअरच्या सुरुवातीच्या काळात किंवा मोठ्या प्रकल्पांच्या वेळी आपल्या सोयीचा, वेळेचा आणि कम्फर्ट झोनचा त्याग करून जास्तीत जास्त काम शिकणे आणि जबाबदारी घेणे आवश्यक असते. कठोर परिश्रम आणि समर्पणाची तयारीच भविष्यातील मोठ्या संधींची पायाभरणी करते. आजचे मोठे प्रकल्प सांघिक प्रयत्नांवर चालतात. सहकाऱ्यांना मदत करणे, आपले ज्ञान इतरांशी वाटून घेणे आणि टीममधील प्रत्येकाला सोबत घेऊन पुढे जाण्याची वृत्ती व्यक्तीला खऱ्या अर्थाने नेतृत्वगुण मिळवून देते. संकटात सापडलेल्या सहकाऱ्याला किंवा ग्राहकाला पुढे होऊन मदत करणारा कर्मचारी किंवा अधिकारीच संस्थेसाठी खरे भांडवल ठरतो. कृत्रिम बुद्धिमत्ता काही सेकंदांमध्ये हजारो ओळींचे कोडिंग लिहू शकते किंवा माहितीचे विश्लेषण करू शकते, पण ग्राहकाची वास्तविक मानसिक आणि व्यावसायिक समस्या काय आहे, हे समजून घेण्यासाठी मानवी विचारशक्ती, सहानुभूती आणि प्रत्यक्ष अनुभवच आवश्यक असतो. हार्डवेअर आणि नेटवर्किंग तज्ज्ञांची गरज आज जगातील प्रत्येक क्षेत्रात आहे आणि ती कधीही संपणारी नाही. भारतात सध्या मोठ्या प्रमाणावर जागतिक क्षमता केंद्रे अर्थात ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स उभी राहत आहेत. बँकिंग, विमा, आरोग्यसेवा, वाहन उद्योग, औषधनिर्मिती, उत्पादन, किरकोळ व्यापार आणि ऊर्जा अशा विविध क्षेत्रांमधील जगभरातील अग्रगण्य कंपन्या भारतातून त्यांचे मुख्य संशोधन, अभियांत्रिकी, डेटा विश्लेषण, सायबर सुरक्षा आणि डिजिटल परिवर्तनाची कामे करत आहेत. याचाच अर्थ असा की, भविष्यात केवळ माहिती तंत्रज्ञानाचे ज्ञान पुरेसे राहणार नाही. ज्या तंत्रज्ञाला आयटीबरोबरच बँकिंग आणि वित्तीय सेवा, आरोग्यसेवा, उत्पादन अभियांत्रिकी, औषधनिर्मिती, पुरवठा साखळी यासारख्या प्रत्यक्ष उद्योगक्षेत्रांचे सखोल ज्ञान असेल, त्याला बाजारात प्रचंड मागणी असेल. आज भारतीय तंत्रज्ञांसाठी आणि विशेषतः माहिती तंत्रज्ञान व इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी जपान ही एक अभूतपूर्व सुवर्णसंधी ठरत आहे. जपानमध्ये वेगाने वृद्ध होत चाललेली लोकसंख्या, तिथल्या उद्योगांमधील डिजिटल परिवर्तनाची प्रचंड गरज आणि कुशल मनुष्यबळाची तीव्र कमतरता यामुळे भारतीय अभियंते, आयटी व्यावसायिक, नेटवर्किंग आणि हार्डवेअर तज्ज्ञ आणि सायबर सुरक्षा तज्ज्ञांसाठी दारे खुली झाली आहेत. मात्र, या संधीचा फायदा घेण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान असून चालणार नाही. विद्यार्थ्यांना जपानी भाषा आत्मसात करावी लागेल तसेच तिथली अत्यंत शिस्तबद्ध कार्यसंस्कृती, वेळेचे काटेकोर पालन आणि गुणवत्तेबाबत तडजोड न करण्याची मानसिकता अंगीकारावी लागेल. जपानप्रमाणेच जर्मनी, दक्षिण कोरिया आणि युरोपमधील इतर देशांमध्येही तंत्रज्ञानाबरोबरच स्थानिक भाषेचे ज्ञान असलेल्या कुशल व्यावसायिकांना मोठे प्राधान्य दिले जात आहे.

भविष्यात परकीय भाषा ही केवळ अतिरिक्त पात्रता राहणार नाही, तर उच्च वेतनाच्या जागतिक करीअरचे मुख्य प्रवेशद्वार ठरेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा फुगा फुटेल म्हणजे हे तंत्रज्ञान नष्ट होईल किंवा बंद पडेल असे मुळीच नाही. फुटेल तो केवळ अवास्तव अपेक्षांचा आणि चुकीच्या समजांचा फुगा. आपल्या क्षेत्राचे सखोल आणि पायाभूत ज्ञान असेल, सतत नवीन गोष्टी शिकण्याची आणि बदलण्याची वृत्ती असेल, योग्य आणि सकारात्मक दृष्टिकोन असेल, उद्योगांना प्रत्यक्ष उपयोगी पडणारी व्यावहारिक कौशल्ये असतील ते स्पर्धेत टिकतील. त्यामुळे हा इशारा किंवा वास्तव विद्यार्थ्यांना घाबरवण्यासाठी किंवा भीती निर्माण करण्यासाठी नाही, तर योग्य वेळी जागे करण्यासाठी आहे. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

# रविवारची पत्रे

## तव्यावरची पोळी

‘न गृहं गृहिमित्याहुगृहिणी गृहमुच्यते’

गृहिणीशिवाय घराला शोभा नाही. गृहिणी नसलेले घर अरण्यासारखे वाटते. गृहिणीमुळे घराला घरपण येते. गृहिणीला गृहलक्ष्मी म्हणून गौरवले तर जाते पण ‘नाव सोनुबाई, हाती कथलाचा वाळा’ अशी गृहलक्ष्मीची अवस्था असते. घरी असणाऱ्या गृहलक्ष्मीची म्हणजे फक्त गृहिणीच असणाऱ्या स्त्रियांच्या कामाची व्याप्ती ‘रांधा, वाढा, उष्टी काढा’ एवढ्या पुरतीच मर्यादित नसते. सकाळी उठल्यापासून रात्री सगळ्यांची निजानीज होईपर्यंत तिची कामे संपतच नाहीत. शिवाय वर ‘तू तर घरीच असते’ हे ऐकावे लागते.

शिक्षणाने स्त्रियांच्या मतीला गती मिळाली, कल्पनेला आकाश मिळाले आणि स्त्रिया स्वतंत्र झाल्या, सक्षम झाल्या, असे आपण म्हणतो, पण आपल्या आसपास अजूनही अनेक पुरुष असे आहेत की, जे ‘रांधा, वाढा, उष्टी काढा’ हे स्त्रियांचेच काम आहे असे मानतात. मग घरातील स्त्रीला बाहेर कितीही मानाचे स्थान असो! सावित्रीबाईंनी स्त्रियांना शिक्षण देऊन चूल आणि मूल हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र आहे, या परंपरेला पहिला जोरदार धक्का दिला. जोतिबाच्या सोबतीने स्वतःची चूल सांभाळून इतर स्त्रियांच्या विझू पाहणाऱ्या चुलीतली धग प्रज्वलित केली. त्यांच्या पंखात गगनात भरारी घेण्याचे बळ दिले. पुरुषी सत्तेच्या जोखडातून स्त्रियांची मुक्तता केली. स्त्रिया मोकळा श्वास घेऊ लागल्या. असे असले तरी आजही ताजी ताजी गरम भाजी आणि तव्यावरची पोळी भाजून झाल्यावर सरळ पानात आली पाहिजे म्हणजे नवरा झाल्याचे खरे समाधान आणि आनंद मानणारे महाभाग आपल्या आसपास आजही आहेत. तव्यावरची पोळी सरळ म्हणजे सरळ त्यांच्या पानातच आली पाहिजे. तव्यावरची काढून ताटलीत ठेवली आणि मग वाढली तर त्यांच्या बायकोची गय नसते. त्यांचा तो मोठा अपमान होतो.

मोठ्या कौतुकाने ते सगळ्यांना सांगत असतात, ‘मला तव्यावरची म्हणजे तव्यावरचीच गरम गरम ताजी पोळी आणि कढईतली गरम गरम ताजी भाजी लागते. आता बोला...

**अरुंधती वैद्य**/९४२०३९७५५९

■■■

## शरद पवारांचा शहाजोग सल्ला

‘हतबल नेत्याची राजकीय नौटंकी’ हा नागेश दाचेवार यांचा शनिवार, १९ सप्टेंबरचा संपादकीय पानावरील लेख वाचला. लेखकाने शरद पवारांच्या आजवरच्या राजकारणाचा मांडलेला सप्रमाण लेखाजोखा, खुद्द पवारांनी वाचला तर ते स्वतःही त्यातील सत्य नाकारू शकणार नाहीत. शरद पवारांची सत्तापिपासा जबरदस्त आहे आणि ते पद आणि सत्तेपासून दूर राहूच शकत नाहीत. सत्तेसाठी कोणाबरोबरही, कधीही, कशीही तडजोड करण्यात पवारांची सदैव तयारी असते. त्यासाठी आपल्या कोणत्याही तत्त्वांना तिलांजली देण्यात त्यांना कमीपणा वाटत नाही. किंबहुना सत्ताप्राप्ती हेच त्यांच्या राजकारणाचे एकमेव तत्त्व आहे. तरुणांना राजकारणात संधी मिळाली पाहिजे असे सांगणाऱ्या शरद पवारांनी राज्यसभा जागेसाठी तेच ‘तरुण’ असल्याचा निष्कर्ष काढला आणि ते स्वतःच राज्यसभा खासदार झाले.



सत्तेसाठी कोलांट्याउड्या मारण्यातही ते संकोच करत नाहीत. सोनिया गांधींच्या विदेशीपणाच्या मुद्यावर काँग्रेसमधून ते बाहेर पडले आणि त्यांनी स्वतःचा राजकीय पक्ष स्थापन केला. मात्र काही वर्षांतच, सोनिया गांधींचा विदेशी मुद्दा कालबाह्य झाला आहे असे म्हणून त्यांनी सोनियांच्या नेतृत्वाखाली असलेल्या काँग्रेसबरोबर पाट लावला. शरद पवार जे सांगतात त्याप्रमाणेच ते करतील याची खात्री ते स्वतः सुद्धा देऊ शकणार नाहीत. अशी अनेक उदाहरणे देता येतील. निवडणुका जिंकण्यासाठी आणि सत्ताप्राप्तीसाठी जातिपातींवर राजकारण करणे तर पवारांच्या डाव्या हाताचा मळ आहे. सत्तेत आल्यानंतर काय बोलायचे आणि सत्ताभ्रष्ट झाल्यावर काय बोलायचे याचे शरद पवारांचे आडाखे वेगवेगळे आहेत. लेखात म्हटल्याप्रमाणे सत्तेवर असताना शेतकऱ्यांसाठी कोणतीही कल्याणकारी कामे न करता सत्ताभ्रष्ट झाल्यावर नवीन सरकारला शेतकरी कल्याणासाठी शहाजोग सल्ले द्यायला ते विसरत नाहीत. हीच बाब मराठा आरक्षणाच्या मुद्यालाही लागू पडते. मराठा समाजाने आरक्षण मागू नये असे म्हणणारे शरद पवार सत्तेतून बाहेर गेल्यानंतर मराठा आरक्षणाचे समर्थन करू लागले आहेत. अशी परस्परविरोधी वक्तव्ये करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणे आणि त्यातून स्वपक्षाचा फायदा करून घेण्याचा प्रयत्न करणे ही पवारांची मोडी ऑपरेंडी आहे. आताही महाराष्ट्रातील महायुती सरकारमध्ये घुसखोरी करण्याचा निकराचा प्रयत्न त्यांनी केला होता. पण त्यांची डाळ शिजली नाही. तरीही त्यांनी अजूनही हार मानलेली नाही. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे लोकप्रिय, यशस्वी मुख्यमंत्री म्हणून सुप्रसिद्ध व्हावेत, त्यांना सहकारी पक्षांनी एकमुखी पाठिंबा द्यावा आणि फडणवीसांनी आपला कार्यकाळ पूर्ण करावा, ही गोष्ट पवारांच्या पचनी पडणारी नाही आणि म्हणूनच मंत्रिमंडळात काही नवीन जातीयवादी प्रयोग करून सत्ता मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न सुरूच राहणार आहे.

**शिवराम वैद्य**/पुणे. ९८५०५१८०१८

■■■

## ‘गोंधळ’ चित्रपट : संस्कृतीचं लेणं आणि मराठी मातीचा सुगंध

‘फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया’ने ९९व्या अकादमी पुरस्कारांसाठी अर्थात ऑस्कर २०२७ साठी ‘गोंधळ’ या मराठी चित्रपटाची भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून निवड केली आहे. सुमारे अकरा वर्षांपूर्वी ‘कोर्ट’ या मराठी चित्रपटाला हा मान मिळाला होता. संतोष डावखर दिग्दर्शित ‘गोंधळ’ने विविध भारतीय भाषांतील अनेक चित्रपटांच्या स्पर्धेत बाजी मारली. मोठ्या बजेटच्या चित्रपटांमध्येही ‘गोंधळ’ने आपल्या आशयघन कथानकामुळे, भारतीय सांस्कृतिक संदर्भांमुळे आणि वैशिष्ट्यपूर्ण चित्रभाषेमुळे वेगळे स्थान निर्माण केले. यंदाच्या निवड प्रक्रियेत विविध भारतीय भाषांतील एकूण ३३ चित्रपटांचा समावेश होता. त्यात हिंदी, मराठी, तमिळ, मल्याळम, तेलुगू, गुजराती आदी भाषांतील चित्रपटांचा समावेश होता. अंतिम निवडीच्या प्रक्रियेत ‘अंग’, ‘इक्कीस’ आणि ‘गोंधळ’ हे चित्रपट चर्चेत होते. मात्र ‘गोंधळ’मधील भारतीय गाभा, आंतरराष्ट्रीय दर्जाची सिनेमॅटिक भाषा आणि तांत्रिक गुणवत्ता यांचा विचार करून ज्युरीने या चित्रपटाची भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून निवड केली.

‘गोंधळ’च्या बाबतीत सांगायचे झाल्यास, मराठी लोकसंस्कृती आणि मराठी मातीचा जिवंत आविष्कार या चित्रपटातून जाणवतो. चित्रपटाची कथा सुमन नावाच्या एका तरुणीभोवती फिरते. तिचा विवाह एका श्रीमंत कुटुंबातील तरुणाशी होतो; मात्र वैवाहिक आयुष्यात तिला समाधान मिळत नाही. तिच्या भूतकाळातील प्रेमसंबंध पुन्हा तिच्या आयुष्यात येतात आणि तिच्या भावविश्वात अनेक प्रश्न निर्माण होतात. कथानकाच्या प्रवासात सुमनची भेट ‘साहेबा’ नामक गोंधळी कलाकाराशी होते. वैवाहिक परिस्थितीतून बाहेर पडण्याची तिची इच्छा, प्रेम, अनामिक आकर्षण, सत्तासंबंध आणि त्यातून निर्माण होणारी फसवणूक यामुळे भावनिक गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण होते. पुढे खुनाच्या कटासह रहस्य आणि थराराची गुंफण होते. रात्रभर चालणाऱ्या गोंधळाच्या विधीच्या पृष्ठभूमीवर श्रद्धा, कपट, इच्छा आणि नातेसंबंधांतील धोका एकमेकांत गुंतत जातात.

इच्छा, संघर्ष आणि रहस्य यांची प्रभावी मांडणी दिग्दर्शकाने केली आहे. ‘गोंधळ’ हे शीर्षक असले तरी महाराष्ट्रातील धार्मिक विधी किंवा लोककला म्हणून परिचित असलेल्या ‘गोंधळ’ या परंपरेशी चित्रपटाचा थेट संबंध नाही. मात्र लोकपरंपरा आणि मानवी मनातील संघर्ष यांची सांगड घालत चित्रपट श्रद्धा, इच्छा, अपराध, मुक्ती आणि नियती यांसारख्या मानवी भावविश्वातील पैलूंना प्रतीकात्मक स्वरूप देतो. मराठी चित्रपटसृष्टीने आशयघन आणि वास्तववादी चित्रपटांच्या माध्यमातून भारतीय सिनेविश्वात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. ‘श्वास’, ‘हरिश्चंद्राची फॅक्टरी’ आणि ‘कोर्ट’ यांसारख्या चित्रपटांनी मराठी सिनेमाची वेगळी ओळख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवली. आता ‘गोंधळ’च्या ऑस्कर प्रवेशिकेमुळे मराठी चित्रपटसृष्टीच्या अपेक्षा आणखी उंचावल्या आहेत.

यापुढील काळात मराठी चित्रपटांना जागतिक दर्जाची चित्रभाषा, उत्तम कथा, प्रभावी छायांकन, संगीत, अभिनय आणि दिग्दर्शन यांचा समन्वय साधण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे. विज्ञान-तंत्रज्ञान, इतिहास, पर्यावरण, बदलते नातेसंबंध, शेतकरी, विद्यार्थी, स्त्री व बालहक्क, बेरोजगारी, आरोग्य, शिक्षण तसेच इतिहासातील दुर्लक्षित व्यक्तिमत्त्वे अशा विविध विषयांवर जागतिक दर्जाचे चित्रपट निर्माण होणे गरजेचे आहे. ‘गोंधळ’चा ऑस्करच्या अंतिम नामांकनाच्या शर्यतीतील प्रवास अद्याप पूर्ण झालेला नसला, तरी भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून झालेली निवड ही मराठी चित्रपटासाठी निश्चितच महत्त्वाची पायरी आहे. हा प्रवास केवळ एका चित्रपटाचा नसून, मराठी मातीतील कथा, संस्कृती आणि संवेदना जागतिक पडद्यावर नेण्याच्या नव्या शक्यतांचा प्रारंभ आहे.

**शशिकांत तोटे**/९१३०८३५४५८

■■■

## नीती आणि नियती यातील फरक

नीती म्हणे धोरण. नीतीचे सरकारी आणि खाजगी नीती असे दोन भाग पडतात. नीती किंवा नियोजन आयोग आपल्या परिचयाचा आहे. नीती म्हटले की सोबत नियम आलेच. नियमांचे काटेकोर पालन केले गेले तरच आखल्या गेलेल्या नीतीची चांगली फळे चाखायला मिळतात. नीतीला भक्कम आर्थिक पाठबळची गरज असते. कुठलेही धोरण राबविण्यासाठी टीम वर्कची गरज असते. समविचारी लोकांनी एकत्र येऊन धोरणं राबविल्यास त्याचे चांगले परिणाम बघायला मिळतात. जे जनतेसाठी लाभकारी ठरतात.

नियतीचा संबंध हा आपल्या भावभावनांशी जुळलेला असतो. आपणं चांगले काम केले. तर त्याची चांगली फळे मिळतात. वाईट काम केले तर वाईट फळे उशिराने का होईना मिळतात. नियतीपुढे कुणाचेही चालत नाही. आपण आपल्या मनातील आज्ञेनुसार चालत असतो. मन सांगेल तसे वागत असतो. हे मन अति चंचल आहे. क्षणार्धात ते संपूर्ण जग फिरून येत असते. नियती कुणाचीही पर्वा करीत नसते. नियतीच्या मनात काय आहे हे कुणीही सांगू शकत नाहीत. म्हणून माणसाने आपले जीवन आनंदाने व्यतीत करावे. सध्या गणपतीचा उत्सव सगळीकडे उत्साहात आणि धूमधडाक्यात सुरू झालेला आहे. सार्वजनिक गणपती मांडण्याच्या प्रयोजनाला हरताळ फासला गेला आहे. यात कुठलेही नियोजन नसते. प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जात नाही. निव्वळ जमा केलेला पैसा आयोजकांवर, डेकोरेशनवर आणि सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नावाने डीजेवर खर्च केला जातो आहे. डीजेच्या कर्णकर्कश आवाजाचा त्रास जनतेला सहन करावा लागतो आहे. कितीही कायदे केले गेले तरीही आमच्या वर्तणुकीत काडीचाही फरक पडणार नाही. नाच, गाण्याची ऊर्जा यातून मिळत असते. डीजेच्या गाण्याच्या तालावर तरुणाई मनसोक्तपणे नाचत असते.

नीती म्हणजे धोरण आखणारेसुद्धा आपणच असतो. आणि त्याचे पालन न करणारेही आपणच असतो. नीतीचे पालन योग्य पद्धतीने न झाल्यास नियती आपले काम करीत असते. डीजेच्या आवाजाने कुणाला बहिरेपणा येऊ शकतो. तर लेझर किरणांचा वापराने कुणाला आपली दृष्टी गमवावी लागू शकते. याचा परिणाम कुणावर होईल हे सांगणे कठीण काम असते. एवढे सर्व माहीत असूनही आपण यापासून परावृत्त होत नसू तर आपण एक नागरिक म्हणून अपयशी ठरतो आहोत. तेव्हा शिक्षणातून आपल्या बालमनावर हे संस्कार करावे लागणार आहेत. ती शिक्षकांची आणि पालकांची नैतिक जबाबदारी ठरते आहे.

सण हे आनंदाने साजरे करण्यासाठी असतात. सणांमुळे कुणाला दुखापत होत असेल तर हे मान्य करता कामा नये. यासाठी कडक शिक्षेची तरतूद असली पाहिजे. यासाठी समाज प्रबोधनाचा आणि शिक्षणाचा आधार घ्यावा लागेल. दुसरा मार्ग म्हणजे कायद्याची भाषा आहे. याशिवाय दुसरा मार्ग नाही.

**मिलिंद गड्डमवार**/९५११२१५२००

■■■

## ‘न धरी शस्त्र, न करी मी युद्ध...’

महाभारताच्या रणसंग्रामात जेव्हा धर्म आणि अधर्माची लढाई निश्चित झाली तेव्हा भगवान श्रीकृष्णाने सांगितले की, मी हातात शस्त्र धरणार नाही फक्त सारथी होऊन मार्ग दाखवेन. यात दुर्योधनाने अफाट सेना मागून घेतली तर अर्जुनाने केवळ निःशस्त्र श्रीकृष्णाला मागून घेतले. इतिहास साक्षी आहे की शेवटी श्रीकृष्णाची रणनीती आणि बुद्धिचतुर्याने नारायणी सेनेचा पराभव झाला.

‘‘न धरी शस्त्र करी मी गोष्टी सांगेन युक्तीच्या चार’’ ही ओळ भगवान श्रीकृष्णाच्या विलक्षण प्रतिभेची आठवण करून देते. श्रीकृष्णाने स्वतः शस्त्र न उचलता धर्माच्या बाजूने उभे राहून योग्य मार्गदर्शन करून प्रेरणेची वाट दाखवली. यावरून हे निश्चित होते की जीवनाची प्रत्येक समस्या सोडवायला शस्त्राची गरज नसते. संयम, मौन आणि योग्य वेळेची प्रतीक्षा हाच विजयाचा मार्ग असतो. हजारो वर्षापूर्वी घडलेला इतिहास आजच्या व्यावहारिक युगात प्रासंगिक वाटू लागला आहे. आजची युद्ध ही शस्त्रावर नाही तर मेंदूमध्ये आणि डिजिटल स्क्रीनवर लढली जात आहेत. आजचा विजेता तोच आहे जो कोणतीही शस्त्रे न घेता स्मार्ट वर्क करतो. आज ज्याच्याकडे अचूक माहिती आहे, डेटा आहे तोच जगावर राज्य करतो आहे, हेच आजच्या काळातील मोठे निःशस्त्र शस्त्र आहे, तंत्रज्ञानाची युक्ती श्रेष्ठ ठरते आहे.

यशाचे शिखर गाठायचे असेल तर शांत बुद्धीच्या श्रीकृष्णाची जास्त गरज आहे. आज आपल्याला शस्त्राने नाही तर डिजिटल गुन्हेगारी, मानसिक तणाव, सामाजिक असुरक्षितता या सर्वांशी लढायचे आहे. आजचा अर्जुन तोच आहे जो तंत्रज्ञान आणि ज्ञानाचा योग्य वापर करतो आणि कृष्णनीती ही आहे की जो संकटाच्या वेळी शांत राहून मार्ग काढतो आणि व्यावहारिक जगात खरा विजेता ठरतो.

**न धरी शस्त्र, न करी मी युद्ध**
**धर्माय दद्यां मम सर्व शक्तिम**
**सारथ्य रुपेण पथि प्रदर्श्य**
**पारथस्य हस्ते विजयं ददामि !!**

मी हातात शस्त्र धरणार नाही पण धर्माच्या रक्षणासाठी शक्ती अर्पण करीन आणि अर्जुनाचा सारथी होऊन त्याला योग्य मार्ग दाखवून धर्माचा विजय घडवून आणीन. असे म्हणत भगवान श्रीकृष्णांनी ते प्रत्ययास आणले. आणि म्हणूनच न धरी शस्त्र करी ही ओळ केवळ श्रीकृष्णाच्या भूमिकेची नाही तर शांतपणे, बुद्धीने, नीतीने, परिस्थिती हाताळणाऱ्या शक्तीचे प्रतीक आहे.

आज माणसाकडे साधने वाढली, संपर्क वाढला पण मनातील अंतर मात्र कमी झालेले नाही. त्यामुळे नात्यांमध्ये आणि समाजात कुठे संघर्ष करायचा, कुठे थांबायचे याचे भान महत्त्वाचे आहे. कदाचित हाच या विचाराचा आजच्या काळातील खरा अर्थ आहे. शस्त्र उचलणे ही हतबलता नाही तर रणनीती आहे हेच भगवंताला सुचवायचे असेल..

**सरिता पुराडभट**/नागपूर

■■■

## समाजजागृतीचा उत्सव

पहाटेच्या शांत वेळी घरातील देवघरात लावलेला दिवा, त्याच्या मंद प्रकाशात दिसणारी गणरायाची प्रसन्न मूर्ती आणि हात जोडून त्याच्यासमोर उभे राहिलेले कुटुंब... हा देखावा केवळ श्रद्धेचा नसतो; तो आपल्या संस्कृतीतील ज्ञान, कला, बुद्धी आणि कर्तव्य यांचा सुंदर संदेश असतो. कोणतेही शुभ कार्य सुरू करण्यापूर्वी सर्वप्रथम गणरायाचे स्मरण करण्याची परंपरा आपल्या समाजात आहे. गणरायाला विद्येची देवता मानले जात असले, तरी केवळ विद्या मिळवून उपयोग नाही; त्या विद्येचा उपयोग समाजाच्या आणि मानवतेच्या कल्याणासाठी झाला पाहिजे, असे गणराय आपल्याला शिकवतो. गणरायाचे रूपही अनेक अर्थांनी आपल्याला जीवनाचा संदेश देते. मोठे मस्तक म्हणजे व्यापक विचार करण्याची क्षमता. मोठे कान म्हणजे सर्वांचे ऐकून घेण्याची वृत्ती. लहान डोळे म्हणजे एकाग्रता. मोठे पोट म्हणजे जीवनातील चांगले-वाईट अनुभव पचविण्याची शक्ती. छोट्या उंदरावर आरूढ असलेला गणराय आपल्याला सांगतो की, शरीराने किंवा साधनांनी मोठे असणे महत्त्वाचे नाही; विचार मोठा असला की लहान वाटणारी शक्तीही मोठे कार्य करू शकते. गणरायाशी संबंधित एक कथा प्रचलित आहे. माता पार्वतीने स्नानासाठी जाताना आपल्या पुत्राला दारावर पहारा देण्याची आज्ञा दिली. गणरायाने आईची आज्ञा मनापासून स्वीकारली. काही वेळाने भगवान महादेव तेथे आले. मात्र गणरायाने त्यांनाही आत जाण्यापासून रोखले. कारण त्याच्यासाठी त्या क्षणी सर्वांत महत्त्वाची गोष्ट होती ती म्हणजे आईची आज्ञा. महादेव आणि गणराय यांच्यात युद्ध झाले. संतापाच्या भरात महादेवांनी गणरायाचा शिरच्छेद केला. हे पाहून माता पार्वती अत्यंत दुःखी आणि संतप्त झाली. आपल्या पुत्राला पुन्हा जीवनदान मिळावे, असा तिचा आग्रह होता. त्यानंतर गणरायाला हत्तीचे मस्तक लावून पुन्हा जीवनदान देण्यात आले आणि त्याला सर्व देवतांमध्ये अग्रपूजेचा मान मिळाला. या कथेकडे गणरायाने आपल्याला कर्तव्यनिष्ठेचा संदेश दिला. समोर कोण आहे, किती मोठी व्यक्ती आहे, याचा विचार न करता आपण स्वीकारलेल्या जबाबदारीशी प्रामाणिक राहणे, हा त्याच्या जीवनाचा संदेश आहे. माता पार्वतीची आज्ञा पाळताना गणरायाने स्वतःचा विचार केला नाही. म्हणूनच गणरायाच्या कथेत श्रद्धेबरोबरच कर्तव्य, निष्ठा आणि जबाबदारीचे महत्त्व दडलेले आहे.

गणेशोत्सव हा केवळ घरातील किंवा मंदिरातील धार्मिक उत्सव राहिलेला नाही. या उत्सवाला समाजजीवनाशी जोडण्याचे मोठे कार्य लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी केले. परकीय सत्तेच्या काळात भारतीय समाज अनेक जाती, भाषा आणि सामाजिक भेदांमध्ये विभागला गेला होता. लोक एकत्र आले तरी त्याकडे संशयाने पाहिले जात होते. अशा काळात सार्वजनिक गणेशोत्सव हा समाजाला एकत्र आणण्याचे प्रभावी माध्यम ठरू शकतो, हे टिळकांनी ओळखले. गणेशोत्सव साजरा करताना या इतिहासाची आठवण ठेवण्याची गरज आहे. गणपतीची मूर्ती बसविणे, आरती करणे आणि प्रसाद वाटणे ही श्रद्धेची सुंदर रूपे आहेतच; त्याबरोबरच समाजासाठी काही चांगले करणे, गरजूंना मदत करणे, पर्यावरणाची काळजी घेणे आणि नव्या पिढीला संस्कार देणे, हाही गणेशोत्सवाचा खरा अर्थ असू शकतो. ■

**वीरेंद्र सोनवणे**/पुणे. ८८८८२४४८८३

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादकः प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

www.tarunbharat.net
तरुण भारत
मागोवा
सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६





## रोखठोक

**हितेश शंकर**

# राजनैतिक प्रतिसादानंतर उत्सवाचा उत्साह...

सप्टेंबर महिना संपत आला आहे. गृह आणि व्यवसाय दिनदर्शिकेनुसार आश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षाचा पहिला दिवस आहे. भारतातील सण केवळ पूजेचा काळ नसून, ते बाजारपेठ आणि रोजगारासाठी एक मोठी संधी देखील आहेत. कपडे, मिठाई, पूजेचे साहित्य, भांडी, सजावटीच्या वस्तू, मोबाईल फोन आणि दैनंदिन वस्तूंची मागणी अचानक वाढते. जे लोक भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर आणि आकाराचे राजकीय मूल्यांकन करतात, ते हे विसरतात की, इतर घटकांव्यतिरिक्त सण आणि अध्यात्म हे अर्थव्यवस्थेचा कणा आहेत.

सणासुदीच्या काळात ई-कॉमर्स आणि 'क्विक कॉमर्स'च्या स्पर्धात्मकतेचे आणि विस्ताराचे मूल्यांकन केले गेले का? आर्थिक आकडेवारीवर अनेकदा राजकारणाचे वर्चस्व असल्याचे दिसते, परंतु त्याला आधार देणारे आणि गती देणारे सांस्कृतिक पैलू अनेकदा दुर्लक्षित केले जातात.

भारताची क्विक कॉमर्स बाजारपेठ २०२६ पर्यंत वार्षिक अंदाजे ४० टक्के दराने वाढण्याचा अंदाज आहे. मे २०२६ पर्यंत ब्लिंकइट, झेप्टो आणि इन्स्टामार्ट यांच्या एकत्रित डार्क-स्टोअर नेटवर्कची संख्या एका वर्षापूर्वीच्या ३,४०५ वरून अंदाजे ५,०२६ पर्यंत पोहोचली होती. बाजारातील ही नवीन स्पर्धा अर्थव्यवस्था आणि रोजगाराची समीकरणे बदलत आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत स्पर्धा स्थानिक दुकाने आणि मोठ्या ऑनलाईन व्यवसायांमध्ये होती. आता, ऑनलाईन व्यवसायांना टक्कर देण्यासाठी त्वरित डिलिव्हरी कंपन्या उदयास आल्या आहेत. ब्लिंकइट, झेप्टो आणि स्विगी इन्स्टामार्ट यासारख्या कंपन्यांनी ग्राहकांच्या सवयी बदलल्या आहेत. पूर्वी, लोक वस्तूंची यादी घेऊन बाजारात जात असत. आता, ते घरबसल्या वस्तू मागवू लागले आहेत. आता, मीठ संपल्यास, दुधाची गरज भासल्यास, पूजेचे साहित्य कमी पडल्यास किंवा अचानक पाहुणे आल्यास लोक लगेच आपले मोबाईल फोन उचलतात. सर्वांत मनोरंजक गोष्ट म्हणजे, भारतीय बाजारपेठांमधील विक्रीतील वाढ केवळ महागड्या खरेदीमुळे होत नाही. डेटम इंटेलिजन्सच्या मते, २०२६ मध्ये सणासुदीच्या खरेदीसाठी ऑनलाईन खरेदी करणाऱ्यांची संख्या १३८ दशलक्षवरून १५८ दशलक्षपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे आणि एकूण ऑर्डर्स ७६० दशलक्षवरून ९६६ दशलक्षपर्यंत वाढतील, तर सरासरी ऑर्डर मूल्यात किंचित घट होऊ शकते. याचा अर्थ असा की, बाजारपेठ मोठ्या बिलांमुळे नव्हे, तर अधिक वारंवार होणाऱ्या खरेदीमुळे विस्तारत आहे.

हीच या व्यवसायाची सर्वांत मोठी ताकद आहे. ग्राहकाला वाटते की बाजारपेठ आता त्यांच्या आवाक्यात आहे. आता वाहतूक कोंडी नाही, दुकाना-दुकानात फिरण्याची गरज नाही, लांब रांगा नाहीत. पण म्हणतात ना, प्रत्येक चमकणारी गोष्ट सोने नसते. जलद सोयीच्या या शोधात अनेक प्रश्न निर्माण होतात, जे सवलती आणि वेगाच्या गलबल्यात दडपले जाऊ शकत नाहीत.

पण अशा परिस्थितीत सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे परिसरातील लहान दुकानांचे संरक्षण करणे आणि माल पोहोचवणाऱ्या तरुणांची सुरक्षितता. बऱ्याच काळापासून अनेक कंपन्या दहा मिनिटांत डिलिव्हरीला आपली ओळख म्हणून सादर करीत होत्या. जानेवारी २०२६ मध्ये सरकारने कंपन्यांना दहा मिनिटांत डिलिव्हरीला प्रोत्साहन देणारी भाषा काढून टाकण्यास सांगितले. चिंता अशी होती की, एवढ्या कमी वेळेच्या मर्यादेमुळे रस्त्यावर काम करणाऱ्या तरुणांवर दबाव येऊ शकतो.

कंपन्यांचा दावा होता की, माल जवळच्या गोदामातून पाठवला जातो, त्यामुळे कोणालाही वेगाने गाडी चालवण्याची गरज नाही. तथापि, प्रत्यक्ष रस्त्यावर काम करणाऱ्या अनेक तरुणांची तक्रार वेगळी आहे. त्यांची कमाई अनेकदा मोठ्या ऑर्डर्स पूर्ण करणे आणि वेळेवर माल पोहोचवण्यावर अवलंबून असते. अशा परिस्थितीत मोबाईल फोनमधील घड्याळ बंद असले तरी, वेळेचा



दबाव मनात राहतो. अन्नाची भूक माणसाला खूप काही करायला लावते. जर कोणी काही अतिरिक्त रुपये कमावण्यासाठी आपला जीव धोक्यात घालत असेल, तर सोयीची किंमत खूप जास्त होते.

दुसरा प्रश्न बंद गोदामांशी (डार्क स्टोअर्स) संबंधित आहे, जिथे माल साठवला जातो. ही सामान्य दुकानांसारखी नसतात; ग्राहक त्यात प्रवेश करीत नाहीत. येथूनच माल पॅक करून जवळच्या घरांमध्ये पाठवला जातो. अलिकडील तपासणीत काही ठिकाणी स्वच्छता, कीटक नियंत्रण, जुना माल आणि तापमान व्यवस्थापनातील त्रुटी उघड झाल्या आहेत. ब्लिंकइट आणि झेप्टो यांच्याशी संबंधित काही गोदामांवरही कारवाई करण्यात आली आहे.

ही एक गंभीर बाब आहे. ग्राहक गोदामाची प्रत्यक्ष स्थिती न पाहता, आपल्या मोबाईल फोनवरील स्पष्ट चित्रे पाहून वस्तू खरेदी करतात. यामुळे कंपन्यांची जबाबदारी आणखी वाढते. डाळीवरील काळा डाग असो किंवा संपूर्ण डाळ असो, नुकसान झाल्यानंतरच ग्राहकांच्या ते लक्षात येते. त्यामुळे, खाद्यपदार्थांची साठवणूक, स्वच्छता आणि टिकवणुकीची नियमित तपासणी करणे आवश्यक आहे.

आणखी एक प्रश्न आहे, ज्यावर अनेकदा चर्चा होत नाहीः या स्पर्धेत परिसरातील किराणा दुकानाचे स्थान काय आहे? भारतीय बाजारपेठ आता केवळ खरेदी-विक्रीचे ठिकाण राहिलेली नाही. दुकानदार ग्राहकाला ओळखतो, उधारी देतो, गरज पडल्यास घरी माल पोहोचवतो आणि स्थानिक उत्पादनेही विकतो. हीच स्वदेशी अर्थव्यवस्थेची दीर्घकाळापासूनची ताकद राहिली आहे.

नवीन तंत्रज्ञानाला विरोध करणे हा उपाय नाही. बाजारपेठा काळानुसार बदलतील आणि बदलल्या पाहिजेत. पण बदल असा व्हायला हवा की लहान दुकानदार, स्थानिक कारागीर, शेतकरी, बचत गट आणि लहान उत्पादकांनाही त्यात स्थान मिळावे. जर तंत्रज्ञानाचे सर्व फायदे काही मोठ्या कंपन्यांच्या हातात एकवटले, तर बाजाराची ताकदही काही मोजक्या लोकांच्या हातात एकवटेल.

इथेच स्वदेशीची नवी समज आवश्यक आहे. स्वदेशी म्हणजे केवळ परदेशी वस्तूंचा त्याग करणे नव्हे, तर स्वतःचे उत्पादन, स्वतःचे कामगार आणि स्वतःचे छोटे व्यवसाय मजबूत करणे होय. जर नवीन तंत्रज्ञान गावाकडच्या वस्तू, स्थानिक मिठाई, मातीच्या पणत्या, हस्तकला आणि लहान उद्योगांसाठी नवीन ग्राहक आणत असेल, तर हे तंत्रज्ञान स्थानिक अर्थव्यवस्थेची ताकद बनू शकते. सणासुदीच्या काळात, खरी स्पर्धा केवळ पाच मिनिटे आधी माल कोण पोहोचवतो यात नसावी. माल किती सुरक्षित आहे, कामगार किती सुरक्षित आहेत, ग्राहकांना किती न्याय्य वागणूक दिली जात आहे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला किती फायदा होत आहे, ही खरी कसोटी असायला हवी. बाजारात वेग आणि गती आवश्यक आहे, पण विश्वास त्याहूनही अधिक महत्त्वाचा आहे. भारताला अशा नव्या अर्थव्यवस्थेची गरज आहे, जी तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासोबतच लहान दुकानदार, मजूर, कारागीर आणि स्थानिक उत्पादकांनाही पाठिंबा देईल. सणांचे खरे सौंदर्य हे बाजारपेठेतील नफा प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्यातच आहे. गुंतागुंतीच्या जागतिक घडामोडींच्या पृष्ठभूमीवर भारतीय अर्थव्यवस्थेने केवळ आपली चमक टिकवून ठेवली नाही, तर ती वाढतही आहे. भारतविरोधी राजकारणाला विकासाच्या टक्केवारीसाठी आरडाओरडा करू द्या, पण भारताची बाजारपेठ स्थानिक रोजगार आणि स्वदेशी उत्पादनांच्या तेजाने उजळू द्या.

●●●

(पांचजन्यवरून साभार)

## दखल

**डॉ. समन्वय नंद**

### आदिवासी उद्योगाला मिळाली जागतिक ओळख

# पूर्व घाटापासून ब्रिक्सपर्यंत




**ओडिशाच्या कोरापुट जिल्ह्यातील डोंगरांवरील सावलीने व्यापलेल्या कॉफीच्या मळ्यांमधून उगम पावलेले एक स्थानिक उत्पादन आता नवी दिल्लीतील आंतरराष्ट्रीय राजनैतिक स्तरावर पोहोचले आहे. पूर्व घाटातील आदिवासी शेतकऱ्यांद्वारे उत्पादित केलेली कोरापुट कॉफी या राज्याला जगासमोर एक नवी ओळख देत आहे.**

कोरापुटमधील आदिवासी शेतकऱ्यांनी उत्पादित केलेली 'टायगर ब्राईट' ही एक उत्कृष्ट दर्जाची १०० टक्के अरेबिका कॉफी आहे. नवी दिल्लीतील भारत मंडपम् येथे आयोजित १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांसाठी तयार केलेल्या मीडिया किटमध्ये या कॉफीचा समावेश करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, परिषदेतील प्रतिनिधी आणि पाहुण्यांसाठी प्रदर्शित केलेल्या उत्पादनांमध्येही या कॉफीचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय पाहुण्यांना ओडिशाच्या या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनाची चव घेण्याची संधी मिळाली.

ब्रिक्स मीडिया आणि प्रतिनिधी किटमध्ये कोरापुट कॉफीचा समावेश केवळ तिच्या जागतिक मान्यतेपुरता मर्यादित नाही; तर यातून आदिवासी शेतकऱ्यांची मेहनत, या प्रदेशातील वैशिष्ट्यपूर्ण कृषी-हवामान परिस्थिती आणि ओडिशाच्या वाढत्या कॉफी अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली.

हा उपक्रम भारताच्या विविध प्रादेशिक परंपरा, स्थानिक उत्पादने आणि स्वदेशी उद्योग आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित करण्याच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रयत्नांचा एक भाग आहे. 'एक जिल्हा एक उत्पादन' या उपक्रमांतर्गत राज्यांना या जागतिक कार्यक्रमासाठी त्यांची वैशिष्ट्यपूर्ण स्थानिक उत्पादने प्रदान करण्याचे आवाहन करण्यात आले होते. कोरापुट कॉफीची निवड ओडिशाला कृषी, आदिवासींची उपजीविका, मूल्यवर्धन, ब्रँडिंग आणि स्थानिक ओळख प्रदर्शित करण्याची संधी देते.

कोरापुटची ओळख 'टायगर ब्राईट'मध्ये रुजलेली आहे. 'टायगर ब्राईट'ची लागवड कोरापुटच्या प्रदेशात ९२० ते ९५० मीटर उंचीवर केली जाते. नंदपूर, मचकुंड, लक्ष्मीपूर, काशीपूर, दशमंतपूर, लामतापुत, कोरापुट आणि पट्टंगी हे जिल्ह्यातील प्रमुख कॉफी उत्पादक क्षेत्र आहेत. या प्रदेशातील अद्वितीय कृषी-हवामान परिस्थिती कॉफी उत्पादनासाठी अनुकूल आहे. कॉफीची झाडे सामान्यतः आंबा, फणस आणि लिंबूवर्गीय झाडांच्या सभोवताली नैसर्गिक सावलीत वाढवली जातात. कॉफी चेरी पूर्ण पिकल्यावर हाताने तोडल्या जातात आणि गुणवत्ता व चव टिकवून ठेवण्यासाठी काळजीपूर्वक प्रक्रिया केली जाते.

ही प्रीमियम अरेबिका कॉफी वॉश्ड प्रक्रियेनंतर लाईट-मीडियम रोस्टमध्ये भाजली जाते. याच्या चवीमध्ये संत्रा, लिंबू आणि लाईम यासारख्या उष्णकटिबंधीय लिंबूवर्गीय फळांचा ताजेपणा असून, त्यासोबत कॅरॅमल, चॉकलेट आणि कोकोची हलकीशी चवही जाणवते. परराष्ट्र मंत्रालयाच्या विनंतीनुसार, टीडीसीकॉलने टायगर ब्राईटची सुमारे १,५०० पाकिटे नवी दिल्लीला पाठवली. प्रत्येक पाकिटाचे वजन २५० ग्रॅम होते.

### आंतरराष्ट्रीय व्यासपीठ

ब्रिक्स शिखर परिषदेत देशभरातील विविध राज्यांतील स्थानिक उत्पादनांसोबत 'टायगर ब्राईट'च्या उपस्थितीमुळे कोरापुट कॉफीला तिच्या पारंपरिक ग्राहकवर्गाच्या पलीकडे एक मोठे व्यासपीठ मिळाले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने राज्यांना ब्रिक्स शिखर परिषदेत त्यांची स्वदेशी आणि स्थानिक उत्पादने प्रदर्शित करण्यासाठी आमंत्रित केले होते. ओडिशाने कोरापुट कॉफीची निवड केली, तर बिहारने पारंपरिक सत्तू आणि मखाना आणि गुजरातने हस्तकला प्रदर्शित केली.

उत्पादनांमधील ही विविधता दर्शवते की, भारत एका मोठ्या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचा उपयोग केवळ राजनैतिक संवादासाठीच नाही, तर देशाची समृद्ध प्रादेशिक ओळख आणि स्थानिक उत्पादने जगासमोर मांडण्यासाठीही करीत आहे. ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी ब्रिक्स शिखर परिषदेत कोरापुट कॉफीच्या समावेशाचे स्वागत केले. त्यांनी याला ओडिशाची कहाणी जगासमोर मांडण्याचे आणखी एक माध्यम म्हटले. सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये मुख्यमंत्री म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून ते जागतिक व्यासपीठांवर ओडिशाबद्दल बोलत आहेत आणि जगाला राज्यातील संधी, सामर्थ्य आणि क्षमतेची ओळख करून देत आहेत. ते म्हणाले की, ब्रिक्स शिखर परिषदेत कोरापुट कॉफीच्या माध्यमातून ओडिशाची 'एक वेगळी कहाणी' जगासमोर मांडली जात आहे, हे पाहणे विशेषतः आनंददायक आहे. हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'व्होकल फॉर लोकल' या दूरदृष्टीचे खरे स्वरूप दर्शवते, ज्याद्वारे स्थानिक उत्पादनांना जागतिक स्तरावर पोहोचण्याची संधी मिळत आहे.

### राज्यपालांकडून कौतुक

ओडिशाचे राज्यपाल डॉ. हरी बाबू कंबमपती यांनीही ब्रिक्स मीडिया किटमध्ये कोरापुट कॉफीचा समावेश होणे हा राज्यासाठी एक अभिमानाचा क्षण असल्याचे म्हटले आहे. एका सोशल मीडिया पोस्टमध्ये राज्यपालांनी म्हटले आहे की, हे प्रदर्शन 'व्होकल फॉर लोकल' या भावनेचे प्रतिबिंब आहे, कारण ते शेतकरी, स्थानिक उत्पादने आणि ओडिशाच्या समृद्ध प्रादेशिक वारशाला एक जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देते. त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताची स्थानिक ताकद नव्या उंचीवर पोहोचत आहे.

### कॉफी अर्थव्यवस्था

११ सप्टेंबर २०१९ रोजी औपचारिकपणे सुरू झाल्यानंतर कोरापुट कॉफी ब्रँडच्या संघटित वाढीला गती मिळाली. या उपक्रमाचा उद्देश आदिवासी शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कॉफीसाठी एक पद्धतशीर बाजारपेठ तयार करणे आणि संपूर्ण मूल्य साखळी मजबूत करणे हा होता, जेणेकरून शेतकरी आणि स्थानिक समुदायांना त्यांच्या उत्पादनातून निर्माण होणाऱ्या आर्थिक मूल्याचा अधिक फायदा मिळू शकेल. कालांतराने, हा उपक्रम खरेदी, वाळवणे, प्रतवारी, प्रक्रिया, ब्रँडिंग, विपणन आणि किरकोळ विक्री या सर्व बाबींचा समावेश असलेल्या एका व्यापक प्रणालीमध्ये विकसित झाला आहे.

ही वाढ खरेदीच्या आकडेवारीतही दिसून येते. २०२५-२६ च्या हंगामात टीडीसीसीओएलने विक्रमी १०२.५४ मेट्रिक टन कॉफी फळांची खरेदी केली, जी २०२२-२३ मध्ये खरेदी केलेल्या ३४.६८ मेट्रिक टनांच्या जवळपास तिप्पट आणि २०२४-२५ मध्ये खरेदी केलेल्या ३४.४१ मेट्रिक टनांपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे. या वाढलेल्या खरेदीचा फायदा अंदाजे ३६० आदिवासी कुटुंबांना झाला, जे या प्रदेशात उपजीविकेची संधी म्हणून कॉफीची वाढती भूमिका दर्शवते. शेतकर्यांना थेट पैसे मिळावेत आणि पारदर्शकता वाढावी यासाठी खरेदी प्रणालीचे आधुनिकीकरणही करण्यात आले आहे. टीडीसीसीओएलने पारंपरिक रोख व्यवहारांऐवजी थेट बँक हस्तांतरणाचा पर्याय निवडला आहे आणि आदिवासी कॉफी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये थेट १०.७ दशलक्ष रुपये हस्तांतरित केले आहेत.

या उपक्रमात आदिवासी महिलांचा सहभागही वाढला आहे. एकूण ७१ आदिवासी महिला शेतकरी यात सहभागी आहेत, तर ४५.७ टक्के उत्पादकांनी कॉफी उत्पादकांची ओळख आणि डिजिटल देखरेख सुलभ करण्यासाठी स्मार्ट कार्डचा अवलंब केला आहे.

### कॉफी बीन्सच्या पलीकडे मूल्यवर्धन

कोरापुट कॉफीची वाढ आता केवळ कच्च्या कॉफी बीन्सच्या उत्पादनापुरती मर्यादित राहिलेली नाही. आता प्रक्रिया, गुणवत्ता सुधारणा, ब्रँडिंग, रिटेलिंग आणि ग्राहक प्रतिबद्धता यांचाही त्यात समावेश झाला आहे.

टीडीसीसीओएलने ओडिशा आणि दिल्लीमध्ये आठ कोरापुट कॉफी ब्रँड कॅफे स्थापन केले आहेत, ज्यात नाल्को दमनजोडी येथील एका आऊटलेटचा समावेश आहे. हे कॅफे केवळ ब्रँडला थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवत नाहीत, तर कॉफीमागील कथादेखील सांगतात. २०२३-२४ या आर्थिक वर्षात या कॅफेमधून एकूण १.६४ कोटी रुपयांची विक्री झाली. 'टायगर ब्राईट' व्यतिरिक्त भाजलेले बीन्स आणि इन्स्टंट कॉफीचा समावेश करण्यासाठी उत्पादन श्रेणीचा विस्तारही झाला आहे. मटायगर ब्राईट'ची १०,६३४ हून अधिक पाकिटे विकली गेली आहेत. यावरून असे दिसून येते की, कोरापुट कॉफी एका प्रादेशिक कृषी उत्पादनापासून एका ब्रँडेड ग्राहक उत्पादनामध्ये विकसित होत आहे.

### राष्ट्रीय मान्यता

कोरापुट कॉफीला राष्ट्रीय स्पर्धांमध्येही मान्यता मिळाली आहे. या उत्पादनाने २०२४ मध्ये दोन फाईन कप पुरस्कार जिंकले आणि कॉफी बोर्डाच्या 'फ्लेवर्स ऑफ इंडिया फाईन कप २०२४' स्पर्धेत चौथे स्थान पटकावले. या यशामुळे कोरापुटला एक उदयोन्मुख कॉफी-उत्पादक प्रदेश म्हणून स्थापित होण्यास मदत झाली आहे आणि एकेकाळी प्रामुख्याने ओडिशापुरते मर्यादित असलेल्या या उत्पादनाबद्दल देशव्यापी जागरूकता वाढली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही यापूर्वी त्यांच्या 'मन की बात' कार्यक्रमात कोरापुट कॉफीची प्रशंसा केली होती. २६ ऑक्टोबर रोजी त्यांनी याच्या चवीची प्रशंसा करीत याला ओडिशाचा अभिमान म्हटले होते. मोदी म्हणाले की, कॉफीची केवळ तिच्या चवीमुळेच प्रशंसा होत नाही, तर तिच्या लागवडीमुळे या भागातील लोकांसाठी, विशेषतः महिलांसाठी उपजीविकेच्या संधीही निर्माण होत आहेत. त्यांनी कोरापुट कॉफीच्या विलक्षण चवीचा आणि त्यामुळे या भागातील लोकांना मिळत असलेल्या फायद्यांचा उल्लेख केला. पंतप्रधानांनी नमूद केले की, कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणाऱ्यांसह काही लोकांनी त्यांच्या आवडीमुळे कॉफी लागवडीचा व्यवसाय स्वीकारला आहे. त्यांनी कॉफी लागवडीमुळे महिलांच्या जीवनात झालेल्या परिवर्तनावरही प्रकाश टाकला आणि सांगितले की, यामुळे त्यांना आदर आणि समृद्धी दोन्ही मिळाले आहे.

●●●

(पांचजन्यवरून साभार)



## राष्ट्ररक्षा

ब्रिगेडियर हेमंत महाजन/९०९६७०१२५३

# पाश्चात्त्य माध्यमांचा दृष्टिकोन; ब्रिक्सचे वास्तव

### ब्रिक्स परिषदेचे पूर्वग्रहदूषित सादरीकरण




नवी दिल्ली येथे पार पडलेली ब्रिक्स परिषद ही आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीतील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरली. या परिषदेत वेगवेगळ्या राजकीय व्यवस्था, हितसंबंध आणि आपापसातील जुने वाद असलेले अनेक देश एकत्र आले होते. या सर्व आव्हानांनंतरही परिषदेत महत्त्वाच्या आर्थिक आणि भू-राजकीय मुद्यांवर सर्व देशांचे एकमत झाले आणि 'नवी दिल्ली जाहीरनामा' एकमुखाने मंजूर करण्यात आला.

परंतु, या परिषदेचे प्रत्यक्ष यश आणि पाश्चिमात्य वृत्तसंस्थांनी केलेले याचे वर्णन यात मोठा फरक दिसून आला. बीबीसी आणि न्यू यॉर्क टाईम्स यासारख्या प्रमुख पाश्चिमात्य माध्यमांनी या परिषदेकडे संशयाने पाहिले. ही संघटना आपापसातील मतभेदांमुळे अपयशी ठरेल, असा अंदाज त्यांनी आधीच बांधला होता. ब्रिक्सच्या या परिषदेतील मुख्य यश आणि माध्यमांच्या बातम्यांचा अभ्यास केल्यावर असे दिसते की, पाश्चिमात्य विश्लेषक अनेकदा 'ग्लोबल साऊथ'च्या (विकसनशील देशांच्या) मुत्सद्देगिरीचे स्वरूप आणि उद्देश समजून घेण्यात चुकीचे ठरतात.

**पाश्चिमात्य माध्यमांचा दूषित दृष्टिकोन**

पाश्चिमात्य माध्यमांनी नवी दिल्ली परिषदेचे विश्लेषण स्वतःच्या प्राधान्यक्रमानुसार आणि राजकीय फायद्यांनुसार केले. ब्रिक्सने प्रत्यक्षात साध्य केलेल्या कामांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी त्यांनी अमेरिकन राजकारण, युक्रेन युद्ध किंवा पाश्चिमात्य जागतिक प्रभावाला असलेल्या धोक्यांवरच जास्त भर दिला.

**अमेरिकेतील अंतर्गत राजकारण**

पाश्चात्त्य विश्लेषणातील एक ठळक धागा असा होता की, बाह्य संकटांमुळे विशेषतः युक्रेनमधील युद्ध आणि वॉशिंग्टनमधील बदलत्या भूमिका, या मंचात फूट पडेल. बीबीसी आणि इतर प्रमुख माध्यमसंस्थांनी वारंवार असे वृत्त दिले की, ब्रिक्समधील चर्चा अमेरिकेतील राजकीय घडामोडींमुळे झाकोळल्या गेल्या होत्या.

प्रत्यक्षात मात्र, शिखर परिषद अंतर्गत गटाच्या अजेंड्यावरच काटेकोरपणे केंद्रित राहिली आणि पाश्चात्त्य वादविवादांना तिचे मुख्य मुद्दा बनू दिले नाही. अंतिम घोषणापत्रात एकतर्फी शुल्क, व्यापार निर्बंध आणि सक्तीच्या आर्थिक उपाययोजनांचा निषेध करण्यात आला; परंतु विशिष्ट पाश्चात्त्य राजकीय नेत्यांचा थेट उल्लेख टाळण्यात आला. अशाप्रकारे व्यापक आर्थिक तत्त्वांवर लक्ष केंद्रित ठेवण्यात आले.

**मतभेदातही सहकार्य**

माध्यम कव्हरेजने अनेकदा अनेक राष्ट्रांच्या या गुंतागुंतीच्या शिखर परिषदेचे रूपांतर एका एकमेव कथानकात केले. भारत आणि चीन यांच्यातील सामरिक स्पर्धेच्या कथानकात. इराण आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातील तणाव तसेच मध्यपूर्वेतील सुरक्षेविषयी त्यांच्या भिन्न भूमिकांवरही अतिरिक्त भर देण्यात आला.

या विरोधाभासांमुळे हा मंच स्वभावतःच अस्थिर असल्याचे चित्र उभे करून, पाश्चात्त्य भाष्याने ब्रिक्सच्या कूटनीतिक गाभ्याकडे दुर्लक्ष केले, म्हणजेच, सातत्यपूर्ण मतभेद असतानाही कार्यक्षम सहकार्य घडवून आणण्याची त्याची क्षमता.

**बातमीदारीचे दूषित स्वरूप**

**पाश्चिमात्य माध्यमांच्या या भूमिकेमागे दोन मुख्य कारणे आहेत:**

**संघर्षाला मिळणारे प्राधान्य:** माध्यमांना शांततेत झालेल्या करारांपेक्षा वाद, संघर्ष आणि स्पर्धा दाखवण्यात जास्त रस असतो. भारत आणि चीनमध्ये वाद ही बातमी ब्रिक्स देशांमध्ये अनेक मुद्यांवर सहमती या बातमीपेक्षा जास्त वाचली जाते.

**संस्थात्मक दूषित दृष्टिकोन** : पाश्चिमात्य पत्रकार ज्या समाजात राहतात, तेथील वित्तीय आणि सुरक्षेची व्यवस्था दुसऱ्या महायुद्धानंतर पाश्चिमात्य देशांनी बनवलेल्या नियमांवर आधारित आहे. त्यामुळे ते ब्रिक्सकडे नेहमी हा गट पाश्चिमात्य देशांना आव्हान देतोय का? याच नजरेतून पाहतात, हा गट विकसनशील देशांसाठी काय करतोय? असा विचार ते करीत नाहीत.

**ब्रिक्सची यशोगाथा**

पाश्चिमात्य माध्यमे मतभेदांवर चर्चा करत असताना, नवी दिल्ली परिषदेत अनेक महत्त्वाचे आर्थिक आणि तांत्रिक निर्णय घेण्यात आले. भारत, चीन, रशिया, इराण, यूएई, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका यासारख्या विविध देशांना एका मंचावर आणून सहमती घडवणे हे स्वतःतच एक मोठे यश होते.

**आर्थिक व्यवस्थेत सुधारणा**

परिषदेत विकसनशील देशांना पाश्चिमात्य आर्थिक दबावापासून वाचवण्यासाठी काही ठोस पावले उचलण्यात आली:

**स्थानिक चलनांचा वापर:** आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकन डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी स्थानिक चलनांमध्ये व्यवहार करण्याचे ठरवले गेले.

पर्यायी पेमेंट प्रणाली: पाश्चिमात्य बँकिंग प्रणालीवर पूर्णपणे अवलंबून न राहता स्वतःची पेमेंट यंत्रणा तयार करण्यावर भर दिला गेला.

**न्यू डेव्हलपमेंट बँक:** पाश्चिमात्य कर्जांच्या कडक अटींशिवाय विकासकामांसाठी कर्ज देणाऱ्या 'न्यू डेव्हलपमेंट बँक'ची भूमिका मजबूत करण्यात आली.

**कृत्रिम बुद्धिमत्ता व तंत्रज्ञान**

पारंपरिक व्यापारापलीकडे जाऊन ब्रिक्स देशांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी नियम आणि नियमावली बनवण्यावर सहमती दर्शवली. एआय तंत्रज्ञानाचा वापर सर्वांसाठी समान आणि सुरक्षित असावा, यावर भर देण्यात आला.

**जागतिक संस्थांमध्ये बदलांची मागणी**

नवी दिल्ली जाहीरनाम्यात जागतिक संस्थांमध्ये तातडीने सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली:

आयएमएफ आणि जागतिक बँक: विकसनशील देशांना त्यांच्या लोकसंख्येच्या आणि अर्थव्यवस्थेच्या प्रमाणात योग्य प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे.

**जागतिक व्यापार संघटना:** व्यापारातील अन्यायकारक धोरणे थांबवण्यासाठी डब्ल्यूटीओची नियम-प्रणाली पुन्हा मजबूत करणे.

**दहशतवादाविरोधात ठाम भूमिका:** भारताच्या पुढाकाराने दहशतवादाविरोधात अत्यंत कठोर आणि स्पष्ट भाषा जाहीरनाम्यात समाविष्ट करण्यात आली.

**ब्रिक्स विरुद्ध पाश्चिमात्य देश**

पाश्चिमात्य विश्लेषक ब्रिक्सचे चुकीचे आकलन

| वैशिष्ट्ये | पाश्चिमात्य मॉडेल (G7, NATO) | ब्रिक्स मॉडेल (BRICS) |
|---|---|---|
| नेतृत्व | एकच प्रमुख देश (अमेरिका) धोरण ठरवतो | बहुध्रुवीय गट; कोणताही एकच देश हुकूमशाही चालवत नाही |
| विचारसरणी | सर्वांची समान राजकीय आणि लष्करी विचारसरणी | विविध राजकीय व्यवस्था आणि परस्पर विरोधी देश एकत्र |
| निर्णय प्रक्रिया | कडक नियम आणि लष्करी किंवा राजकीय बंधने | सहमतीने आणि लवचिकतेने घेतलेले निर्णय |
| उद्देश | पाश्चिमात्य प्रभावाचे रक्षण करणे | जागतिक व्यवस्थेत सुधारणा आणि विकास साधणे |

करतात, कारण ते ब्रिक्सची तुलना जी-७ किंवा नाटोसारख्या पाश्चिमात्य संघटनांशी करतात.

ब्रिक्स ही लष्करी संघटना नाही. इथे देश एकमेकांशी चर्चा करतात, तडजोड करतात आणि जिथे सहमती शक्य आहे तिथे एकत्र काम करतात.

**ब्रिक्स पाश्चात्त्य-विरोधी नाही, सुधारणावादी आहे**

पाश्चिमात्य माध्यमांचा सर्वांत मोठा भ्रम हा आहे की, ते ब्रिक्सला अमेरिका-विरोधी किंवा पाश्चात्त्य-विरोधी गट मानतात. परंतु ब्रिक्स देशांचे मुख्य उद्दिष्ट पाश्चिमात्य देशांना नष्ट करणे नसून, स्वतःच्या रास्त गरजा पूर्ण करणे हे आहे:

**स्वस्त ऊर्जेचा पुरवठा:** स्वतःच्या उद्योगांसाठी स्वस्त आणि शाश्वत ऊर्जा मिळवणे.

**आर्थिक सुरक्षितता:** अमेरिकन डॉलरच्या मूल्यात होणाऱ्या चढ-उतारांपासून स्वतःच्या अर्थव्यवस्थेला वाचवणे.

**जागतिक निर्णयांमध्ये सहभाग:** संयुक्त राष्ट्र आणि इतर संस्थांमध्ये स्वतःचा आवाज पोहोचवणे.

स्वतःच्या देशाचा विकास साधणे म्हणजे पाश्चिमात्य देशांशी शत्रूत्व पत्करणे असा होत नाही.

**भारताचे मुत्सद्दी यश:** ग्लोबल साऊथचा मजबूत आवाज

भारतासाठी ही परिषद अत्यंत यशस्वी ठरली. भारताने या परिषदेत खालील महत्त्वाच्या गोष्टी साध्य केल्या:

**बड्या सत्तांमध्ये समतोल:** भारताने एकाच वेळी रशिया, चीन, इराण, यूएई आणि पाश्चिमात्य देशांशी असलेले आपले संबंध उत्तम प्रकारे सांभाळले.

**ग्लोबल साऊथचे नेतृत्व:** भारताने स्वतःला विकसनशील देशांचा मुख्य प्रतिनिधी आणि विकसित व विकसनशील देशांमधील 'जोडणारा पूल' म्हणून सिद्ध केले.

**भारताच्या मुद्यांवर सहमती:** जाहीरनाम्यात दहशतवादाविरोधात कडक पावले उचलण्याबाबत सर्व देशांचे एकमत घडवून आणले.

**निष्कर्ष** : नवी दिल्लीतील ब्रिक्स परिषदेने हे स्पष्ट केले की, पाश्चिमात्य माध्यमांचे भाकित आणि प्रत्यक्ष वास्तव यात मोठी दरी आहे. पाश्चिमात्य माध्यमे ब्रिक्सला एक अस्थिर आणि वादग्रस्त गट म्हणून पाहात राहिली, तर ब्रिक्स देशांनी शांतपणे एकत्र येत आर्थिक सुधारणा, व्यापार आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील सहकार्याची नवी पायाभरणी केली.

ब्रिक्स हा कोणत्याही देशाच्या विरोधात बनलेला गट नाही; तर तो बदलत्या जगात विकसनशील देशांना स्वतःचे स्थान, अधिकार आणि स्वायत्तता मिळवून देणारा एक अत्यंत महत्त्वाचा जागतिक मंच बनला आहे.

●●●

---

## मंथन

डॉ. विवेक राजे/९८८१२४२२२४

# खबरदार!!!

गणपती आले अन् एक चर्चा नेहमीप्रमाणे सुरू झाली. तसा हा मागील अनेक वर्षांचा प्रघात झाला आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसं आजकाल या चर्चांकडे दुर्लक्षच करीत असतात. तशा या चर्चा माध्यमांमध्ये हिंदूंच्या प्रत्येकच सणाला रंगवण्याचा प्रघातही आहेच. म्हणजे गणपती उत्सव आला मिरवणुका, वाढलेली रहदारी, गणपतींच्या मांडवामुळे रस्त्यावर होणारे अतिक्रमण, कानठळ्या बसवणारे प्रचंड लाऊडस्पीकर यावर कुणीतरी तावातावाने बोलणार. मग कुणीतरी त्याचा प्रतिवाद करणार. तोपर्यंत गणपतीचे दहा दिवस संपून पितृ पंधरवडा सुरू होतो. मग सगळे काही शांत होते. कदाचित आता दिवाळीला चर्चा कोण आणि कशी सुरू करणार, याची तयारी करण्यासाठी सगळे शांत होतात. दिवाळीत फटाक्यांनी प्रदूषण होते म्हणून फटाके उडवू नयेत, यावर कुणीतरी प्रसिद्ध व्यक्ती भाष्य करून पुढाकार घेण्याची सगळेच वाट पहातात. मग दिवाळीत दिवाळीअंक, फटाक्यांचा विरोध, विकत आणले गेलेले फराळाचे पदार्थ आणि अर्थातच फटाके उडवून वातावरण पुन्हा शांत होते ते होळीची वाट पाहात. मग पुन्हा पाणी कमी आहे. रंगातील केमिकल्स, व्हार्निश यावर चर्चा उसळते आणि भरपूर रंग खेळून, पाणी वापरून होळी साजरी केली जाते. म्हणजे हिंदू समाजाच्या प्रत्येक सणाला अशा चर्चांची खमंग फोडणी घालून या उत्सवांची खुमारी वाढते एवढे मात्र खरे. यावर्षीच्या गणेशोत्सवाला खमंग फोडणी घालण्याचे काम पुण्यात सुरू झाले. मग त्या व्यक्तीला मारहाण करून, त्याला मानसिक ऋग्ण ठरवून त्याची खुमारी वाढवली गेली. त्या व्यक्तीने देखील उत्तम टायमिंग साधत, स्वरचीत संस्कृत अवतरणे देत, अतिरेकी विधाने (सैन्याचा वापर, बळाचा वापर करावा असे प्रशासनिक सल्ले देत) करीत आपल्या परीने चर्चेला तडका दिला. मग पोलिस आणि स्थानिक प्रशासनाने आपण कसे कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी तत्पर आहोत हे दाखवले आणि सार्वजनिक गणेशोत्सवाचा विषय गाजत ठेवला. प्रसिद्धी माध्यमांनी आपली भूमिका चोख बजावली. सोशल मीडियावर सगळ्यांनाच विषय मिळाले. कुणाला आस्तिक नास्तिक, कुणाला धर्म स्वातंत्र्य, कुणाला घटनादत्त अधिकार, कुणाला आरोग्य विषयक विचार, असे विषय चघळायला मिळाले आणि या देशाच्या संविधानाने दिलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित आहे, याची सगळ्यांचीच खात्री पटली. एक प्रश्न मात्र इथे न राहवून मांडावासा वाटतो. काय हिंदू उत्सवांच्या आडून हिंदू धर्म, हिंदू संस्कृतीच्या अभिव्यक्तीवरच संशय, अविश्वास व्यक्त करण्याचा आणि हजारो वर्षे हिंदू माणसांनी प्रयत्नपूर्वक जिवंत ठेवलेली ही संस्कृती, माणसालाच हानीकारक आहे, असे ठरवण्याचा तर हा प्रयत्न नाही ना?

कारण यात हिंदू धर्मातील जीवन दृष्टीवरच घाला घातला जाताना दिसतो आहे. मुळात उत्सव, सणवार हे आस्तिक (हा मुद्दामच वापरलेला शब्द) माणसाच्या चित्तवृत्ती उल्हसित करण्यासाठी तसेच निसर्गातील काही नियमितपणे होणाऱ्या बदलांचे स्वागत करण्यासाठी हेतुपुरस्सर हिंदू धर्मात आयोजित केल्या गेलेल्या गोष्टी आहेत. यांच्या उद्‌भवात एक सर्जनशील विचार होता आणि आहे. यात चित्तवृत्ती जशा उल्हसित होतात तसेच जीवनाला कार्यरत राहण्यासाठी एक निश्चित अशी कार्यक्रम आधारित बांधिलकी, दिशा अथवा कारण देखील निर्माण होते. एखाद्या कुटुंबातील कुळाचार, सण वार, आराध्य देवतांचे नवरात्र या सगळ्या गोष्टी त्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला निश्चित असे आचार आणि विचार प्रदान करते तसेच सर्वांना उत्साह देणारे असते. त्याचवेळी या निमित्ताने त्या कुटुंबाला, इतर कुटुंबांशी पर्यायाने समाजाशी जोडणारे असते. कुटुंबाची ही



अभिव्यक्ती जेव्हा सार्वजनिक होते, तेव्हा त्यावर निश्चितच काही बंधने वा नियंत्रणे असणे स्वाभाविक होय. आज काही लोकं या उत्सवांच्या अभिव्यक्तीलाच जर धर्म समजत असतील तर ते त्यांचे अज्ञान आहे. कारण हिंदू धर्मात धर्माच्या अत्यंत सुरेख आणि नेटक्या व्याख्या केल्या गेल्या आहेत. त्याकडे आज कुणीच लक्ष देताना दिसत नाही. उलट ख्रिश्चन आणि इस्लाम धर्मांनी सांगितल्याप्रमाणे उपासना पद्धती म्हणजेच धर्म अशी अनेकांनी समजूत करून घेतलेली आढळते. हिंदू समाजात धर्माची संकल्पना अतिशय व्यापक असून, त्यात सर्व प्राणिमात्रात, निर्जीव वस्तूंमध्ये, निसर्गात एकत्व पाहण्याची दृष्टी, आत्मशोध, अहंकाराचा क्षय, सत्याचा शोध, कर्म आणि त्याची नैतिक जबाबदारी, अंतर्मुखता आणि आत्मज्ञान, उपसना स्वातंत्र्य तसेच उपासनामार्ग निवडीचे स्वातंत्र्य, इत्यादी अनेक गोष्टींचा अंतर्भाव आहे. खरे तर, हा हिंदू धर्माचा गाभा आहे. या गाभ्याला समर्पक अशा तत्त्वज्ञानाचा देखील हिंदू धर्मात समावेश आहे.

एखादा उत्सव किंवा मूर्ती म्हणजे धर्म नव्हे. मूर्ती किंवा तो उत्सव त्या मागील आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा प्रतीकात्मक आविष्कार असतो. त्यामुळे हिंदू धर्मातील प्रतीकांचा, उत्सवांचा प्रतिवाद वा विरोध करणे संपूर्णपणे चुकीचेच ठरते. प्रतीकाना धर्म समजणे वेगळे आणि प्रतीकं ज्या तत्त्वांना प्रक्षेपित करते ते तत्त्व समजून घेणे वेगळे. गणेशोत्सव ही हिंदू धर्मातील समानतेची तसेच एकात्मतेची अभिव्यक्ती होय. इथे लक्षात घेतले पाहिजे की, काळाच्या ओघात समाज धर्मात अनेक प्रथा-परंपरा निर्माण होत जातात. काही अनुकरणीय असतात, काही दीर्घकाळ चालतात तर काही तात्कालिक असतात तसेच काही हळूहळू विकृत होत जातात. अशा प्रथांचे चिकित्सक विश्लेषण करणे समाज स्वाथ्याचा विचार करता आवश्यकच असते. त्यात सुधारणा करणे ही हिंदू समाजाचीच जबाबदारी आहे. कारण हिंदू धर्म परंपरा, स्वतःचे आत्मपरीक्षण करून त्यात काळानुरूप सुधारणा करण्याची हिंदू समाजाची क्षमता अधोरेखित करते.

त्यामुळे अर्थातच ध्वनिप्रदूषण आणि त्याला केला जाणारा विरोध हे हा समाज समजू शकतो. दरवर्षी अनेक ठिकाणी गणेशोत्सव मंडळे यात स्वतःहून सुधारणा करताना दिसतात. म्हणूनच सरसकटपणे जर कोणी गणेशोत्सव, गणपती मिरवणुकी बंद करा म्हणत असेल, पंढरीची वारी गावातून न जाता सुनसान रस्त्यावरून न्यायची तर न्या, अन्यथा बंद करा, असे म्हणत असेल, तर तो हिंदू धर्म विचारांवरच हल्ला ठरतो, हे सर्व समाजाने लक्षात घेतले पाहिजे. तसेच सार्वजनिक उत्सव हे समाजाला, समाजातील प्रत्येक घटकाला जवळ आणण्याचे कार्य करीत असतात. रोजच्या आयुष्यातील ताण, आर्थिक संघर्ष, स्पर्धा, असुरक्षितता आणि न्यूनगंड घेऊन जगणाऱ्या माणसाला वर्षातून काही दिवस सामूहिक सहभागित्व देणारा उत्सव हा आनंद देणारा तर असतोच. तसेच आपण या जीवनसंघर्षात एकटे नाही, ही उत्साहवर्धक जाणीवही करून देत असतो. सामाजिक सहभाग हा नेहमीच हिंमत देणारा असतो. गणेशोत्सव समाज शिक्षणाचेही कार्य करीत असतात. आज अनेक शहरांमध्ये दोन-तीन सामाजिक प्रश्न घेऊन त्यावर सार्वजनिक गणेशोत्सव सजावट करण्यासाठी स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्याचा समाज शिक्षण आणि जागृती हा परिणाम देखील सहजपणे जाणवणारा आहे. त्यामुळे कर्णकर्कश आवाजाने होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाला विरोध समजू शकतो. परंतु सार्वजनिक हिंदू धर्म अभिव्यक्तीला होणारा विरोध कोणत्याही परिस्थितीत मान्य होणारा नाही. सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांनी १८९३ मध्ये सुरू करून त्याला लोकप्रिय केला. आज महाराष्ट्रातील सार्वजनिक गणेशोत्सवाला १३३ वर्षांचा इतिहास आहे. या उत्सवांनी स्वातंत्र्य चळवळीत जसे योगदान दिले तसेच त्यामुळे सतत सामाजिक अभिसरण देखील घडले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. या सार्वजनिक गणेशोत्सवांनी समाज जागृती आणि लोकशिक्षणातून सामाजिक सहभाग देखील साध्य केला आहे. त्यामुळे तो बंद करावा, मानाचे गणपती बाहेर जावेत हे म्हणणे एक विकृतीच ठरते. त्यामुळे उत्सव हवा; उन्माद नको, परंपरा हव्या; विकृती नको. धार्मिक स्वातंत्र्य हवे; हे सगळे बंद करा हा साम्यवादी अहंकार नको. सामाजिक चळवळ हवी, योग्य त्या मुद्यांसाठी आंदोलन हवे; अराजक नको. सामाजिक सुधारणा, आनंद, लोकशिक्षण हवे; विकृत एकारलेपण नको, हीच योग्य भूमिका ठरते आणि ते कठीणही नाही. हवी आहे ती राजकीय आणि सामाजिक प्रामाणिकता. हेतूंची शुद्धता. योग्य त्या स्वरूपात समाज सुधारणेची, धर्म सुधारणेची प्रामाणिक तळमळ. दुर्दैवाने हिंदू समाजातील काही घटकांच्या हे पचनीच पडत नाही. त्यामुळे जर खरोखरच गणेशोत्सवात सुधारणा करायची असेल, तर ती समाजाला सोबत घेऊन करावी लागेल. हे करताना हिंदू धर्माच्या मूळ गाभ्याचा तसेच विस्ताराचा विचार करून ते करावे लागेल. हिंदू धर्माच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाची चौकट कायम ठेवून करावे लागेल. कारण आज हिंदू समाजाला इतर धर्मीय एकारलेपण आणि उथळ तत्त्वज्ञान व्यवस्थितपणे कळलेले आहे. तेव्हा ध्वनिप्रदूषणाला विरोध जरूर करा, पण आमच्या श्रद्धांना हात लावाल तर खबरदार!

●●●

---

## आत्मनिर्भरता

कुलदीप सिंग

# भारताची क्षेपणास्त्र सज्जता

### ऑपरेशन सिंदूरनंतर भारत दीर्घकाळ चालणाऱ्या युद्धाच्या दृष्टीने आपला क्षेपणास्त्रांचा साठा वाढवत आहे. आकाश-एनजी, प्रलय, पिनाका, अस्त्र मार्क-२ आणि प्रोजेक्ट कुशा यांचा सर्वसमावेशक आढावा घेऊन उत्पादन आणि स्वदेशीकरणातील आव्हाने समजून घ्या.

भारत एका मोठ्या आणि दीर्घकाळ चालणाऱ्या युद्धासाठी सातत्याने स्वतःला तयार करीत आहे. देशाने हवेतून हवेत मारा करणारी, जमिनीवरून हवेत मारा करणारी, रणगाडाविरोधी, जहाजविरोधी किंवा लांब पल्ल्याची अशा जवळपास प्रत्येक प्रमुख लढाऊ कार्यासाठी स्वतःची क्षेपणास्त्र प्रणाली विकसित केली आहे. परंतु खरे आव्हान हे आहे की, त्यांचे इतक्या मोठ्या संख्येने उत्पादन करणे की दीर्घकाळ चालणाऱ्या युद्धाच्या परिस्थितीत त्यांची त्वरित भरपाई करता येईल.

ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात सरकारने डीआरडीओचे पारंपरिक क्षेपणास्त्र प्रणाली तंत्रज्ञान भारतीय कंपन्यांना हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला. यामुळे भारताच्या क्षेपणास्त्र क्षमता, त्यांची मारक क्षमता, त्यापैकी किती स्वदेशी आहेत आणि त्यात कोणत्या उणिवा आहेत, याबद्दल प्रश्न निर्माण झाले.

मे २०२५ मध्ये 'ऑपरेशन सिंदूर'ने दीर्घकालीन मोहिमांमध्ये अचूक शस्त्रे, हवाई संरक्षण आणि पुरेशा क्षेपणास्त्र साठ्याचे महत्त्व दाखवून दिले. त्याच महिन्यात आंध्र प्रदेशातील नागायलंका येथे १,४६० कोटींच्या नवदुर्गा संरक्षण चाचणी केंद्राची पायाभरणी करण्यात आली. जुलै २०२६ मध्ये ४०० किलोमीटरपर्यंत मारक क्षमता असलेल्या 'प्रोजेक्ट कुशा' या स्वदेशी लांब पल्ल्याच्या जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची पहिली उड्डाण चाचणी झाली. ऑगस्ट २०२६ मध्ये संरक्षण मंत्रांनी डीआरडीओचे तंत्रज्ञान खाजगी कंपन्यांना हस्तांतरित करण्यास मंजुरी दिली. 'प्रोजेक्ट कुशा' २०१८ ते २०३० दरम्यान टप्प्याटप्प्याने बंद करण्याची योजना आहे.

**भारताकडील पारंपरिक क्षेपणास्त्रे** : हवाई संरक्षणात आकाश, आकाश-एनजी, ओआरएसएएम आणि व्हीशॉर्ड्स यांचा समावेश आहे. अस्त्र मालिकेतील हवेतून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे विकसित केली जात आहेत. रडार आणि हवाई संरक्षण प्रणाली नष्ट करण्यासाठी रुद्रमचा वापर केला जातो. रणगाडाविरोधी क्षेपणास्त्रांमध्ये नाग मालिका, सँट आणि एमपी-एटीजीएम यांचा समावेश आहे. नौदल क्षेपणास्त्रांमध्ये एनएएसएम-एसआर या जहाजविरोधी क्षेपणास्त्रांचा समावेश आहे. भू-हल्ल्यासाठीच्या क्षेपणास्त्रांमध्ये लाँग रेंज लँड अटॅक क्रूझ मिसाईल आणि प्रलय यांचा समावेश आहे. पिनाका रॉकेट तोफखान्याचे काम करते. ब्रह्मोस हा भारत-रशियाचा संयुक्त कार्यक्रम आहे आणि एमआरएसएएम हा भारत-इस्रायली कार्यक्रम आहे. अग्नी आणि के-मालिका ही सामरिक क्षेपणास्त्रे असून, ती आण्विक प्रतिबंधाचा भाग आहेत, त्यामुळे या क्षेपणास्त्रांचे तंत्रज्ञान जाहीर करण्यात आलेले नाही.

जर आपण या क्षेपणास्त्रांच्या मारा करण्याच्या क्षमतेवर नजर टाकली, तर अस्त्र मार्क-१ चा पल्ला १०० किलोमीटरपेक्षा जास्त आहे. मार्क-२ चा पल्ला अंदाजे २०० किलोमीटर आणि मार्क-३ (गांडीव)चा पल्ला त्याहून जास्त आहे. प्रलय ५०० किलोमीटरपर्यंत मारा करू शकतो. ब्रह्मोसचा पल्ला अंदाजे ४५० किलोमीटर आहे आणि ८०० किलोमीटर पल्ल्याचे क्षेपणास्त्रही विकसित केले जात आहे. पिनाका मार्गदर्शित रॉकेट अंदाजे १२० किलोमीटरपर्यंत पोहोचतात. क्यूआरएसएएमचा पल्ला ३० किलोमीटर आहे. लांब पल्ल्याच्या हवाई संरक्षणासाठी रशियन एस-४०० उपलब्ध आहे आणि एक स्वदेशी पर्याय म्हणून प्रोजेक्ट कुशा विकसित केला जात आहे.

**कमतरता कुठे?** : सरकारच्या प्रयत्नांमुळे अनेक मोठ्या खाजगी कंपन्यांनी या क्षेत्रात प्रवेश केला असला तरी, मुख्य समस्या उत्पादन क्षमता हीच आहे. भारत क्षेपणास्त्रांची रचना, विकास आणि चाचणी करू शकतो, परंतु दीर्घ कालावधीसाठी मोठ्या प्रमाणात उत्पादन करणे आणि युद्धासाठीचा साठा पुन्हा भरून काढणे हे एक आव्हान आहे. जर एखादे क्षेपणास्त्र केवळ एक किंवा दोन कारखान्यांवर अवलंबून असेल, तर तेथील व्यत्ययांमुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. अनेक कंपन्यांनी त्यांचे उत्पादन केल्यास ते अधिक चांगले होईल. काहीवेळा क्षेपणास्त्रे भारतात एकत्र केली जातात, परंतु सीकर,



प्रणोदन, इलेक्ट्रॉनिक्स किंवा महत्त्वाचे घटक आयात केले जातात.

**स्वदेशीकरण म्हणजे काय?** : केवळ भारतात एकत्र करणे म्हणजे स्वदेशीकरण नव्हे. एका क्षेपणास्त्रात एअरफ्रेम, प्रणोदन, सीकर, मार्गदर्शन, इलेक्ट्रॉनिक्स, वॉरहेड आणि सॉफ्टवेअर यांचा समावेश असतो. अनेक घटक अजूनही परदेशातून येतात. सरकारच्या मते, १५,७०० हून अधिक संरक्षण वस्तू स्वदेशी बनावटीच्या आहेत, ज्यामुळे आयातीत अंदाजे ९,००० कोटींची घट झाली आहे. २०२५-२६ पर्यंत देशांतर्गत संरक्षण उत्पादन १.७८ लाख कोटींपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, ज्यामध्ये खाजगी क्षेत्राचा वाटा अंदाजे २४ टक्के असेल.

**सर्वांत महत्त्वाचे घटक** : सीकर, प्रणोदन प्रणाली आणि प्रगत इलेक्ट्रॉनिक्स हे सर्वांत महत्त्वाचे आणि संवेदनशील भाग आहेत. भारताने स्वदेशी सीकर आणि गॅलियम-नायट्राइडसारख्या तंत्रज्ञानात प्रगती केली आहे, परंतु काही महत्त्वाच्या घटकांसाठी अजूनही परदेशी देशांवर अवलंबित्व आहे. युद्धाच्या काळात जर आयात केलेले भाग उपलब्ध नसतील, तर जुळणीचे कामही थांबवले जाऊ शकते.

उदाहरणार्थ, भारताचा कणा मानले जाणारे ब्रह्मोस क्षेपणास्त्र पूर्णपणे स्वदेशी नाही. हा भारत-रशियाचा संयुक्त कार्यक्रम आहे. भारताने स्थानिक पातळीवर अनेक घटक, इलेक्ट्रॉनिक्स आणि नियंत्रण प्रणाली विकसित केल्या आहेत, परंतु प्रणोदनासारखे काही महत्त्वाचे भाग अजूनही रशियन आहेत.

**कशाची कमतरता** : एस-४०० मध्ये लांब पल्ल्याच्या हवाई संरक्षणाची सर्वोच्च क्षमता आहे. प्रोजेक्ट कुशा त्यावरचे अवलंबित्व कमी करेल. मार्क-१ हवेतून हवेत मारा करणारे शस्त्र स्वदेशी आहे आणि मार्क-२ व त्यानंतरच्या आवृत्त्या अधिक पल्ला गाठतील. रशियन आर-३७एम चा देखील अल्प कालावधीसाठी विचार केला जात आहे. गरज विविध प्रकारच्या क्षेपणास्त्रांची नाही, तर वाढीव उत्पादन, मोठा साठा आणि एका मजबूत पुरवठा साखळीची आहे.

**खाजगी कंपन्या** : अदानी डिफेन्सने कानपूरजवळ ३,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचा एक कारखाना उभारला आहे. कल्याणीचा एका इस्रायली कंपनीसोबत संयुक्त उपक्रम आहे. लार्सन अँड टुब्रो, टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम्स आणि भारत फोर्ज यासारख्या कंपन्याही कार्यरत आहेत. डीआरडीओने १३० हून अधिक कंपन्यांना तंत्रज्ञान हस्तांतरित केले आहे. तथापि, एक संपूर्ण क्षेपणास्त्र तयार करण्यासाठी विशेष पायाभूत सुविधा, यंत्रसामग्री, चाचणी आणि पुरवठादार नेटवर्कची आवश्यकता असते. केवळ तंत्रज्ञान पुरेसे नाही. कारखाने, यंत्रसामग्री, कुशल कर्मचारी आणि मोठ्या, नियमित मागण्यांची आवश्यकता असते. लहान किंवा अनियमित मागण्यांवर समर्पित उत्पादन लाईन स्थापित करणे कठीण आहे.

●●●

(पांचजन्यवरून साभार)

## अन्वयार्थ

# ‘आम्ही’ हाच भारताच्या विचारधारेचा गाभा

उदयपूर येथे ‘हम, भारत के लोग’ (आम्ही, भारताचे लोक) या विषयावरील व्याख्यानात बोलताना हनुमान सिंह राठोड म्हणाले की, भारताची सभ्यताविषयक विचारधारा व्यक्तींना वैयक्तिक स्वार्थाच्या पलीकडे जाऊन आपलेपणा, त्याग आणि सर्वकल्याण यांवर आधारित सामूहिक भावनेचा स्वीकार करण्याचे आवाहन करते.

पथे कण संस्था, विश्व संवाद केंद्र आणि रवींद्रनाथ टागोर मेडिकल कॉलेज, उदयपूर यांच्या संयुक्त वतीने हस्तीमल व्याख्यानमाले अंतर्गत ‘हम, भारत के लोग’ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. येथील माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष हनुमान सिंह राठोड या कार्यक्रमाचे मुख्य वक्ते होते.

‘हम, भारत के लोग’ या विषयावर व्याख्यान देताना राठोड यांनी भारताची राष्ट्रीय ओळख, भारतीय बौद्धिक परंपरा आणि ‘मी’कडून ‘आम्ही’कडे होणारा प्रवास यावर प्रकाश टाकला.

ते म्हणाले की, आज जगासमोर आपण कोण आहोत? हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला आहे. राष्ट्रीय ओळखीशी संबंधित संकटावर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. भारतीय संदर्भातही एखादी



व्यक्ती ‘मी’ कडून ‘आम्ही’ कडे कशी वाटचाल करू शकते आणि या सामूहिक जाणीवेचा पाया कशाने बनतो, हे समजून घेणे गरजेचे आहे.

भारताच्या तत्त्वज्ञानाबद्दल बोलताना राठोड म्हणाले की, हे तत्त्वज्ञान जगात अस्तित्वात असलेल्या प्रत्येक गोष्टीमध्ये दैवी अंश पाहण्याची दृष्टी प्रदान करते. ‘मी’ कडून ‘आम्ही’ कडे होणारा प्रवास हा त्यागाच्या आणि समष्टीप्रती (सामूहिक हिताप्रती) असलेल्या संवेदनशीलतेच्या जीवनातून सुरू होतो.

भारतीय विचारसरणी केवळ व्यक्तीपुरती मर्यादित नाही. ती कुटुंब, समाज आणि संपूर्ण जग यांना एक परस्पर-संबंधित घटक म्हणून पाहण्याची दृष्टी प्रदान करते. भारतीय समाजातील ‘कुटुंब’ ही भावना याच विचाराचे एक प्रकटीकरण आहे. त्याग आणि आपुलकीची भावना कुटुंबाची निर्मिती करते; ही भावना पुढे ‘वसुधैव कुटुंबकम्’ या आदर्शापर्यंत विस्तारते आणि संपूर्ण जगाला एक कुटुंब मानण्याची प्रेरणा देते.

भारतीय परंपरा केवळ मानवांप्रतीच नव्हे, तर सर्व सजीवांप्रती संवेदनशीलता दर्शवते. सजीवांबद्दलचा आदर आणि कुटुंबे व समाजातील पशू-पक्ष्यांबद्दलची करुणा ही उदाहरणे भारतीय जीवनशैलीत रुजलेली ‘संपूर्ण सृष्टीबद्दलची आपुलकीची भावना’ अधोरेखित करतात. वेद आणि उपनिषदांनी हा व्यापक दृष्टीकोन समाजासमोर मांडला आहे.

जे लोक केवळ स्वतःचा विचार करतात आणि स्वतःसाठीच जगतात, ते समाज आणि मानवतेप्रती असलेल्या आपल्या जबाबदाऱ्यांपासून दूर जातात. जगाचे विविध वर्ग आणि गटांमध्ये विभाजन करू पाहणाऱ्या विचारसरणींचा उल्लेख करीत त्यांनी सांगितले की, याउलट भारतीय विचार संपूर्ण जगाच्या कल्याणाचा आदर्श मांडतो.

‘सर्वे भवन्तु सुखिनः’ (सर्वजण सुखी होवोत), ‘प्राण्यांमध्ये सद्भावना असो’ आणि ‘विश्वाचे कल्याण होवो’ हे आदर्श भारतीय जीवनदर्शनाची वैश्विकता दर्शवतात. केवळ स्वतःचा गट किंवा स्वतःच्या हिताचा विचार करणारी व्यक्ती ‘आपलेपणाची’ (किंवा ‘आम्ही’ची) भावना विकसित करू शकत नाही. जेव्हा एखादी व्यक्ती संपूर्ण समाज आणि जगाच्या कल्याणाचा विचार करू लागते, तेव्हाच ही भावना निर्माण होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

भारताच्या ऐतिहासिक भूमिकेवर प्रकाश टाकताना राठोड म्हणाले की, भारताने जगावर प्रभाव पाडण्यासाठी शस्त्रांचा नव्हे, तर ज्ञान, शिक्षण, संस्कृती, वेद आणि चारित्र्याचा आधार घेतला. भारतीय संस्कृतीने लोकांना चारित्र्य आणि आचरणाच्या माध्यमातून जोडले. ही परंपरा भारताच्या ऋषीमुनी आणि शिक्षकांचे योगदान आहे; त्यांनीच कौटुंबिक भावना आणि मानवी मूल्यांसह जगण्याचा मार्ग दाखवला. आज जात, वर्ग आणि विविध गटांच्या आधारावर समाजाचे विभाजन करू पाहणाऱ्या प्रवृत्ती दिसून येत आहेत. संकुचित विचारसरणीच्या आधारे समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न केले जात आहेत. अशा प्रवृत्तींबाबत सतर्क राहण्याचे आणि भारतीय तत्त्वज्ञान व सामाजिक सलोख्याच्या पायावर आपलेपणाची भावना अधिक दृढ करण्याचे आवाहन त्यांनी केले.

घटना समितीच्या कामकाजाचा संदर्भ देत राठोड म्हणाले की, नागरिकांनी संविधान निर्मितीच्या वेळी झालेल्या चर्चांचा अभ्यास केला पाहिजे. घटना समितीत स्वतंत्र भारताची ओळख, भाषा आणि राष्ट्राशी संबंधित मुद्यांवर सखोल चर्चा झाली होती. राष्ट्रगीत आणि राष्ट्रगानाशी (वंदे मातरम्) संबंधित चर्चांचा उल्लेख करत ते म्हणाले की, राष्ट्राला ‘माता’ मानण्याची भावना आणि त्याबद्दल आपलेपणाची भावना नागरिकांना ‘मी’ कडून ‘आम्ही’कडे घेऊन जाते. भारताकडे केवळ एक राजकीय किंवा भौगोलिक अस्तित्व म्हणून पाहू नये, तर एक जिवंत सांस्कृतिक जाणीव म्हणून पाहिले पाहिजे. भारतीय तत्त्वज्ञान, समाज आणि संस्कृतीच्या आधारे, वैयक्तिक स्वार्थाच्या पलीकडे जाऊन समाज आणि राष्ट्राला केंद्रस्थानी ठेवून ‘आम्ही’ची भावना कशी विकसित करता येईल, यावर चिंतन करण्याची गरज आहे. ●●●

(ऑर्गनायझरवरून साभार)

## अंतराळ भरारी

# भारताचा ‘तिसरा डोळा’

डॉ. निमिष कपूर

**भारताने आपल्या अवकाश निगराणी क्षमतेला नव्या उंचीवर नेले आहे. ईओएस-०५ च्या यशस्वी प्रक्षेपणामुळे देशाला एक ‘तिसरा डोळा’ मिळाला आहे, ज्यामुळे अवकाशातून पृथ्वीच्या मोठ्या भागांवर सतत देखरेख ठेवणे शक्य होईल. कृषी, हवामान, आपत्ती व्यवस्थापन आणि सुरक्षा या क्षेत्रांमध्ये त्याची भूमिका महत्त्वपूर्ण असेल.**



भारताच्या अंतराळ कार्यक्रमाने ४ सप्टेंबर रोजी पहाटे २:५५ वाजता आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला. इस्त्रोने श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून जीएसएल्व्ही-एफ१७ रॉकेटचा वापर करून देशाचा पहिला भू-प्रतिबिंबन उपग्रह, ईओएस-०५ अवकाशात यशस्वीरीत्या प्रक्षेपित केला.

हा उपग्रह पृथ्वीपासून सुमारे ३६,००० किलोमीटर उंचीवर भूस्थिर कक्षेत स्थित आहे, ज्यामुळे तो भारताच्या आणि आसपासच्या विस्तीर्ण प्रदेशांवर सतत देखरेख ठेवू शकतो. त्याची उच्च-रिझोल्यूशन प्रतिमा आणि सतत पृथ्वी निरीक्षण क्षमता त्याला कृषी, हवामान अंदाज, चक्रीवादळ आणि आपत्ती व्यवस्थापन ते सीमा पाळत ठेवण्यापर्यंत विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यास सक्षम करते. म्हणूनच त्याला तिसरा डोळा म्हटले जात आहे.

ईओएस-०५ चे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे वारंवार प्रतिमा घेण्याची त्याची क्षमता. तो संपूर्ण भारतीय भूभागाच्या प्रतिमा दर ३० मिनिटांनी आणि निवडक भागांच्या प्रतिमा दर ५ मिनिटांनी देऊ शकतो, ज्यामुळे वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीवर रिअल-टाईम देखरेख ठेवणे शक्य होते. हे यश केवळ एका नवीन उपग्रहाचे प्रक्षेपण नाही, तर उपग्रह निर्मिती, प्रक्षेपण तंत्रज्ञान आणि अवकाश-आधारित डेटा वापरामध्ये वाढत्या स्वदेशी क्षमता आणि आत्मनिर्भरतेचा पुरावा आहे. चांद्रयान आणि गगनयानसारख्या यशानंतर हे अभियान भारताला केवळ अवकाशातील तंत्रज्ञान वापरकर्ता म्हणून नव्हे, तर जटिल अवकाश प्रणाली विकसित करणारा देश म्हणून स्थापित करते. हा उपग्रह पुढील १० वर्षे कार्यरत राहील आणि भारताच्या भविष्यातील पृथ्वी निरीक्षण व मानवी अंतराळ मोहिमांमध्ये एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल.

### उपग्रहाची खरी ताकद

सुमारे २,३४५ किलो वजनाचा हा उपग्रह पृथ्वीच्या परिवलनाशी सुसंगत अशा भू-समकालिक कक्षेत फिरतो, ज्यामुळे तो आकाशात साधारणपणे एकाच भागावर स्थिर राहू शकतो. या वैशिष्ट्यामुळे एका मोठ्या भौगोलिक क्षेत्राचे नियमित आणि सतत निरीक्षण करणे शक्य होते. भू-समकालिक कक्षेत असल्यामुळे एखाद्या विशिष्ट ठिकाणावरून पृथ्वीच्या निम्न कक्षेतील उपग्रह जाण्याची वाट न पाहता, तो एका मोठ्या क्षेत्राचे वारंवार निरीक्षण करू शकतो. या क्षमतेमुळे वेगाने बदलणाऱ्या घटनांवर लक्ष ठेवणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. भारताने केवळ एक जड उपग्रह अंतराळात प्रक्षेपित करण्याची आपली क्षमताच दाखवली नाही, तर त्याला या गुंतागुंतीच्या कक्षेत पोहोचवण्याचे आणि स्थापित करण्याचे तांत्रिक कौशल्यही सिद्ध केले आहे.

ईओएस-०५ची खरी उपयुक्तता ही अंतराळातून मिळणारी अखंड माहिती आपत्ती व्यवस्थापन, कृषी, हवामान, पर्यावरण आणि धोरणात्मक निर्णयांमध्ये एकत्रित करण्याच्या क्षमतेमध्ये आहे. पृथ्वीच्या कमी उंचीवरील कक्षेत फिरणारे उपग्रह एखाद्या ठिकाणाचे निरीक्षण तेव्हाच करू शकतात, जेव्हा त्यांची कक्षा त्या भागावरून जाते. यामुळे, वेगाने बदलणाऱ्या घटनेवर सतत लक्ष ठेवण्यात विलंब होऊ शकतो. हा उपग्रह पृथ्वीच्या एका मोठ्या भागाचे वारंवार निरीक्षण करू शकतो, ज्यामुळे एखाद्या घटनेचे केवळ एकच चित्र समोर येत नाही, तर काळानुसार होणाऱ्या बदलांची एक संपूर्ण कहाणी उलगडते.

### आपत्तींपासून शेतीपर्यंत

याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे केवळ पृथ्वीची छायाचित्रे घेण्याची क्षमताच नाही, तर पृथ्वीवर होणारे बदल समजून घेण्यास मदत करण्याची क्षमता देखील आहे. नैसर्गिक आपत्तींच्या वेळी परिस्थिती झपाट्याने बदलते आणि पृथ्वीची वारंवार घेतलेली छायाचित्रे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतील. हे विशेषतः तेव्हा खरे ठरते, जेव्हा चक्रीवादळे काही तासांत आपला मार्ग बदलू शकतात, पूर वेगाने पसरू शकतो आणि वणवे मोठ्या भागांना आपल्या कवेत घेऊ शकतात. त्याच्याद्वारे होणाऱ्या सततच्या देखरेखीमुळे चक्रीवादळाच्या ढगांच्या प्रणालीची दिशा, पुराच्या पाण्याचा प्रसार आणि बाधित क्षेत्राचे मूल्यांकन करणे शक्य होईल.

(शेष पान IV वर)

## राजकारण

इंद्रेश

**कर्नाटक काँग्रेसचे अध्यक्ष बी. के. हरिप्रसाद यांनी उमर खालिदचे वर्णन ‘राष्ट्रवादी’ म्हणून केले आणि भारताचे तुकडे करणाऱ्या टोळीला आमचे समर्थन असल्याचे संकेतच त्यांनी एकप्रकारे दिले. त्यांच्या या वक्तव्याचा भाजपाचे विधान परिषद सदस्य सी. टी. रवी यांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदविला. त्यांनी हरिप्रसाद यांच्यावर देशभक्तांचा अपमान केल्याचा आरोप केला आणि हे विधान काँग्रेस नेतृत्वाची अधिकृत भूमिका दर्शवते का, असा प्रश्न उपस्थित केला. धार्मिक आणि राष्ट्रीय मुद्यांवर पक्षाच्या दुटप्पी भूमिकेवरूनही रवी यांनी टीका केली.**

# काँग्रेसचेही ‘भारत तोडो’चे राजकारण

आतापर्यंत मी हरिप्रसाद यांना केवळ राजकीय प्रतिस्पर्धी मानत होतो, परंतु एका वादग्रस्त आणि देशविरोधी व्यक्तीला राष्ट्रवादी म्हणून सादर करण्याचा प्रयत्न पाहून धक्का बसला. मला वाटले होते की, हरिप्रसाद हे राजकीय प्रतिस्पर्धी आहेत. ते राष्ट्रविरोधी आहेत, हे मला माहिती नव्हते, असे म्हणत रवी यांनी खालिदला राष्ट्रवादी म्हणण्यामागचा आधार काय, असा प्रश्न उपस्थित केला.

रवी यांनी खालिदशी जोडल्या गेलेल्या घोषणांचा उल्लेख केला आणि तो कोणत्या राष्ट्राचे प्रतिनिधित्व करतो, असा सवाल केला. त्यांनी दावा केला की, हरिप्रसाद यांचे विधान हे दर्शवते की, काँग्रेस देशाला विभाजित करण्याचे राजकारण करीत आहे. ही टिप्पणी केवळ राजकीय भाष्य नसून, देशासाठी लढणाऱ्या आणि बलिदान देणाऱ्यांचा अपमान आहे.

मतपेढीच्या राजकारणाच्या प्रभावाखाली हरिप्रसाद यांनी हे विधान केले. अशा विधानांमुळे काँग्रेसचेच नुकसान होईल, असे सांगत रवी यांनी प्रश्न उपस्थित केला की, हरिप्रसाद यांची भूमिका ही पक्षाची अधिकृत भूमिका आहे का? हे राहुल गांधींचे विधान आहे का? हे सोनिया गांधींचे विधान आहे का? हे मल्लिकार्जुन खडगे यांचे विधान आहे का? हे काँग्रेस पक्षाचे विधान आहे का? यावर स्पष्टीकरण द्या, अशी मागणी रवी यांनी केली.

रवी यांनी काँग्रेसच्या ‘भारत जोडो’ घोषणेवरही टीका केली आणि म्हटले की, हरिप्रसाद यांची विधाने याच्या अगदी उलट परिणाम साधणारी आहेत. तुमचे विधान ‘भारत जोडो’ नाही, तर ‘भारत तोडो’ (देशाचे विभाजन करणारे) आहे, असे म्हणत रवी यांनी काँग्रेस नेतृत्वाने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी केली.



उमर खालिद व हरिप्रसाद

बंगळुरू येथील ‘नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी’मध्ये उमर खालिदवरील एका माहितीपटाच्या प्रदर्शनाला अभाविपने केलेल्या विरोधावर हरिप्रसाद यांनी टीका केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी रवी यांची ही प्रतिक्रिया आली.

हरिप्रसाद यांनी खालिदला राष्ट्रवादी म्हटले होते आणि त्याच्याबद्दल भाष्य करण्याचा अभाविपला नैतिक अधिकार आहे का, असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यांनी नथुराम गोडसे यांच्यावरही टीका केली; गोडसे हे देशद्रोही आणि दहशतवादी असल्याचे सांगत, अभाविप त्यांना आदर्श मानते, असा आरोपही केला.

ललित वचानी दिग्दर्शित ‘प्रिझनर नं. ६२६७१० इज प्रेझेंट’ या माहितीपटाचे प्रदर्शन पुढे ढकलल्यामुळे हा वाद निर्माण झाला. नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटीमधील ‘कमिटी फॉर लॉ अँड सोसायटी’तर्फे या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. १४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता नियोजित असलेल्या या कार्यक्रमात खटल्यापूर्वीची कोठडी, जामीन, असहमती, राजकीय कारणास्तव होणारी कारावासवास आणि फौजदारी कायदा व लोकशाही स्वातंत्र्य यांच्यातील संबंध यावर चर्चा अपेक्षित होती. प्रदर्शनाला झालेल्या विरोधामुळे सुरक्षेच्या कारणास्तव हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आल्याचे आयोजन समितीने सांगितले.

राष्ट्रवादाचे निकष ठरवताना हरिप्रसाद यांनी निवडक दृष्टिकोन स्वीकारल्याची टीका रवी यांनी केली आणि राजकीय परिस्थितीनुसार काँग्रेस वेगवेगळ्या भूमिका घेत असल्याचा आरोप केला. ●●●

## संरक्षण

लेफ्टनंट जनरल एम. के. दास

**भारताने आता संरक्षण मुत्सद्देगिरीला केवळ लष्करी सहकार्यापुरते मर्यादित न ठेवता, त्याला आपल्या जागतिक धोरणाचा औपचारिक आधारस्तंभ बनवले आहे. ‘रक्षा’ रोडमॅपद्वारे भारताने २०२६-२०३६ साठी आपली विस्तारणारी जागतिक भूमिका स्पष्ट केली आहे, ज्यात सामरिक भागीदारी, संरक्षण निर्यात, क्षमता बांधणी आणि सागरी सुरक्षेवर लक्ष केंद्रित केले आहे.**

# बदलत्या जगात भारताचा सामर्थ्यशाली निर्धार

संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी लष्करी अधिकारी आणि संरक्षण मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत संरक्षण मुत्सद्देगिरीवरील ‘रक्षा’ नावाचा एक सामरिक दस्तऐवज प्रसिद्ध केला. हा भारताचा पुढील दशकासाठी असलेला पहिला एकात्मिक संरक्षण मुत्सद्देगिरीचा आराखडा आहे.

संरक्षण मुत्सद्देगिरी हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा एक मुख्य आधारस्तंभ असल्याने हा दस्तऐवज पुढील दशकासाठी एक स्पष्ट, कृतीयोग्य दृष्टीकोन प्रदान करतो, ज्यामुळे भारताला शांतता, स्थिरता आणि नियम-आधारित व्यवस्थेचा आधारस्तंभ म्हणून आपले स्थान टिकवून ठेवता येईल.

संरक्षण मुत्सद्देगिरीचा उद्देश द्विपक्षीय आणि बहुपक्षीय संबंधांना प्रोत्साहन देणे, पारदर्शकता वाढवणे, विश्वास निर्माण करणे आणि संघर्षमुक्त धोरणात्मक वातावरणाला चालना देणे हा आहे. यामध्ये लष्करी देवाणघेवाण, संयुक्त कवायती, प्रशिक्षण कार्यक्रम, नौदल दौरे, उच्चस्तरीय दौरे, संरक्षण प्रदर्शने, क्षमता बांधणी आणि मानवतावादी मदत कार्यांचा समावेश आहे. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, संरक्षण मुत्सद्देगिरी शांततेच्या काळात सशस्त्र दलांचा परराष्ट्र धोरणाचे साधन म्हणून वापर करून परस्पर विश्वास वाढवते, युद्धाचा धोका कमी करते आणि धोरणात्मक फायदा मिळवते.

भारताच्या संरक्षण मुत्सद्देगिरीला एक दीर्घ आणि समृद्ध इतिहास आहे. जगभरातील विविध देशांशी संरक्षण संबंध दृढ करण्यासाठी भारताने परदेशात ५२ संरक्षण कार्यालये स्थापन केली आहेत. याव्यतिरिक्त, परदेशातील दूतावास आणि उच्चायुक्तालयांमध्ये १०० हून अधिक भारतीय अधिकारी संरक्षण-संबंधित जबाबदाऱ्या सांभाळतात. हे संरक्षण विभाग यजमान देशांसोबत संरक्षण मुत्सद्देगिरी आणि संरक्षण उद्योगाशी संपर्क साधण्यासाठी प्रमुख केंद्र म्हणून काम करतात. भारत आता केवळ संरक्षण शस्त्रास्त्रांचा खरेदीदार नाही, तर सुरक्षा उपायांचा पुरवठादार आणि एक जागतिक संरक्षण भागीदार आहे.

**संरक्षण मुत्सद्देगिरी** : संरक्षण मंत्रालयाने या आर्थिक वर्षात संरक्षण मुत्सद्देगिरीसाठी ४०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे, जी गेल्या वर्षी ३०० कोटी रुपये होती. २०३० पर्यंत ९० संरक्षण विभाग स्थापन करण्याची योजना आहे, ज्यात पुढील वर्षी आणखी १० विभाग जोडले जातील, ज्यामुळे एकूण संख्या ६२ होईल.

सध्याच्या संरक्षण विभागांना ५० शेजारी देशांसाठी मान्यता दिली जात आहे. पुढील वर्षापर्यंत त्यांची व्याप्ती १५७ देशांपर्यंत वाढवण्याची योजना आहे. भारत पश्चिम आफ्रिका, लॅटिन अमेरिका, कॅरिबियन आणि पॅसिफिक बेटांमध्ये संपर्क अधिकाऱ्यांची उपस्थिती वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. आंतरराष्ट्रीय संपर्क अधिकाऱ्यांच्या तैनातीमुळे धोरणात्मक मुद्दे, गुप्त माहितीची देवाणघेवाण आणि जलद निर्णयक्षमता शक्य होते.

### चार स्तंभ

**सामरिक भागीदारी** : प्रमुख भागीदार आणि गटांसोबत (क्वाड, आसियान) द्विपक्षीय आणि बहुपक्षीय सुरक्षा सहकार्य, ज्यामुळे संयुक्त नियोजन, आंतरकार्यक्षमता आणि संकट समन्वय शक्य होईल.

**क्षमता बांधणी** : दीर्घकालीन दृष्टिकोनासह संयुक्त सराव, संस्थात्मक प्रशिक्षण आणि लष्करी-ते-लष्करी संबंधांचा विस्तार करणे.

**संरक्षण निर्यात**: भारताला एक विश्वसनीय जागतिक संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून स्थापित करणे. भारत आधीच १०० हून अधिक देशांना लष्करी सामग्रीची निर्यात करतो आणि नैतिक धोरणाचे पालन करतो.

**सागरी सुरक्षा** : मानवतावादी मदत आणि आपत्ती निवारण, चाचेगिरीविरोधी कारवाया, सागरी क्षेत्रातील जागरूकता आणि मुक्त नौकानयन यामध्ये भारताची भूमिका मजबूत करणे. भारत शेजारच्या देशांमध्ये ‘प्रथम प्रतिसादक’ आणि हिंद महासागर क्षेत्रात ‘निव्वळ सुरक्षा प्रदाता’ म्हणून उदयास आला आहे.




एकंदरीत संरक्षण दस्तऐवज सध्याच्या प्रत्येक प्रकरणानुसार संरक्षण कार्यातून एका शाश्वत आणि तत्त्व-आधारित दृष्टिकोनाकडे होणाऱ्या बदलाचे संकेत देतो.

### सागरी सुरक्षेवर विशेष भर

‘संरक्षण’ या चार स्तंभांपैकी सागरी सुरक्षा हा भारताच्या संरक्षण राजनैतिक धोरणाचा सर्वांत सक्रिय घटक आहे. गेल्या दशकात भारतीय नौदलाची मोहीम-आधारित तैनाती, चाचेगिरीविरोधी कारवाया आणि मानवतावादी मदत व आपत्ती निवारण उपक्रमांना यातून औपचारिक स्वरूप प्राप्त झाले आहे. याव्यतिरिक्त, हिंद महासागर आणि इंडो-पॅसिफिक प्रदेशात समान सुरक्षा आव्हानांना तोंड देणाऱ्या देशांसोबतच्या सहकार्यातून विस्तारित नौदल सहकार्यासारख्या उपक्रमांमुळे भारताच्या संरक्षण राजनैतिक धोरणाला चालना मिळते. दक्षिण चीन समुद्रात चीनसोबत सागरी विवाद असल्याने भारताने व्हिएतनाम, फिलिपाईन्स, सिंगापूर, इंडोनेशिया इत्यादी देशांसोबत अनेक नौदल सराव आयोजित केले आहेत.

### ‘मेक इन इंडिया’मध्ये नवीन बदल

‘संरक्षण’ अंतर्गत असलेल्या ‘मेक इन इंडिया’ धोरणात मोठा बदल झाला आहे. पूर्वीचे धोरण केवळ स्वतःच्या सैन्यासाठी स्वदेशीकरणावर लक्ष केंद्रित करीत होते, तर नवीन धोरण भारताला एक प्रमुख संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून स्थापित करण्याची कल्पना करते.

हा स्तंभ भारताला संरक्षण उपकरणांसाठी एक प्रमुख जागतिक देखभाल, दुरुस्ती आणि पुनर्निर्मिती केंद्र म्हणूनही प्रोत्साहन देतो. भारत विमान वाहतूक क्षेत्रासाठी देखभाल, दुरुस्ती आणि पुनर्निर्मितीचे एक प्रमुख केंद्र आहे. जहाजबांधणी उद्योगातही याच मॉडेलचे अनुसरण केले जात आहे, ज्यासाठी सरकारने गेल्या वर्षी ६९,७२५ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. जपान आणि दक्षिण कोरियासारख्या जागतिक शक्तींसोबत भागीदारी करून भारत हरित जहाज वाहतुकीला प्रोत्साहन देऊ इच्छितो आणि सागरी व्यापारासाठी परदेशी जहाजांवरील अवलंबित्व कमी करू इच्छितो.

### जागतिक भागीदारीपर्यंत

भारताच्या संरक्षण राजनैतिक धोरणाचे एक उत्तम उदाहरण म्हणजे संरक्षण निर्यातीतील लक्षणीय वाढ, जी २०२५-२६ या आर्थिक वर्षात ३८,४२४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. भारताने २०३० पर्यंत ५०,००० कोटी रुपयांच्या संरक्षण निर्यातीचे लक्ष्य ठेवले आहे. संरक्षण निर्यात केवळ शस्त्रपुरवठाच करीत नाही, तर चांगले राजनैतिक संबंध आणि विश्वासू भागीदार विकसित करण्यासही मदत करते. भारताने आफ्रिकन देशांशी चांगले संबंध प्रस्थापित केले आहेत आणि संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांच्या माध्यमातून आफ्रिकेत भारताची लक्षणीय उपस्थिती आहे. यामुळेच संरक्षण मंत्रालय आफ्रिकेत ११ नवीन संरक्षण शाखांची योजना आखत आहे, जे अप्रत्यक्षपणे चिनी उपस्थितीलाही प्रत्युत्तर देते.

सध्याची अनिश्चित भू-राजकीय परिस्थिती भारताच्या संरक्षण राजनैतिक धोरणासमोर आव्हाने उभी करीत आहे. अमेरिका भारत-अमेरिका सामरिक भागीदारीबाबत विसंगत राहिली आहे आणि ‘क्वाड’बाबतची तिची वचनबद्धता कमी स्पष्ट दिसत आहे. रशिया युक्रेन युद्धात गुंतलेला आहे, ज्यामुळे भारतासोबतच्या संरक्षणविषयक वचनबद्धतेस विलंब झाला आहे. चीन-भारत तणाव आणि पाकिस्तानसोबतचा सततचा संघर्ष तत्काळ सुरक्षेच्या चिंतेवर लक्ष केंद्रित करत आहे.

‘संरक्षण’ क्षेत्रासाठी एकूण चित्र सकारात्मक आणि आशावादी आहे. हा दस्तऐवज सर्वसमावेशक राष्ट्रीय सुरक्षेच्या संकल्पनेवरील भारताचा वाढता विश्वास दर्शवतो आणि संरक्षण राजनैतिकतेच्या पुराणमतवादी दृष्टिकोनातून अधिक सक्रिय दृष्टिकोनाकडे झालेले स्थित्यंतर प्रतिबिंबित करतो. तसेच, तो चीनच्या वाढत्या सहभागाविरोधात, विशेषतः इंडो-पॅसिफिक प्रदेशात एक अप्रत्यक्ष संदेशही देतो. ‘संरक्षण’ दस्तऐवज संरक्षण मंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय आणि सशस्त्र दलांना संस्थात्मक स्पष्टता प्रदान करतो. एकंदरीत, ‘संरक्षण’ दस्तऐवजाच्या माध्यमातून भारताने नियम-आधारित जागतिक व्यवस्थेवर विश्वास ठेवणारी एक जबाबदार लष्करी शक्ती बनण्याची आपली जागतिक महत्त्वाकांक्षा जाहीर केली आहे. ●●●

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# उच्चभ्रू वस्तीतील पोलीसाचे घर फोडले

## पिस्तूल, काडतुस, रोख रकमेसह लाखोंचा ऐवज लंपास

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २० सप्टेंबर -**

नांदेड - नांदेडमधील कौठा भागातील उच्चभ्रू वस्ती समजल्या जाणाऱ्या राम बागेत चोरट्यांनी एका पोलीस कर्मचाऱ्याचेच घर फोडल्याची खळबळजनक घटना शुक्रवारी रात्री घडली आहे. गंभीर बाब म्हणजे या घटनेत चोरट्याने रोख साडे सहा लाख रुपये, सोन्याच्या दागिन्यांसह पोलिसाची पिस्तूल आणि ३० जिवंत काडतूसही लंपास केले आहेत. त्यामुळे आता या चोरट्यांचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे उभे राहिले आहे.

नांदेड जिल्हा पोलीस दलातील कार्यरत पोलीस हवालदार गजानन बळीराम कदम हे नवीन कौठा येथील रामबाग रेसिडेन्सी येथे राहतात. सध्या ते नांदेड शहर उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे क्राइम रायटर म्हणून काम पाहत आहेत. पोलीस हवालदार कदम यांचे कुटुंबीय महालक्ष्मी सणानिमित्त मूळ गावी गोरठा येथे १७ सप्टेंबर रोजी गेले होते. कदम मात्र आपल्या कार्यालयीन कामानिमित्त दिवसभर वजिराबाद येथील कार्यालयात हजर राहून १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी घरी परतले. यावेळी त्यांनी आपली शासकीय पिस्तूल आणि काडतूस हे घरामध्ये ठेवले. घरी कुणीही नसल्यामुळे ते जेवणासाठी रात्री घराबाहेर पडले. त्यानंतर पुन्हा ते आपल्या महत्वाच्या शासकीय कामासाठी वजिराबाद येथील कार्यालयात गेले. महत्त्वाचे काम असल्याने त्यांनी रात्री उशिरापर्यंत काम करून ते तेथेच कार्यालयातच झोपले. परिणामी घरात कोणीही उरले नव्हते. चोरट्यांनी ही संधी साधली.

दुसऱ्या मजल्यावरील घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी शासकीय पिस्तुलासह लाखोंचा ऐवज लंपास केला होता. १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० च्या सुमारास कदम हे आपल्या रामबागेतील निवासस्थानी पोहोचले. यावेळी त्यांना आपल्या घराचा दरवाजा उघडा दिसला. घराचे कुलूप तोडलेले होते. त्यांनी आत जाऊन पाहिले असता घरातील सामान अस्तव्यस्त पडले होते. घरातील चोरीचा प्रकार त्यांच्या लक्षात आला. या घटनेमध्ये शासकीय पिस्तुलासह ३० जिवंत काडतूस, रोख ६ लाख ५० हजार रुपये तसेच सोन्याचे गंठण, सोन्याची चैन, दोन अंगठ्या असे एकूण पाच तोळे सोन्याचे दागिने किंमत जवळपास पाच लाख रुपये असा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. या घटनेत एकूण १६ लाख ६५ हजार रुपयांचा एकूण मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला.

या प्रकरणात कदम यांच्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास उपनिरीक्षक ज्ञानेश्वर भोसले यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी भेट दिली. या घटनेतील चोरट्यांच्या शोधात नांदेड ग्रामीण पोलिसांसह स्थानिक गुन्हा शाखेची पथकेही रवाना झाली आहेत.

# पुतळा विटंबना प्रकरणातील मूळ सूत्रधारास अटक करण्याची मागणी



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २० सप्टेंबर -**

साहित्यसम्राट आण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची विटंबना करणाऱ्या मूळ सूत्रधार (मास्टर माईंड) आरोपीस तात्काळ अटक करून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी लोक स्वराज्य आंदोलन महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष रामचंद्र भराडे यांच्या लेटर पॅड वरून कामगार आघाडीचे जिल्हा अध्यक्ष श्रावण गागलवाड व समस्त मातंग समाजाने दिनांक १९ सप्टेंबर रोजी ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना देण्यात आले.

सिडको हडको वाघाळा नवीन नांदेड येथील डॉ. अण्णा भाऊ साठे चौकातील शाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला चपलांचा हार घालून जाणीवपूर्वक विटंबना करण्यात आली. या घटनेतील दोन आरोपी अटक असून त्यांच्या मागील मूळ सूत्रधार (मास्टर माईंड) आरोपीस अटक लवकरात लवकर करून त्यास ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल करण्यात यावा मूळ आरोपीचा अद्याप सुगावा लागला नसल्यामुळे समस्त मातंग समाज तीव्र नाराजी व्यक्त करत आहे. सदरील नाराजीतून मातंग समाज १९ सप्टेंबर २०२६ रोजी धडक मोर्चा ग्रामीण पोलीस ठाण्यावर काढणार होते. पण कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून हा मोर्चा स्थगित करण्यात आला. तेव्हा पोलीस प्रशासनाने समस्त मातंग समाजाच्या भावनांचा विचार करून मुख्य सूत्रधार( मास्टर माईंड) आरोपीस लवकरात लवकर अटक करावे व मातंग समाजास न्याय मिळवून द्यावा अशा आशयाचे निवेदन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना देण्यात आले आहे. सदरील निवेदनावर श्रावण गागलवाड, रावसाहेब दादा पवार, कैलास सूर्यवंशी, संभाजी राजे वाघमारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## एकता व्यापारी गणेश मंडळाकडुन विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**हाणेगाव** -हाणेगाव येथे एकता व्यापारी गणेश मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये परिसरातील जिल्हा परिषद हायस्कूल,कन्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण व्हाव्यात, या उद्देशाने मंडळाने हा उपक्रम राबविला. तसेच गणेशोत्सवाच्या काळात मंडळाच्या वतीने'सर्वात श्रेष्ठदान अन्नदान' म्हणुन सलग अकरा दिवस महाप्रसादाच्या माध्यमातून अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात येतो. या उपक्रमाचा परिसरातील नागरिक, भाविक आणि विद्यार्थ्यांनी रोज लाभ घेत असतात. गणेशोत्सव केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक बांधिलकी जपणारा उत्सव ठरावा, या उद्देशाने एकता व्यापारी गणेश मंडळाने राबविलेल्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्सवाच्या काळात सामाजिक उपक्रम राबवून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली.यावेळी सर्वप्रथम गणपतीची आरती करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आले. यावेळी मठाचे मठाधिपती शंकरलिंग शिवाचार्य महाराज,प्रितम देशमुख,विठ्ठल पोकलवार,विश्वनाथ पोकलवार,मुन्ना होडगे,दिलीप वाडीयार,तुकाराम बिरादार,भिमराव पवार,गालचेलवार,गणेश पंदरगे,दिपक हिबाने,प्रदीप भाये,गणेश पंदरगे,संतोष गंगथडे,अताऊल्ला पठान,आनंद पंचगल्ले,अंगद कुडले,चांद पटेल,अजय पडकंठवार,संदीप रड्डी आदी भावीक भक्तांची लक्षणीय उपस्थिती होती.

## सपोनि विशाल भोसले यांचा पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्याकडून गौरव

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २० सप्टेंबर -**

नायगाव तालुक्यातील कुंटूर पोलीस ठाण्यात सपोनी म्हणून कार्यरत असलेले विशाल भोसले यांनी ऑगस्ट २०२६ या महिन्यात तब्बल ४६ गुन्ह्यांची निर्गती करून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत नांदेडचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी प्रशस्तीपत्र देऊन सपोनि विशाल भोसले यांचे अभिनंदन केले आहे.



गुन्ह्यांचा तपास, प्रलंबित प्रकरणांची निर्गती, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच नागरिकांच्या तक्रारींना प्रतिसाद देताना सपोनि भोसले यांनी सातत्याने कार्यतत्परता दाखवली. उपलब्ध मनुष्यबळ व साधनसामग्रीचा योग्य वापर करत तपास प्रक्रियेला गती देण्याबरोबरच गुन्हे निकाली काढण्यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यांच्या या कार्यपद्धतीमुळे कुंटूर पोलीस ठाण्याच्या कामकाजात सकारात्मक परिणाम दिसून आला आहे.

ऑगस्ट महिन्यात ४६ गुन्ह्यांची निर्गती ही त्यांच्या कार्यातील शिस्त, सातत्य, तपासातील बारकावे आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा अधोरेखित करणारी कामगिरी मानली जात आहे. त्यामुळे पोलीस विभागातूनही त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी नांदेड येथे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी दिलेल्या प्रशस्तीपत्रात सपोनि विशाल भोसले यांच्या अविश्रांत परिश्रमांचे कौतुक करून, भविष्यातही अशीच उत्कृष्ट कामगिरी बजावतील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

सपोनि विशाल भोसले यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## खैरगांव पुलाजवळ अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळल्या ने खळबळ

**नायगाव**-नायगाव तालुक्यातील नांदेड-नरसी राज्य महामार्गावरील खैरगाव पुलाजवळ रविवारी दुपारी एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. मृतदेहा जवळच ढड १८ क ५०५४ क्रमांकाची मोटारसायकल आढळून आल्याने मृत्यूचे नेमके कारण काय, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. २० सप्टेंबर रोजी दुपारी एकच्या सुमारास शेख नावाचे व्यक्ती नांदेड-नरसी राज्य महामार्गावरून जात असताना त्यांनी आपली मोटारसायकल रस्त्याच्या कडेला थांबवून लघुशंकेसाठी खाली उतरले. त्यावेळी खैरगाव पुलाच्या परिसरातून दुर्गंधी येत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी काही अंतर पुढे जाऊन पाहणी केली असता एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आणि त्याच्याजवळ मोटारसायकल आढळून आली. घटनेची माहिती मिळताच त्यांनी तत्काळ ११२ क्रमांका वर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर नायगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. दरम्यान, ही बातमी परिसरात पसरताच राज्य महामार्गावर नागरिकांची मोठीगर्दी झाली. घटना स्थळी मृतदेहाची अवस्था तसेच परिसरात पसरलेली दुर्गंधी यामुळे पोलिसांना पंचनामा व इतर प्राथमिक कार्यवाही करताना अडचणींचा सामना करावा लागला. मृतदेहाजवळ आढळलेल्या मोटारसायकलीचे प्रथम दर्शनी कोणतेही मोठे नुकसान झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे हा मृत्यू नेमका अपघातामुळे झाला की अन्य कोणत्या कारणामुळे, याबाबत नागरिकांमध्ये तर्क-वितर्क सुरू झाले. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून मृतदेह ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू केली असून मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे कामही सुरू आहे. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवाल आणि पोलिस तपासानंतरच स्पष्ट होणार असल्याचे पोलिस प्रशासनाकडून सांगण्यात आले. या घटनेचा पुढील तपास नायगाव पोलिस करीत आहेत.

## 'सेवा संकल्प अभियान'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समन्वयाने नियोजन करावे : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० सप्टेंबर -**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'सेवा परमोधर्म' या उक्तीनुसार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विविध शासकीय सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ दरम्यान 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानाची नांदेड जिल्ह्यात प्रभावी व यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागांनी योग्य समन्वय ठेवून उपक्रमांचे काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. दरम्यान, या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांनी शासकीय योजना व सेवांचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

'सेवा संकल्प अभियान'च्या जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.


या बैठकीस दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, सर्व उपविभागीय अधिकारी, महिला व बालविकास विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त राजपाल कोल्हे, नगर पालिका प्रशासनाचे सहायक आयुक्त , यांच्यासह विविध विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते.

शासनाच्या निर्देशानुसार दि. १७ सप्टेंबर ते दि. १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत नागरिककेंद्री विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, सेवा व उपक्रमांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांमध्ये शासकीय योजनांविषयी जनजागृती करणे तसेच प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करणे, हा अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले.

या अभियानांतर्गत 'सेवा सेतू अभियान', 'इनोव्हेशन चॅलेंज', 'सेवा माझे योगदान', 'विकसित भारत संकल्प यात्रा', 'सेवा ज्योत यात्रा', चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, 'अंगणवाडी उत्सव', 'आशीर्वादाचा दिवा', 'बदलाची गोष्ट', 'आभार आणि संकल्पाची रांगोळी', 'नमो सेवा गाथा', 'जल, जन आणि संकल्प यात्रा' तसेच 'जनसेवक महाकुंभ' यांसारखे विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगून सर्व विभागप्रमुखांनी त्यांची जबाबदारी व्यवस्थित पार पाडावी तसेच अभियानात केलेल्या कामाची पूर्वीची व नंतरची छायाचित्रे आणि व्हिडीओ चित्रिकरण करून ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## खतगांव शाळेचा तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक

**आदमपूर** -तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत बिलोली तालुक्यातील ग्राम खतगांव येथील सौ.मंजुळाबाई माध्यमिक विद्यालयातील १४ वर्ष वयोगटातील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावून यश संपादन केले आहे.प्रतिस्पर्धी शिवाजी हायस्कूल सगरोळी संघाचा त्यांनी पराभव केला.अंतीम सामान्यापूर्वी खतगांव संघाने शिवनेरी पोद्दार इंग्लिश स्कूल संघास धूळ चारली. त्याचप्रमाणे सौ.मंजुळाबाई माध्यमिक विद्यालयातील १७ वर्ष वयोगटातील मुलींच्या संघास अंतीम सामन्यात पराभव पत्करावा लागला.प्रतिस्पर्धी कार्ला येथील इरन्ना पाटील हायस्कूल संघाने चुरशीची मात दिली.अंतीम सामन्यापूर्वी शिवाजी हायस्कूल सगरोळी येथील मुलींच्या संघास नमवले. गतविजेत्या कार्ला संघाच्या मुलींचा अंतीम सामना लाजवाब अटीतटीचा आणि चुरशीचा झाल्याने डोळ्याचे पारणे फिटले.सदरील मुला-मुलींच्या संघास शाळेचे क्रीडाशिक्षक भालेराव सर,शेख खाजासाब, व्हॉलीबॉल पटू दत्ता दाणेदार,बालाजी हजापुरे,गोविंद पेटेकर आदिंचे यथोचित मार्गदर्शन लाभले.यशस्वी विद्यार्थांचे खतगांव शाळेचे प्राचार्य मारोती पिन्नलवार, संस्थेचे विद्यमान बाळासाहेब पाटील खतगांवकर, उपप्राचार्य प्रा.रमेश वासरे, पतपेढीचे संचालक हाणमंतराव कदम पाटील,शंकरराव पाटील,गोविंदराव पाटील,अमृत पाटील,सरपंच प्रतिनिधी मल्लेश पेटेकर, मारोती हजापुरे,संस्थेचे पदाधिकारी,शाळेतील कर्मचारीवर्ग,शिक्षकेतर कर्मचारी,प्रतिष्ठित नागरिक, गावकरी, व्हॉलीबॉल प्रेमी खेळाडू यांनी विजेत्या संघातील विद्यार्थी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.



## विविध बोलींनी हिंदी भाषा समृद्ध होत गेली: डॉ. प्रकाश निहलानी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० सप्टेंबर -**

भारतातील विविध प्रदेशांमध्ये हिंदी वेगवेगळ्या स्वरूपात बोलली जाते. स्थानिक बोलींमधील अनेक शब्द हिंदीने आत्मसात केल्याने लोकांच्या वापरातून हिंदी भाषा सातत्याने समृद्ध होत गेली, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बहिःस्थ शिक्षण विभागाचे संचालक तथा हास्य-व्यंग्य कवी डॉ. प्रकाश निहलानी यांनी केले.

नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स कॉलेजच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने पीपल्स कट्ट्यावर हिंदी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विकास सुकाळे होते. नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

हिंदी ही भारताची बिंदी आहे, असे सांगत डॉ. निहलानी यांनी विद्यार्थ्यांनी मातृभाषेचा अभिमान बाळगत हिंदीसह अन्य भारतीय भाषांचाही अभ्यास करावा, असे आवाहन केले. त्यांनी नदी और सागर का मिलाप, डॉक्टर को देखने का समय यांसह हास्य-व्यंग्य रचना सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. फौजी और अनपढ़ लड़की या सादरीकरणालाही विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सीए डॉ. प्रवीण पाटील यांनी मराठी माझी आई आहे, तर हिंदी माझी मावशी आहे,असे सांगत सर्व भारतीय भाषांचा सन्मान करण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी हिंदी कविता तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून तयार केलेले गीत सादर केले. प्राचार्य डॉ. विकास सुकाळे यांनी अध्यक्षीय समारोप केला.

हिंदी दिनानिमित्त विद्यार्थिनींनी हिंदीतील प्रथम महिला साहित्यिकांची माहिती देणारे भित्तिपत्रक सादर केले. तसेच सायबर गुन्ह्यांवर आधारित पथनाट्य सादर करण्यात आले. राजेश्वरी अन्नदाते, ज्योती जोगपेठे व प्रांजली जवळेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. आम्रपाली कसबे यांच्या पुढाकाराने आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बी. एन. जाधव यांनी केले. डॉ. माया भालेराव यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन डॉ. आम्रपाली कसबे यांनी तर आभार प्रा. विजय कदम यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वरूण राजाला साकडे घालत बळीराजासाठी प्रार्थना करून श्री सुभाष शुगर चा बॉयलर अग्नी प्रदीपण सोहळा

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २० सप्टेंबर -**

श्री सुभाष शुगर प्रा. लि. कारखान्याचा आगामी सातवा गळीत हंगामाचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा आज अत्यंत मंगलमय उत्साही वातावरणात तसेच मंत्रोच्चारांच्या गजरात मोठ्या भक्तिभावाने पार पडला. यंदाच्या वर्षी पावसाचे प्रमाण कमी असल्याने जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाला दिलासा मिळावा आणि सर्वत्र पुरेसा पाऊस पडावा यासाठी सर्वांच्या वतीने सर्वप्रथम वरूण राजाला साकडे घालण्यात आले. निसर्गाची कृपा राहावी अशी भावपूर्ण प्रार्थना करूनच अग्नी प्रदीपन पूजेला सुरुवात करण्यात आली.

कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख यांच्या सदिच्छा आणि शुभ आशीर्वादाने तसेच कार्यकारी संचालक सुशीलकुमार सुभाषराव देशमुख यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले. याप्रसंगी बॉयलर अग्नी प्रदीपनाची विधिवत पूजा कारखान्याचे डेप्युटी चीफ इंजिनिअर सचिन पवार व त्यांच्या



सुविज्ञ पत्नी तसेच मॅन्युफॅक्चरिंग केमिस्ट सुरज वानखेडे व त्यांच्या सुविज्ञ पत्नी यांच्या शुभहस्ते संपन्न झाली. यावेळी जनरल मॅनेजर राजेश मानधना, शिऊरचे जीएम सोमाप्पा, मधुकर पतंगे, गिरजेश वर्मा, किशोर वानखेडे, एकनाथ गीते, बालासाहेब कांडगे, भास्कर गावंडे, जयजित निलंगेकर, जितेंद्र ठोंबरे,मुकेश वाघमारे, मंगेश फड यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व कामगार बांधव उपस्थित होते.

**बळीराजासाठी प्रार्थना करुन कार्यक्रमाची सुरवात**

मागच्या महिन्यापासून पाण्याने दडी मारल्याने शेतकरी बांधव अक्षरशः हातबल झाले आहेत. हाताशी आलेले पीक पाण्याअभावी हातातून जात आहेत त्यामुळे आजच्या कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच वरूण राजाची कृपा या जगाच्या पोशिंदावर व्हावी अशी मनोकामना व साकडे घालण्यात आल्यानंतरच बॉयलर अग्नी प्रदीपणाची पूजा करण्यात आली संपूर्ण कार्यक्रम अतिशय चैतन्यमय आणि भारावलेल्या वातावरणात पार पडला उपस्थित सर्वांनी आगामी गणित हंगामा अत्यंत यशस्वी यशाची आणि विक्रमी होण्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

# बुद्धिबळाच्या पटावर स्नेहाची विजयी चाल 'लिटल स्टेप'

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २० सप्टेंबर -**

नायगांव तालुक्यातील ग्रामीण भागातून आलेल्या कु. स्नेहा मावले हिने आपल्या बुद्धिमत्ता, चिकाटी आणि अथक सरावाच्या जोरावर बुद्धिबळाच्या पटावर उल्लेखनीय कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेचे दार ठोठावले आहे. लिटल स्टेप इंग्लिश स्कूलच्या या विद्यार्थिनीने तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत प्रभावी खेळाचे दर्शन घडवत प्रथम क्रमांक मिळवून आपल्या गुणवत्तेची दमदार छाप उमटवली आहे.

नांदेड जिल्हा शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय मैदानी तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये लिटल स्टेप इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यंदाही आपली यशाची परंपरा कायम ठेवली आहे. त्यामध्ये बुद्धिबळ स्पर्धेतील कु. स्नेहा मावले हिच्या कामगिरीने विशेष लक्ष वेधून घेतले आहे.नायगांव तालुक्यातील चारवाडी येथील ग्रामीण वातावरणातून पुढे आलेल्या स्नेहाने बुद्धिबळातील अचूक डावपेच आणि शांत आणि संयमाच्या जोरावर प्रति स्पर्ध्यांवर मात करत तालुक्यात अव्वल स्थान पटकावले.



स्नेहाच्या या यशामागे तिची जिद्द, नियमित सराव आणि खेळातील बारकावे आत्मसात करण्याची वृत्ती महत्त्वाची ठरली. तिच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यां मध्ये योग्य मार्गदर्शन,संधी आणि मेहनतीच्या बळावर मोठी झेप घेण्याची क्षमता असल्याचे अधोरेखित झाले आहे.

याचबरोबर लिटल स्टेप इंग्लिश स्कूलची कु. श्रावणी बेळगे हिनेही आपल्या खेळातील कौशल्य सिद्ध करत १७ वर्षे वयोगटातून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. बुद्धिबळासारख्या एकाग्रता, संयम, कल्पकता आणि निर्णयक्षमता यांची कसोटी पाहणाऱ्या बौद्धिक खेळात शाळेच्या विद्यार्थिनींनी सलग आठव्या वर्षी जिल्हास्तरावर प्रवेश मिळवण्याची परंपरा कायम राखली आहे. ही सातत्यपूर्ण कामगिरी शाळेच्या क्रीडा संस्कृतीचे आणि विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या योग्य मार्गदर्शनाचे द्योतक ठरत आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल यशस्वी विद्यार्थिनींसह त्यांचे मार्गदर्शक जोगेंद्र सिंह ठाकूर सरांचे संस्थेचे अध्यक्ष खा.रविंद्र चव्हाण साहेब, संस्थेचे सचिव केशव चव्हाण, हनुमंत जाधव सर, राष्ट्रीय बुद्धिबळ चॅम्पियन डॉ. ओमकार बालाजीराव पेटेकर, शाळेचे मुख्याध्यापक तसेच शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

आगामी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत स्नेहा मावले आणि श्रावणी बेळगे यांनी आत्मविश्वासाने खेळ करत आपल्या शाळेच्या यशाची पताका आणखी उंच न्यावी, यासाठी त्यांना सर्वांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या कौतुकास्पद कामगिरीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, ग्रामीण भागातील या गुणवंत विद्यार्थिनींच्या पुढील वाटचालीकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.